

मा. श्रीमती मंगलताई रामचंद्र जगताप यांना महाविद्यालयाचा त्रिवेणी अंक देत असताना महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. संजय कांबळे यांच्या समवेत महाविद्यालयातील प्राध्यापक



महाविद्यालय विकास समितीचे सन्माननीय सदस्य, मा. डॉ. रणजित रामचंद्र जगताप
सन २०१९-२० चा आदर्शगौरव पी.डी. पाटील महाराष्ट्र भूषण पुरस्कार, मा. श्री. श्रीनिवासजी पाटील
प्रदान करण्यात आला या प्रसंगी व्यासपीठावर मा. मान्यवर श्री. बाळासाहेब पाटील,
मा. श्री. देवराज पाटील, मा. श्री. सुनिल माने आणि श्रीमती मंगलताई जगताप



वाय. सी. कॉलेज सातारा येथे बंधुता साहित्य संमेलन सहभाग प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य, स्टाफ व विद्यार्थीनींची सदिच्छा भेट रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन, मा. डॉ. अनिल पाटील, सचिव मा. प्राचार्य डॉ. भाऊसाहेब कराळे, ऑडिटर डॉ. अरूण आंधळे, मा. प्राचार्य. डॉ. के.जी. कानडे व इतर पदाधिकारी



सेवकांसाठी एकदिवसीय कार्यशाळा ऑफिस या विषयावर मार्गदर्शन करताना
प्राचार्य, अरूण आंधळे व्यासपीठावर मा.आर.वाय गायकवाड, मा. एस.एस. सुर्यवंशी,
कल्याणशेट्टी मा. प्राचार्य अनित पोतदार व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय कांबळे



रयत शिक्षण संस्थेच्या शताब्दी वर्ष निमित्त सेवाग्राम आश्रम वर्धा येथे आयोजित केलेल्या कर्मवीरांचे जीवन व दर्शन या महाप्रदर्शनाची पहाणी करताना मान्यवर, सोबत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय कांबळे



## संपादक समिती

### अध्यक्ष
प्राचार्य डॉ. संजय कांबळे

### प्रमुख संपादक
प्रा. डॉ. वंदना मोहिते

### विभागीय संपादक
प्रा. डॉ. उमाप आबासाहेब (मराठी)
प्रा. डॉ. मोहिते वंदना (हिंदी)
प्रा. फासे निलेश (इंग्रजी)
प्रा. कोरडे शोभा (लायब्ररियन)
प्रा. मडावी आशा (सामाजिक शास्त्रे)
प्रा. पाटील कल्पना (फोटो विभाग)
प्रा. डॉ. मोहिते वंदना (अहवाल विभाग)

### विशेष सहाय्य
प्रा. मारूफ मुजावर
प्रा. शैलजा माने
श्री. भरत पवार
श्रीमती निता मोहिते

### मुद्रक
निर्मल अक्षरनिर्मिती प्रिंटींग प्रेस
पोवई नाका, सातारा.

### अक्षर संधान
निर्मल अक्षरनिर्मिती प्रिंटींग प्रेस
पोवई नाका, सातारा.

### मांडणी
प्रा. डॉ. वंदना मोहिते

### मुखपृष्ठ
श्री. विनायक संकपाळ

"स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद"-कर्मवीर

# सौ.मंगलताई रामचंद्र जगताप महिला महाविद्यालय,उंब्रज

ता. कराड, जि. सातारा-४१५ १०९




त्रिवेणी २०१९-२०

त्रिवेणी नियतकालिका सन २०१९-२०२०



"स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद"-कर्मवीर

## सौ.मंगलताई रामचंद्र जगताप महिला महाविद्यालय,उंब्रज

ता. कराड, जि. सातारा-४१५ १०९

## महाविद्यालयाची वैशिष्ट्ये

- विद्यापीठापेक्षा महाविद्यालयाचा निकाल अधिक
- विद्यार्थिनींच्या बौध्दिक व व्यक्तिमत्व विकासाचे अनेक उपक्रम
- मराठी, हिंदी, इंग्रजी, इतिहास व समाजशास्त्र इ. स्पेशल विषयांची सोय
- विविध शॉर्ट टर्म कोर्सेस
- अद्ययावत संगणक प्रयोगशाळा
- कर्मवीर विद्याप्रबोधिनी
- स्पर्धा परीक्षा केंद्र
- इंग्लिश स्पिकींग कोर्स
- सुसज्ज महिला वसतिगृह
- ज्युडो कराटे प्रशिक्षण
- ह्युमन राईटस् एज्युकेशन फाऊंडेशन कोर्स
- फॅशन डिझाईनिंग कोर्स
- ब्युटी अ‍ॅण्ड वेलनेस कोर्स
- भरतीपूर्व पोलिस प्रशिक्षण केंद्र
- नेव्ही/एअर फोर्स भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र
- स्पर्धा परीक्षेच्या अभ्यासासाठी स्वतंत्र अभ्यासिका
- सांस्कृतिक कार्यक्रमाव्दारे विद्यार्थिनींच्या कला गुणांना वाव
- भित्तीपत्रकाद्वारे विद्यार्थिनींच्या साहित्य गुणांना वाव
- क्रीडा विभागामार्फत अनेक खेळांचे प्रशिक्षण

## त्रिवेणी

दि प्रेस अ‍ॅण्ड रजिस्ट्रेशन ऑफ बुक्स नियमन फॉर्म ४ प्रमाणे आवश्यक माहिती-

प्रकाशन स्थळ :

सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महिला महाविद्यालय, उंब्रज

प्रकाशन काळ : वार्षिक

प्रकाशक : प्राचार्य डॉ. संजय कांबळे

राष्ट्रीयत्व : भारतीय

पत्ता : सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महिला महाविद्यालय, उंब्रज ता. कराड, जि. सातारा. ४१५ १०९.

दूरध्वनी : (०२१६४) २६४२३५

ई-मेल : yssmmuks@yahoo.co.in

संपादक : प्रा.डॉ. वंदना मोहिते

राष्ट्रीयत्व : भारतीय

पत्ता : सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महिला महाविद्यालय, उंब्रज ता. कराड, जि. सातारा. ४१५ १०९.

मुद्रक : श्री. स्वप्निल जाधव

राष्ट्रीयत्व : भारतीय

पत्ता : गाळा नं. ३,४,७,८ प्रेस्टीज चेंबर पोवई नाका, सातारा.

संगणक : श्री. स्वप्निल जाधव

राष्ट्रीयत्व : भारतीय

पत्ता : गाळा नं. ३,४,७,८ प्रेस्टीज चेंबर पोवई नाका, सातारा.

मालकी : रयत शिक्षण संस्थेचे,

सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महिला महाविद्यालय, उंब्रज ता. कराड, जि. सातारा.

प्राचार्य : डॉ. संजय कांबळे

या अंकातील साहित्यातून व्यक्त झालेली मते संबंधित लेखकांची आहेत. संपादक मंडळ त्या मताशी सहमत असेलच असे नाही.

## आमचे दैवत



संस्थापक
रयत शिक्षण संस्था, सातारा
पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील



रयत माऊली
सौ. लक्ष्मीबाई भाऊराव पाटील

# प्रेरणा



मा.खासदार डॉ. शरदचंद्रजी पवार साहेब
अध्यक्ष, रयत शिक्षण संस्था, सातारा.



मा. डॉ. अनिल पाटील
चेअरमन, रयत शिक्षण संस्था, सातारा.



मा. प्राचार्य डॉ. भाऊसाहेब कराळे
सचिव, रयत शिक्षण संस्था, सातारा.



मा. प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत



मा. प्राचार्य डॉ. अरुण आंधळे

त्रिवेणी २०१९-२०
रयत शिक्षण संस्थेचे,
सौ.मंगलताई रामचंद्र जगताप महिला महाविद्यालय,उंब्रज

# प्रगतीच्या पाऊल खुणा




"भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर" यांची शैक्षणिक विचारधारा या विषयावरील दि.६ डिसें.रोजी महाचर्चेमध्ये सहभागी महाविद्यायाचे प्राचार्य डॉ. संजय कांबळे



मराठी चित्रपट निर्माते व दिग्दर्शक मा. डॉ. जब्बार पटेल यांचेसमवेत महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ. संजय कांबळे व नॅक कोऑर्डिनेटर मा. प्रा. मनोहर माळगे



एस.जी.एम. कॉलेज, कराड येथे मराठी विभागाअंतर्गत प्रसार माध्यमासाठी लेखन व कौशल्या या विषयावर मार्गदर्शन करताना मा. उत्तम कांबळे, तसेच व्यासपीठावर उपस्थित डॉ. मोहन राजमाने प्रा. डॉ. संजय कांबळे, प्रा. डॉ. स्नेह पोळ



एस.जी.एम. कॉलेज, कराड येथे पदवीदान समारंभात आभार व्यक्त करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय कांबळे



भूगोल विभागाच्या वतीने वन्यजीव सप्ताह कार्यक्रमात बोलताना वनपरिक्षेत्र अधिकारी मा. श्री. विकास काळे व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय कांबळे, श्री. द. श्री. जाधव व इतर मान्यवर




कुंभोज येथे झालेल्या कार्यशाळेत प्राचार्य डॉ. संजय कांबळे व सहकारी प्राध्यापक



आर्टस अँण्ड कॉमर्स पुसेगाव येथील प्राध्यापकाची महाविद्यालयास सदिच्छा भेट



स्पर्धा परिक्षेची तयारी कशी करावी या कार्यक्रमाच्या वेळी मा. लिंगेश्वर फणसे यांचा सत्कार करत मा. आनंदराव होवाळे व्यासपीठावर प्रमुख वक्त्या मा. डॉ. ज्ञानदा फणसे (राष्ट्रीय रूर्बन अभिया ग्रामविकास विभाग, मंत्रालय मुंबई) सोबत महाविद्यायाचे प्राचार्य डॉ. संजय कांबळे



## प्राचार्य, डॉ. संजय कांबळे

### महाविद्यालय विकास समिती



डॉ. अनिल पाटील — चेअरमन, रयत शिक्षण संस्था, सातारा
प्राचार्य डॉ. भाऊसाहेब कराळे — सचिव, रयत शिक्षण संस्था, सातारा
प्राचार्य डॉ. के. जी. कानडे — स्थानिक प्रतिनिधी (शिक्षण)
श्री. द. श्री. जाधव (आबा) — स्थानिक प्रतिनिधी (उद्योजक)
श्री. रणजीत जगताप (आबा) — स्थानिक प्रतिनिधी (समाजसेवा)
प्राचार्य, डॉ. संजय कां[...] — स्थानिक प्रतिनिधी (सचिव)



प्रा. सुरेश सालुंखे — प्राचार्य नियुक्त
प्रा. मनोहर माळगे — समन्वयक, आय. क्यू. ए. सी.
प्रा. मारूफ मुजावर — प्राध्यापक प्रतिनिधी
प्रा. आशा महाडी — प्राध्यापक प्रतिनिधी
प्रा. कल्पना पाटील — प्राध्यापक प्रतिनिधी
श्रीमती विद्या भोसले — स्थानिक प्रतिनिधी (सशोधन)
श्री. भरत प[...] — शिक्षकेतर सेवक प्र[...]



# प्राचार्यांचे मनोगत

पद्मभूषण तिर्थरूप डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी ग्रामीण भागातील वंचित, दुर्बल व सर्वसामान्य व्यक्तींचे जीवनमान उंचावण्यासाठी दि. ४ ऑक्टोबर १९१९ रोजी काले येथे रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. शिक्षणाचा ग्रामीण भागातील विस्तार करण्याच्या हेतूने संस्थेने शैक्षणिक वर्ष १९८९ पासून विद्यार्थिनींना कला शाखेतून पदवीचे शिक्षण घेता यावे म्हणून उंब्रज येथे महिला महाविद्यालयाची स्थापना केली. आजच्या स्पर्धेच्या काळात विद्यार्थिनींना आत्मविश्वासाने सामोरे जाता यावे म्हणून महाविद्यालयामध्ये संपूर्ण गुणवत्ता वाढ प्रकल्प, कर्मवीर विद्याप्रबोधिनी अंतर्गत कौशल्यावर आधारित फॅशन डिझाइनिंग, ब्युटी अँन्ड वेलनेस, ऑफिस ऑटोमेशन, पाककला, प्राथमिक योगा, कराटे, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, विविध कोर्सेस सुरू आहेत. तसेच महाविद्यालयातील विद्यार्थिनींचे आदर्श व प्रभावी व्यक्तिमत्व घडावे म्हणून महाविद्यालयामध्ये कला, क्रीडा विभाग, राष्ट्रीय सेवा योजना, ग्रंथालय विभाग, प्लेसमेंट विभाग, समुपदेशन केंद्र, कमवा व शिका योजना, आविष्कार, युवा महोत्सव इ. विभाग कार्यरत आहेत.

जीवन आनंदी व सकारात्मक जगण्यासाठी सृजनशील साहित्याचे महत्त्व अनन्यसाधारण असते. विद्यार्थी जीवनात आपल्या मनातील भावना व्यक्त करता याव्यात म्हणून महाविद्यालयाच्या वतीने त्रिवेणी नियतकालिकाच्या माध्यमातून साहित्याविष्कार प्रत्येक वर्षी केला जातो. या वर्षाचा अंक रसिक वाचकाच्या हाती देत असताना आम्हाला मनस्वी आनंद होत आहे.

शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये शैक्षणिक कामकाज करत असताना रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन मा. डॉ. अनिल पाटील, सचिव मा. प्रिं.डॉ. भाऊसाहेब कराळे, सहसचिव, मा. प्रिं. डॉ. विजयसिंह सावंत, ऑडिटर मा. प्रिं. डॉ. अरूण आंधळे, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य मा. द. श्री. जाधव (आबा) मा. प्रिं. डॉ. के.जी.कानडे, मा. डॉ. रणजीत जगताप, जनरल बॉडीचे सदस्य, मा. प्रकाश चव्हाण इ. मान्यवरांचे नेहमीच मार्गदर्शन मिळाले. याबद्दल आम्ही महाविद्यालयाचे सर्व घटक सदैव ऋणी आहोत.

प्राचार्य
डॉ. एस. एम कांबळे



# संपादक

**प्रा. डॉ. वंदना मोहिते**

रसिकाग्रणी रसिक वाचकजन सन २०१९-२० चा त्रिवेणी नियतकालिक चा अंक वाचकांच्या हाती देताना मला खूप आनंद होत आहे.

बहरूनी यावी डहाळी .......डहाळी .......
स्वप्ने उमलावीत कोवळी .........कोवळी .........
कोवळया स्वप्नांतूनी उमलावी कळी ...........
कळयांनी मोहरावी पाकळी .........पाकळी

विद्यार्थिनींच्या साहितिक कलागुणांना वाव देण्यासाठी व महाविद्यालयाने घेतलेली उत्तुंग भरारी आणि विद्यार्थिनींनी मिळविलेले सुशय यांचे यथार्थ प्रतिबिंब म्हणजे 'त्रिवेणी' नियतकालिक गेली सहा वर्षे "त्रिवेणी" हा अंक प्रकाशित होत आहे. यातून नूतन कवी लेखक विदयार्थिनींना लेखन वाचनाची प्रेरणा मिळते. त्रिवेणी मधील मागील काही लेखांना पारितोषिकही मिळाले आहे.

'त्रिवेणी' चे अंतरंग विविध उपक्रमांनी बहरले आहे आणि त्याचे प्रतिबिंब फोटोंच्या माध्यमातून दिसून येते. महाविदयालयाचा निकाल १००% पेक्षा कमी केव्हाही नसतो. शैक्षणिक गुणवत्तेप्रमाणे क्रीडा क्षेत्रातही विद्यार्थिनी चमकताना दिसत आहेत. विविध ठिकाणी विदयार्थिनींनी स्पर्धेला जावून यश प्राप्त केले आहे. आणि सर्वात महत्वाचे २०१९-२० मध्ये मा. प्राचार्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस प्रशिक्षण केंद्र यशस्वीरीत्या सुरू झाले. यासाठी फिजिकल डायरेक्टर प्रा. विदया पाटील यांनी विशेष योगदान दिले.

आमच्या महाविदयालयाचे प्रेरणास्थान महाविदयालयाचे प्राचार्य डॉ. संजय कांबळे यांची जिद्द आणि चिकाटी मुळेच कोरोना सारखी महामारी पूर्ण जगात असताना सुद्धा त्रिवेणीस प्रेरणा मिळाली.तसेच विभागीय संपादक, इतर प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी, विदयार्थीनी यांचेही या नियतकालिकास बहुमोल सहकार्य मिळाले. सातारा येथील निर्मल प्रिंटिंग प्रेसचे मालक स्वप्निल जाधव व त्यांचे सर्व सहकारी यांचे मनस्वी आभार.

**प्रा. डॉ. वंदना मोहिते**
**(संपादक)**





# मराठी
## विभाग



शब्दांना नसते दुःख
शब्दांना सुखही नसते
ते वाहतात जे ओझे
ते तुमचे माझे असते !
-सुधीर मोघे

**विभागीय संपादक**
**प्रा. डॉ. आबासाहेब उमाप**

# अंतरंग

## गद्य विभाग


| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील:जीवन आणि कार्य – कु. सानिया मोमीन | | बी.ए.-भाग ३ | ५ |
| २) | रयत माऊली सौ. लक्ष्मीबाई पाटील:जीवन व कार्य | – कु. ज्योती सोनावले | बी.ए.-भाग ३ | ७ |
| ३) | महाभारत की धर्मयुद्ध? – | कु. श्रावणी थोरात | बी.ए.-भाग २ | ९ |
| ४) | इतिहासातील उपेक्षित कलावंत : बहिर्जी नाईक – | कु. श्रद्धा कुंभार | बी.ए.-भाग २ | १० |
| ५) | २१ व्या शतकातील स्त्री – | कु. साक्षी थोरात | बी.ए.-भाग १ | ११ |


## पद्य विभाग


| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | शिवसूर्य – | कु. मयुरी भोकरे | बी.ए.-भाग ३ | ६ |
| २) | राजमाता जिजाऊ – | कु. मयुरी भोकरे | बी.ए.-भाग ३ | ६ |
| ३) | स्त्री – | कु. कोमल वाघमारे | बी.ए.-भाग १ | ८ |
| ४) | काहीतरी करायचे आहे. – | कु. सुचिता संभापुरे | बी.ए.-भाग १ | ८ |
| ५) | अशक्य गोष्ट – | कु. कोमल वाघमारे | बी.ए.-भाग १ | १२ |
| ६) | कर्मवीर भाऊराव पाटील – | कु रिद्धी काटवटे | बी.ए.-भाग ३ | १२ |
| ७) | कर्मवीर – | कु. प्रणाली घाडगे | बी.ए.-भाग २ | १२ |
| ८) | रयत शिक्षण संस्था – | कु. ऋतुजा भोकरे | बी.ए.-भाग २ | १२ |
| ९) | शांताबाई – | कु. पूजा धरपडे | बी.ए.-भाग १ | १२ |






# पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील

कु. सानिया मोमीन
बी.ए.भाग -३ (इतिहास विभाग)

कर्मवीर भाऊराव पाटील उर्फ (अण्णा) हे एक आदर्श व्यक्ती होते. त्यांनी महाराष्ट्राच्या शैक्षणिक क्षेत्रात अभुतपूर्व क्रांती घडवून आणली ते जिद्दी व विलक्षण ध्येयनिष्ठ होते. सामान्यातील सामान्य माणसापर्यंत शिक्षण पोहोचले पाहिजे यासाठी त्यांनी अविरत प्रयत्न केले. बहुजन समाजाला ज्ञानाची संजीवनी देणारे ते एक महान धन्वंतरी होते. शिक्षणाच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक परिवर्तनाचे अपूर्व कार्य केले. श्रम, स्वावलंबन व समता या महान तत्वांचे ते उपासक व पाईक होते. जातीयतेच्या गराडयात सापडलेल्या अज्ञानी बहुजन समाजाला मुक्त करण्याचे कार्य त्यांनी केले त्यांच्या कार्यात ध्येयवाद होता. धंदेवाईकपणा नव्हता. त्यांनी शिक्षण प्रसाराचे कार्य हाती घेतले. त्यासाठी तन, मन, धन त्यांनी अर्पण केले कर्मवीरांनी महाराष्ट्रातील आम जनतेला आपल्या कार्याने ऋणाईत करून ठेवले आहे. अशा थोर व्यक्तीच्या जीवनपटाची माहिती करून घेणे आवश्यक आहे.

कर्मवीर भाऊराव पाटील यांचा जन्म २२ सप्टेंबर १८८७ रोजी कोल्हापूर जिल्हयातील कुंभोज या गावी झाला. त्यांचे ते आजोळ होते. त्यांचे गाव ऐतवडे हे होय. त्यांच्या वडिलांचे नाव पायगौडा व मातेचे नाव गंगामाई असे होते. त्यांचे वडील सरकारी नोकरीत होते. नोकरी निमित्त त्यांना तासगाव, दहिवडी, विटा, इ ठिकाणी फिरावे लागले. त्यामुळे भाऊरावांचीही वडीलांच्याबरोबर भटकंती झाली भाऊरावांचे मामा पैलवान होते. त्यांचा त्यांना फार लळा लागलेला होता. आईचा ओढाही माहेरकडेच असल्यामुळे बराच काळ ते आजोळीच असत. ते खेळकर होते. खेळात आपल्या सवंगडयांमध्ये ते नायकाची भूमिका करीत. त्यांच्या मामाचा मित्र सत्याप्पा होता. तो शूर, साहसी , उदार व कनवाळू होता. गोर-गरीबांना तो सहाय्य करी. श्रीमंताकडून मिळविलेले पैसे तो गोर-गरीबांना वाटून टाकी. अन्यायाचा तो कर्दनकाळ होता. पोलीस त्याला पकडण्यासाठी प्रयत्न करीत होते. त्याच्या चातुर्याच्या,चांगुलपणाच्या गोष्टी भाऊरावांच्या कानी पडत. सत्याप्पाचा भाऊरावांवर प्रभाव पडला. अन्यायाविरूद्ध बंड करण्याचे बाळकडू भाऊरावांनी त्यांच्याकडून मिळवले होते.

नोकरीनिमित्त वडिलांना अनेक ठिकाणी फिरावे लागल्यामुळे भाऊरावांचे प्राथमिक शिक्षण वेगवेगळया ठिकाणी झाले. पाचवी इयत्ता पास झाल्यानंतर त्यांना कोल्हापूरमधील राजाराम हायस्कुलमध्ये दाखल केले. जैन वसतिगृहात त्यांची राहण्याची व भोजनाची व्यवस्था करण्यात आली. जैन बोर्डिंगचे सुपरिटेंड श्रीयुत लठ्ठे हे शिस्तीचे भोक्ते होते. भाऊराव बोर्डिंगमधील बरेच नियम पाळत नसत. त्यांच्या मते ते नियम व्यक्ती स्वातंत्र्याच्या विरूद्ध होते. मिस क्लार्क या दलितांच्या वसतिगृहाच्या उद्घाटन समारंभाहून आलेल्या सर्वांनी अंघोळ केली तरच त्यांना जेवण दिले जाईल. असे लठ्ठे यांनी जाहीर केले. भाऊरावांनी तो नियम तोडला परिणामी त्यांना वसतिगृह सोडावे लागले. त्यांच्या आयुष्याला वेगळी कलाटणी मिळाली.

अभ्यासात भाऊरावांचे लक्ष नसे तरी कुस्ती, मल्लखांब यासारख्या खेळात ते नेहमी आघाडीवर असायचे. त्यामुळेच राजर्षी शाहू महाराजांच्या वाडयात त्यांना आश्रय मिळाला. त्यांच्या वाडयातच भाऊरावांनी सामाजिक सुधारणेचे बाळकडू घेतले. भाऊरावांचे १८ व्या वर्षी लग्न झाले. त्यांच्या पत्नीचे नाव लक्ष्मीबाई. शिक्षणक्रम बंद झाल्यामुळेच त्यांना व्यवसाय शोधणे गरजेच वाटू लागले. त्यांनी काही दिवस जवाहऱ्याच्या दुकानात

काम केले. संस्कृत विषयाच्या शिकवण्याही केल्या. किर्लोस्कर व ओगले कारखान्यातील उत्पादनाचे फिरते एजंट म्हणून त्यांनी काम पाहिले. ते काम करताना त्यांनी सर्व भारताचा प्रवास केला. भ्रमण करताना त्यांना भारतात एक गोष्ट कळून आली की विचार, उच्चार व आचार याचे उगमस्थान म्हणजे शिक्षण होय. सत्य, सामाजिक समता आणि धार्मिक व आर्थिक स्वातंत्र्य यांचा संगम म्हणजे शिक्षण होय. जोपर्यंत बहुजन समाजापर्यंत शिक्षणाचा प्रसार होत नाही तोपर्यंत आपल्या देशाचे पाऊल पुढे पडणार नाही. शिक्षण म्हणजे जनजागृती. जनजागृती म्हणजे समाजक्रांती आणि समाजक्रांतीतून नवसमाजनिर्मिती हे सूत्र त्यांनी या काळात आपल्या मनात पक्के केले.

याच प्रेरणेतून त्यांनी इ.स. १९१० मध्ये सांगली जिल्ह्यातील दुधगाव येथे शिक्षण प्रसारक संस्थेची स्थापना केली. महात्मा फुल्यांच्या सत्यशोधक समाजाचे ते पाईक होते. कोल्हापुरात किंग एडवर्ड यांच्या पुतळ्याला १९१४ मध्ये डांबर फासण्यात आले. त्या प्रकरणी लठ्ठे यांच्यावर संशय घेण्यात आला. भाऊरावांनी त्यांच्या विरोधात साक्ष दयावी म्हणून त्यांना फार छळण्यात आले. परंतु त्यांनी खोटी साक्ष दिली नाही. पोलिसांच्या छळाला कंटाळून त्यांनी आत्महत्या करण्यासाठी विहिरित उडी टाकली. परंतु विहिरीत पाणी नव्हते. त्यामुळे खरचटण्यापलीकडे काही झाले नाही. पुढे त्यांनी तावदानाच्या काचा खाल्ल्या, परंतु त्यातूनही ते बचावले. शेवटी या प्रकरणातून त्यांची सुटका झाली.

१९१९ साली कराड तालुक्यातील काले या गावी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. १९२४ मध्ये सातारा येथे 'छत्रपती शाहू बोर्डिंग हाऊस' काढले. काले येथे स्थापन झालेल्या संस्थेचे स्थलांतर सातारा येथे करण्यात आले. त्यांनी आपल्या संस्थेचे बोधचिन्ह वटवृक्ष निवडले. आज त्याचा सर्व महाराष्ट्रात विस्तार झाल्याचे आपणास दिसून येते. त्यांच्या शैक्षणिक कार्यात लक्ष्मीबाईचा हातभार फार मोठा होता. त्या दांपत्याने हाल-अपेष्टा सहन करून शिक्षणाचे मौलिक कार्य केले. लक्ष्मीबाईंनी एके प्रसंगी बोर्डिंगमधील मुलांना खाण्यासाठी काही नव्हते म्हणून मंगळसूत्र मोडले या गोष्टीवरून त्यांच्या मनात असलेल्या निस्सीम त्यागाची कल्पना येते. रयतेच्या शिक्षणासाठी ते अहोरात्र झगडले. स्वावलंबी शिक्षणाची कल्पना त्यांनी प्रत्यक्षात राबविली. स्वावलंबन, स्वाभिमान, स्वाध्याय व स्वातंत्र्य ही त्यांच्या शिक्षणाची चतुःसूत्री होती. रयत शिक्षण संस्थेमार्फत वसतिगृहे, प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, महाविद्यालये सुरू केली. त्यासाठी लागणारा पैसा त्यांनी सामान्य लोकांकडून जमा केला. अशा या थोर कर्मवीरांनी ९ मे १९५९ रोजी सर्वांचा निरोप घेतला.

शिवनेरीच्या कडेकपारी नाद तोफांचा गुंजला
थोर जिजाऊंच्या पोटी राजा शिवछत्रपती हा जन्मला
लहानपणीच कित्येक किल्ले जिंकून दिले स्वराज्याला
हाती घेऊन तलवारीला अभिषेक केला भवानीला
जिवापाड जपले त्यांनी मराठमोळ्या भगव्याला
शक्ती आणि युक्तीने हरवले यांनी खानाला
दुःख सोसले खूप मात्र सुखी ठेवले रयतेला
मावळ्यांना सोबत घेऊन यांनी काबीज केले दिल्लीला
मराठा म्हणून जन्मलो याचा अभिमान आहे आम्हांला
तुमचे पाऊल लाभले या महाराष्ट्राच्या मातीला
तुमची पुण्याई नेहमी असू दे एवढीच इच्छा देवाला
वाकुन मुजरा करतो माझ्या शिवछत्रपती राजाला



# राजमाता जिजाऊ

शिवबाजी माऊली, रयतेची साऊली
गोर गरिबांचा दलितांचा आसरा
राजमाता जिजाऊ तू

कणखर शब्दाने, तल्लख बुद्धीने
यवणांचा उच्छेद करण्यास लावलास
राजमाता जिजाऊ तू

आपलं मराठयांचं स्वतंत्र राज्य व्हावं
आयुष्यातली एकच इच्छा पूर्ण करण्याचा ध्यास होता.
राजमाता जिजाऊ तुला

पती शहाजी महाराज
आराध्य दैवतेच्या जगदंबेच्या आशीर्वादाने
अलौकीक पुत्र लाभला
राजमाता जिजाऊ तुला

जनतेचा कैवारी
तुझ्याच पोटी निपजला
प्रत्येक स्त्रीचा आदर्श
उत्तम माता फक्त
राजमाता जिजाऊ तू

कु. मयुरी भाकरे बी.ए. भाग - ३ (इतिहास विभाग)





# रयत माऊली सौ. लक्ष्मीबाई पाटील
## जीवन व कार्य

कु. सोनावले ज्योती शंकर
बी.ए.-३ (इतिहास विभाग)

सौ. लक्ष्मीबाईचा जन्म ७-६-१८९४ या दिवशी कुंभोज येथे झाला. भाऊरावांच्या वयापेक्षा त्या ७ वर्षांनी लहान होत्या. शंभर सव्वाशे वर्षांपूर्वीचा तो काळ जन्मतारखेची नोंद करणेही विचारांच्या बाहेरची गोष्ट होती. त्या काळाच्या रितिरिवाजानुसार लक्ष्मीबाईचे शिक्षणही झालेले नव्हते.

लक्ष्मीबाईचे शिक्षण नसले तरी, घरकामामध्ये त्या निपुण होत्या. स्वयंपाक-पाणी, धुणी-भांडी, दळण-कांडण, शेतीवाडीतील कामे त्यांना अवगत होती. त्याकाळी दळणाच्या गिरण्या नव्हत्या. रोज पहाटे पिठासाठी स्त्रियांना जात्यावर दळावे लागे. त्याकाळी घरोघरी जाती फिरू लागायची. दळताना गोड गाणी स्त्रिया म्हणत असत. ही गाणी पिढयान् पिढया चालत आलेली असायची. देवादिकांची गाणी, भक्तिगीते असायची, सासु-सासरे, बंधू-भगिनी यांच्यावर मायेची गाणी असायची मोठयांच्या कर्तबगारीची गाणी असायची. दळत असताना लहान मुले गाणी ऐकत आईच्या मांडीवर झोपत असत.

अंगमेहनतीमुळे, कामांमुळे, मोकळया हवेमुळे सामान्यपणाने स्त्रियांची प्रकृती काटक, दणकट असायची. नैसर्गिकरीत्या बाळंतपण होत असे. काही प्रसंगी शेतामध्ये काम करत असताना देखील बाळंतपण होत असे. प्रसूतीगृह, सिझरिंग हा कौतुकाचा प्रकार त्यावेळी नव्हता. दळण दळून झाल्यावर स्त्रिया घामाघुम होत असत. आखाडयात जसे पैलवान बैठका काढून घामाघुम होत असत. तसाच हा प्रकार म्हणावा लागेल.

लग्न ठरविताना चांगल्या स्वयंपाक करणारी शेतामध्ये काम करणारी अशी मुलगी पाहिली जाई. ती विनयाने वागणारी, थोरामोठयांचा मान ठेवणारी आहे. हे पाहिले जायचे. लक्ष्मीबाई या सर्वांमध्ये परिपूर्ण अशाच होत्या. लक्ष्मीबाईच्या सासूबाई गंगाबाई या कुंभोजच्या होत्या, वडिल नेमगोंडा पाटील एक सधन शेतकरी होते वारणा काठची सुपीक जमीन, पीकपाणी भरपूर पिकायचे. त्यांची गोरीपान दणकट प्रकृती होती.

लक्ष्मी ही आई-वडिलांची लाडकी होती. लग्नाचे वय झाले. त्याकाळी अगदी लहान वयातच विवाह होत असत. बालविवाहाची पद्धत होती. वधू वरास कडेवर घेऊनही विवाह होत असत. इतकेच नव्हे तर पाळण्याला बाशिंगे बांधुनही विवाह होत असत.असा हा काळ होता. पुढे वयाच्या बाराव्या, तेराव्या वर्षी मुलीचे लग्न झालेच पाहिजे असे धर्मबंधन मानले जायचे. प्रौढ माणसाचे लग्न करायचे झाल्यास १२-१३ वर्षाच्या आतील मुलींबरोबर लग्न करावे लागे. त्यामुळे तरूण मुलींच्या नशीबी वैधव्य यायचे.

लक्ष्मीबाई पाटील यांचा काळ फार सनातनी कर्मठ, काळ होता. सर्वत्र अज्ञानाचा अंधकार, कर्मठ, धर्म रूढीचे साम्राज्य होते. सोवळेओवळे फार कडक होते. जैन व ब्राम्हण समाजामध्ये कमालीचे सोवळेओवळे असे. पाणवठयावरून पाणी आणत असताना इतर जातीच्या माणसांचा स्पर्श चालत नसे. त्याकाळात स्त्री शिक्षण मोठे पाप समजले जाई. काळानुरूप लक्ष्मी बाईचे शिक्षण झाले नव्हते.

लक्ष्मीबाईच्या विवाहाकरिता माता-पिता वर संशोधनाच्यामागे लागले. लक्ष्मीचे वडील अण्णाप्पा पाटील हे नेमगोंडाच्या गंगाबाईच्या नात्यामधील होते. पण कुणी कुणाला विचारावे? मुलीची बाजू अण्णाप्पा पाटलांची होती. मध्यस्थी घालून नेमगोंडा पाटलांच्या घरी जाण्यास पाठविले. मगळ्यांचा विचारविनिमय झाला. दोन्ही घराणी लौकिक असलेली त्यामुळे पसंतीला वेळ लागला नाही. अशा प्रकारे त्यांचा विवाह घडून आला.

भाऊरावांच्या आयुष्याला कलाटणी मिळणारी एक घटना

पडली. पाटलांच्या घरी पाहुणे आलेले होते. जेवणाचा बेत होता. गोडधोड जेवण तयार केले. पाहुणे जेवायला बसले. गप्पागोष्टी सुरू होत्या. भाऊरावांच्या पत्नी लक्ष्मीबाई वाढण्याचे काम करीत होत्या. पाहुणे मंडळी पायगोंडांच्या कुटुंबाची विचारपूस करीत होते. पाहुण्यांनी विचारले, आपले चिरंजीव भाऊराव काय काम करतात?

भाऊरावाचे वडील म्हणाले, '' काही काम करत नाहीत, फक्त एकच महत्वाचे काम करतात.''

कोणते महत्वाचे काम करतात?''

'दोन वेळ जेवणाचे व गावभर फिरण्याचे '' असे ते म्हणाले.

बायकोच्या देखत झालेला अपमान भाऊरावांच्या जिव्हारी लागला. बायकोचे डोळेही पाण्याने भरून आले. लक्ष्मीबाईचे अश्रू भाऊरावांच्या ताटात पडले. भाऊराव उठले मनाचा निश्चय केला. काहीतरी करून दाखविले पाहिजे. असा मनाचा निर्धार करून भाऊराव घराच्या बाहेर पडले.

स्त्री साध्वीचे अश्रु हे अतिशक्तीशाली असतात. असे म्हंटले जाते. पतिनिष्ठ सीतेच्या अश्रुंनी 'रामायण' घडविले असा इतिहास आहे.

लक्ष्मीबाईंच्या अश्रुंनी भारत देशातील ऐतिहासिक अशी एक शिक्षण संस्था स्थापन झाली. सौ. लक्ष्मीबाईच्या अश्रूंनी जणू रयतेचेच रामायण लिहिले आणि रयत शिक्षण संस्थेची स्थापना झाली.



# स्त्री

हातात पेन आणि वही घेतली
कविता लिहायला सुरुवात केली
मनात विचार होते मी पण एक स्त्री आहे
मग स्त्रियांना सुख जास्त की दुःख जास्त ?

कशाला प्राधान्य द्यावे काय करावे?
कधी मुलगी म्हणून लाड होतात
तर कधी गर्भात मारले जाते
कधी चांगले शिक्षण मिळाले
प्रत्येक ठिकाणी मुली काम करत आहेत.
सन्मानाने जगणं आहे तर कुठे जगणं मुश्किल आहे

सतत एक भिती असते सुरक्षित जीवन का नाही?
लहान मुलीवर बलात्कार होत आहेत
असे शैतान का निर्माण होत आहेत?
कसे हे सगळे प्रश्न आहेत?
कोणी सोडविण्यासाठी पुढे येणार का?

स्त्रियांना दिवसरात्र सुरक्षितता मिळणारं का?
प्रत्येक घरात आई, सून, वहीनी ताई मुळे आनंद आहे
मग मुलीला जन्माला येऊन द्या,
त्यांनाही जगण्याचा अधिकार आहे,
त्यांना मारू नका.

कु. कोमल वाघमारे बी.ए.भाग - १

# काहीतरी करायचे आहे

जगात सगळेच जगत असतात
जगता जगता मरत असतात
असे जीवन जीवन नव्हे!

जगण्याला अर्थ असावा
मरणानेही परमार्थ शोधावा
असे ही जीवन काही नाही निरर्थक
आपल्या हाती त्यास करणे सार्थक
अशा या जीवनात
मला सुद्धा काहीतरी करायचे आहे
नवे क्षितीज, नवे आकाश

नवे जग शोधायचे आहे
माहित आहे
जगणं इतकं सोपं नसतं
या जगात
आपलं ध्येय गाठणं अवघड असतं.
तरी सुद्धा मला जगायचं आहे
हे गुढ जग अनुभवायचं आहे
माझं क्षितीज गाठायचं आहे
माझ्या आकांक्षेशी बोलायच आहे
माझं ध्येय जिंकायच आहे
त्यासाठीच मला काहीतरी करायचं आहे

कु. सुचिता संभापुरे बी.ए. भाग - १





# महाभारत
## की
## धर्मयुद्ध ?

कु. श्रावणी थोरात
बी.ए.भाग - २

महाभारत हे महाकाव्य म्हणजे भारतीय जनमानसात रूजलेले एक महामिथक आहे. महाभारत कथा माहीत नाही किंवा आवडत नाही. असा भारतीय माणूस सापडणे कठीणच. मानवी भाव भावनांचा, भावसंघर्षाचा आणि नाट्याचा जो असामान्य महागोफ या महाकाव्यात विनला गेला आहे. त्याला जागतिक वाङ्मयात तोड नाही. महाभारत कथेच्या या असामान्य वैशिष्ट्यांमुळे ती वाचकांना आणि कलावंतांना पुन्हा पुन्हा अवाहन करत राहते.

महाभारत कथेतील ज्या अनेक व्यक्तिरेखा भारतीय जनमानसात खोलवर रूतून बसल्या आहेत. त्यामध्ये कर्ण ही एक प्रमुख व्यक्तिरेखा आहे. कर्ण कथेला कवचकुंडलांची पुटं चढवण्यात आली असली तरी त्यापलीकडे उभा असलेला तत्कालीन वर्णव्यवस्थेशी संघर्ष देत आपली योग्यता सिद्ध करणारा कर्ण सतत आपले लक्ष वेधून घेत असतो.

त्याच्या व्यक्तिरेखेला असलेले कारूण हेच गडदगहिरे परिणाम कलावंतांना आकर्षित करत असावे. योग्यता असूनही पावलोपावली अवमानित झालेला, डावलला गेलेल्या कर्ण हे तेजोभंगाचे जिवंत प्रतिक आहे. भोवतालच्या विषम सामाजिक वातावरणात कर्णाची वेदना आजही तेवढयाच तीव्रपणे सामोरी येत राहते. आज आधुनिक काळात जगणाऱ्या माणसालाही कर्ण आपला जिवलग सखा वाटतो तो यामुळेच

आपल्याला महाभारताची कथा माहित असेलच. महाभारतात कुंती, भीम, युधिष्ठीर, अर्जुन, नकुल, सहदेव, द्रोपदी, दुर्योधन, दुःशासन, दुर्मुख, दुर्जय, दुर्धर्ष, दुर्मर्षण, दुःसह चित्र, उपचित्र, विविशती, विकर्ण, पुरूमित्र प्रथम. भीमबल, भीमरथ असे शभर कौरव व हे पाच पांडव आणि कर्ण अशी ही महाभारतातील अनेक पात्रे वेगवेगळया भूमिका वठवतात लहानपनापासून ते अगदी आजपर्यंत आपण ही कथा ऐकत आहोत आणि त्यात काळानुरूप वेगवेगळया मूल्यांची भर पडत जाते.

अनेक कथांप्रमाणेच या कथेतही नायक पक्ष आणि खलनायक पक्ष असतो. नायक पक्ष म्हणजे पांडव हे कौरवांचा पराभव करतात.एक प्रकारचे धर्मयुद्ध उद्भवते. या दरम्यानच्या प्रवासात असे लक्षात येते की कथेत दाखवल्या प्रमाणे युद्धाने फक्त हानीच होते. काही साध्य तर होत नाही. याचे वर्णन हे रविंद्र ठाकूर यांनी अत्यंत मार्मिकपणे त्यांनी त्यांच्या ''धर्मयुद्ध'' या ग्रंथात केले आहे.

धर्मयुद्ध या महाकथेत काही गोष्टी सिद्ध होतात की युद्ध केल्याने काही साध्य होत नाही फक्त हानीच होते. छलकपट करून कोणतीही स्पर्धा जिंकला येत नाही. युद्धात किंवा भांडणात फक्त एकाच संघाची चूक असते असे नाही. त्याला सर्व व्यक्ती जवाबदार असता पांडवांची आई कुंती चुकली, शकुणी मामा चुकला. द्रोणाचार्य चुकले मुख्य म्हणजे महाभारत होण्यापाठीमागे कौरवाची सर्वस्वी जबाबदार नाहीत तर पक्षपात करणारे गुरू द्रोणाचार्य जबाबदार आहेत इंद्रप्रस्थ नगरीत द्रोपदी आणि भीम यांनी दुर्योधनाचा केलेला अपमान जबाबदार आहे भर स्वयंवर मंडपात अनेक महारथीसमोर द्रोपदीने केलेला कर्णाचा अवमान जवाबदार आहे.

महाभारतीय महायुद्ध!
ते धर्मयुद्ध ही की अधर्मयुद्ध ?
संभ्रमात टाकणारा यक्षप्रश्न .....
त्या भव्य जीवननाट्याचा
वास्तवदर्शी आणि अभिनव वेध !
म्हणजेच महाभारत

# बहिर्जी नाईक

### इतिहासातील उपेक्षित कलावंत

कु. श्रद्धा कुंभार
बी.ए.भाग-२

मूळ बहुरूपी असलेले आणि नक्कल करणे व वेश बदलण्यात पारगत असलेले बहिर्जी नाईक त्यांचे या कलेतील कौशल्य पाहून राजे छत्रपती शिवाजी महाराज यांनी त्यांच्या गुप्तहेर खात्यात सामील केले. ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या गुप्तहेर खात्याचे प्रमुख होते. बहिर्जी नाईक यांच्या पूर्वेतिहासाबद्दल इतिहासात त्रोटक संदर्भ आहेत. शिवाजीराजांनी अठरापगड जातींना कर्तुत्व गाजवण्याची संधी दिली, यात रामोशी जातीच्या बहिर्जी नाईक यांचा समावेश होतो. बहिर्जी स्वराज्याशी कसे जोडले गेले याबाबतीत इतिहासकारांत वेगवेगळे मतप्रवाह आहेत. आपल्या जहागिरीच्या प्रदेशातील लांडग्या-कोल्हयांचा बंदोबस्त करण्यासाठी या लांडग्या-कोल्हयांना मारून त्यांचे शेपूट आणून देणाऱ्यास शिवरायांनी इनाम जाहिर केला, तेव्हा बहिर्जी नाईक यांनी सर्वांत जास्त शेपटया आणून दिल्या आणि त्यांना शिवरायांनी हेरले असे काही इतिहासकार मानतात.

फक्त वेशांतरच नाही तर समोरच्या माणसाच्या नकळत त्याच्या तोंडातून शब्द चोरण्याचे चातुर्य त्यांच्याकडे होते. ते विजापूरचा आदिलशहा आणि दिल्लीचा बादशहा यांच्याकडून पक्की माहिती घेऊन येत. हेर असल्याचा संशय जरी आला तरी कत्तल करणारे हे दोन्ही बादशहा नाईकांना एकदाही पकडू शकले नाहीत.

शिवाजी महाराजांच्या आयुष्यातील प्रत्येक घटनेत गुप्तहेर म्हणून त्यांचा सहभाग असायचा. त्यात अफजलखानाचा वध, पन्हाळयावरून सुटका, शाहिस्तेखानाची बोटे तोडणे, पुरंदरचा वेढा किंवा सुरतेची लूट अशा कित्येक प्रसंगात बहिर्जी नाईक महाराजांचे अर्धे काम पूर्ण करत असत. हया प्रत्येक घटनेत नाईकांनी शत्रूची इथंभूत माहिती महाराजांना दिली होती. महाराज बहिर्जींनी दिलेल्या सल्ल्याचा विचार करून पाऊल टाकत. शिवाजी महाराजांच्या प्रत्येक रोमहर्षक विजयाचा पाया बहिर्जी नाईक आणि त्यांच्या हेरखात्याने घातला असे म्हणल्यास अतिशयोक्तीचे ठरणार नाही आणि असे म्हणल्याने कोणावर अन्यायही होणार नाही.

बहिर्जी यांच्या नेतृत्वाखाली साधारण ३००० हेर कार्यरत होते असे इतिहासकार मानतात. हे हेरखाते इतके सक्षम होते की समकालीन इतिहास फंद फितुरीने भरलेला असूनदेखील महाराजांना संपूर्ण कारकिर्दीत एकदाही दगाफटका झाला नाही. इतक्या जुन्या काळात आणि तंत्रज्ञानाची साथ नसताना बहिर्जी नाईकांच्या हेरांनी माहितीचे संकलन, विश्लेषण इतक्या अचूकपणे कसे केले, भौगोलिक ज्ञान कसे मिळवले आणि ती माहिती योग्य वेळी इच्छित व्यक्तीपर्यंत कशी पोहोचवली हे एक कोडेच आहे. इतिहास अनेक प्रश्न अनुत्तरित ठेवतो तसा हाही प्रश्न इतिहासाने अनुत्तरित ठेवला आहे.

बहिर्जी नाईक आणि त्यांची यंत्रणा ही त्या काळातील सर्वश्रेष्ठ हेर यंत्रणा होती हे निर्विवाद सिद्ध होते. आज आपणास आदिलशहाचा हेर कोण? औरंगजेबाचा हेर कोण? हे विचारले तर माहित नसते; पण हेच शिवाजी महाराजांचा हेर कोण? हे विचारल्यावर पटकन आपल्यासमोर नाव येते ते 'बहिर्जी नाईक' यांचे.

गुप्तचर मग ते कोणत्याही काळातील असोत त्यांना ग्लॅमर नसते. कारण ते हातात नंगी तलवार घेऊन शत्रूस आव्हान देत नाहीत किंवा रोमहर्षक लढाया जिंकत नाहीत. त्यांचा पराक्रम लोकांसमोर येत नाही, कारण त्या पराक्रमाचे साक्षीदार नसतात. गुप्तचरांना शांततेच्या काळातही लढावे लागते. ही लढाई बहुतेक वेळा संयम आणि बुद्धी यांची असते. सोंग घेणे, वेषांतर करणे सोपे असते पण ते सोंग वठवणे कठीण; त्यासाठी बारकाईने अभ्यास करावा लागतो. गुप्तचरांच्या कामात प्रतिस्पर्ध्यावर अव्याहतपणे बौद्धिक कुरघोडी करणे अपेक्षित असते. वरील सर्व बाबींचा विचार करता बहिर्जी नाईक हे एक असामान्य व्यक्तिमत्व होते हे मान्य करावे लागेल.

बहिर्जी आणि त्यांच्या हेर व्यवस्थेची आताच्या हेरव्यवस्थांशी तुलना करताच येणार नाही. 'रॉ' बरोबर त्यांची तुलना करणे हास्यास्पद ठरेल. ' आयएसआय', 'सीआयए' शी त्यांची तुलना करणे बेजबाबदारपणाचे ठरेल. 'मोसाद'शी तुलना करता येईल पण ती उलटया बाजूने करावी लागेल म्हणजे मोसाद म्हणजे इस्त्राइले बहिर्जी असे म्हटल्यास ते जास्त चपलख ठरेल.

बहिर्जी नाईक फक्त गुप्तहेरच नाही तर लढवय्ये देखील होते. तलवारबाजीत-दांडपटयात ते माहीर होते. असे म्हटले जाते की, महाराजांच्या दरबारात नाईक जर वेशांतर करून आले असले तर ते फक्त महाराजच ओळखायचे. थोडक्यात दरबारात बहिर्जी नाईक नावाचा इसम नाहीच, अशी समजूत असायची.

म्हणजेच त्या काळातही आणि आताही बहिर्जी नामक कोणी व्यक्ती होती? हे कोणालाच माहित नाही. त्यांचे कार्य अनमोल आहे. त्याला कोणी उजेडात आणलेच नाही. खरोखरच बहिर्जी नाईक हे इतिहासातील एक दुर्लक्षित पात्र आहेत असे म्हणने चुकीचे ठरणार नाही !





# २१ व्या शतकातील स्त्री

कु. साक्षी थोरात
बी.ए.भाग - १

पूर्वीच्या काळात चूल संभाळण्यापासून तर आजच्या काळात एखादया देशाची सत्ता सांभाळण्यापर्यंतचा स्त्री च्या प्रगतीचा हा प्रवास थक्क करणारा आहे. जर्मनीच्या अंजेला मेर्केल, भारताच्या सोनिया गांधी, बांगलादेशच्या शेख हसीना, ऑस्ट्रेलियाच्या जुलीया गिलार्ड, म्यानमारच्या लोकशाहीसाठी झटणाऱ्या स्यू की ही स्त्री ने केलेल्या प्रगतीची काही उदाहरणे आहेत अर्थात पूर्वीच्या काळातही स्त्री ने केलेल्या प्रगतीची काही उदाहरणे आहेत. पण ती घराणेशाहीचा एक भाग होती व केवळ नामधारी स्वरूपाची होती बदलत्या काळाने दिलेल्या संधीचा योग्यपणे उपयोग करून, प्रत्येक वेळी स्वतःला पुरूषांच्या बरोबरीने सिद्ध करत स्त्री ने केलेली ही वाटचाल अद्‌भुत आहे.

सातत्याने बदलनारी व आधुनिकतेकडे सरकणारी सामाजिक परिस्थिती, स्त्रियांचा शिक्षणात वाढलेला सहभाग आणि परिणामी मिळणारे वैचारिक स्वतंत्र्य तसेच आर्थिक स्वावलंबन, पुरातन काळापासून चालत आलेल्या संस्कृतीचा होणारा ऱ्हास व तत्कालिक परिस्थितीला अनुसरून स्वतः मध्ये बदल करण्याचा मनुष्याचा स्वभाव ही स्त्रीच्या प्रगतीची महत्त्वाची कारणे आहेत. पाश्चिमात्य जीवन पध्दतीचा प्रसार माध्यमांनी झपाटयाने केलेला प्रसार व दळणवळनामध्ये झालेली प्रगती हे सुद्धा याला कारणीभूत आहेत.

स्त्रियांबाबतच्या अन्यायाच्या बातम्या जास्त असतात. नवविवाहितेच्या आत्महत्या, सुनेचा छळ करून मारले. अल्पवयीन मुलीवर बलात्कार करून तिची निर्घृण हत्या अशा बातम्याच जास्त असतात.

सुशिक्षित वर्गातही पहिली पत्नी सुगरण, सुस्वभावी, समजूतदार असली तरीही तिला मुलीच झाल्या तर तो दोष तिचाच समजून पतीचा दुसरा विवाह लावला जातो. मुलगा व मुलगी होणे हे स्त्रीच्या हातात नसते हे कळण्याइतपत समाज मागासलेला तर आता नाही ना? तरी पण या ठिकाणी काही गुन्हा नसताना स्त्रीला अन्याय सहन करावा लागतो. साधारणपणे लग्नाला ५-६ वर्षे झाली न घरात पाळणा हलण्याची चिन्हे दिसली नाही कि योगीबाबा, डॉक्टर तपासण्या चालू होतात.

आजवरचा इतिहास पाहिल्यास लक्षात येते की, येणाऱ्या काळात कधी ना कधी आजच्या स्त्रिया हया सर्व अडचणींवर मात तर करतीलच आणि बरोबरच कसे जगावे याचे उदाहरणपण प्रस्थापित करतील आणि याच येणाऱ्या काळात स्त्रियांचे महत्त्व सुद्धा अनन्य साधारणपणे वाढलेले असेल आणि याचे कारण एकविसाव्या शतकातील स्त्रियांचे कर्तुत्व आणि दिवसेंदिवस पुरूषांच्या तुलतेत त्यांचे वाढणारे प्रमाण असेल.

# अशक्य गोष्ट

शिंपल्यात धालून समुद्र,
कधी दाखवता येत नाही
चित्रात काढलेल्या फुलांचा
सुगंध कधी येत नाही
तुटलेला आरसा कधी
जोडता येत नाही
तोंडातून निघालेला शब्द
पुन्हा परत घेत येत नाही
छान श्रीमंताशी मैत्री कधी
करता येत नाही
निळ्या भोर गगनाचा अंत
कधी लागतच नाही
एकदा उडालेला विश्वास
परत जोडता येत नाही

कु. कोमल वाघमारे बी.ए.भाग – १

# कर्मवीर

हे महान कर्मवीरा
तू आम्हा सर्वांना दिलीस सावली
कधीच न मावळणारी
तू तळपत राहिलास सूर्यासारखा
ज्ञानाचा दिवा घेऊन
तू आम्हा सर्वांना ज्ञान पेरलेस
झोपडीत, वाडी वस्तीत
गावकुसा बाहेरच्या वस्तीत
झोपडीतला अंधार संपवण्यास
तू पायी चालत राहिलास
आज ती झोपडी प्रकाशमान झालीय
तुझ्या महाकार सावलीने
ही तुझी सावली
कधी मावळणार नाही
तू वटवृक्षासारखा
वर्षानुवर्षे अभेद्य राहशील

कु. प्रणाली घाडगे बी.ए.भाग –

# कर्मवीर भाऊराव पाटील

ज्यांनी स्वतः सोसले दुःख
निर्माण करण्यासाठी सुख
स्वतः उपाशी राहून भागवली इतरांची भूक
तेजाने ज्यांचे चमकत होते मुख
असे आमुचे अण्णा लाखात एक
स्वावलंबी शिक्षणाच्या वार्ता
ज्यांनी पोहोचवल्या रयतेच्या कानी
कोणाचेही भय न ठेवता निर्भीड केले मनी
ज्यांच्यापुढे झुकतात सर्वांच्याच माना
शिक्षण प्रसारासाठी जे फिरले रानावना
ते आमुचे आदर्श कर्मवीर अण्णा
अण्णा तुमची स्मृती
समाजामध्ये कायम राहणार
कर्मवीर भाऊराव पाटील
नाव जगात गर्जणार

कु. रिद्धी काटवटे
बी.ए.भाग-३
मराठी विभाग

# रयत शिक्षण संस्था

रयत शिक्षण संस्था आहे जगात एक
येथून विद्यार्थी जातात बनून सुरेख
आयुष्यात काही करण्यासाठी लागते हिंमत
भाऊरावांच्या धैर्यकथा वाचताना वाटते गंमत
शाळेत शिकताना मित्र-मैत्रीणी असतात
मोठे झाल्यावर शिक्षक बनतात आपल्यासाठी मार्गदर्शक खास
जीवनात काही बनण्यासाठी लागते जिद्द
भाऊरावांचे कार्य ऐकून
रयत सेवक करत नाहीत आळस,
म्हणूनच आपल्या संस्थेने गाठला कळस.
या रयत शिक्षण संस्थेने शिकवलं
दगडावर डोकं आपटण्यापेक्षा
दगडच फोडायचा डोक्याने
कर्मवीरांच्या श्रमाची बागच
फुलवायची विचाराने

कु. ऋतुजा भोकरे, बी.ए.भाग – २

# शांताबाई

शांताबायच्या डि.जे. तालाव
नाचू लागली पिढी
तोंडामध्ये बिडी
अन् मारू लागली उडी
संस्काराचा पाडा संपला
होऊ लागली यडी
दारूच्या आहारी जाऊन
झाली सारी बेवडी
आई बाप एकटक पाहते
घालुनी हाताची घडी
डि.जे. च्या त्या आवाजाने
पक्षांची पडती मडी
आजी आजोबा अन् आजारांच्या
छातीत भरती धडी
जोर जोराने नाचतात ही घोडी
शाळेत रोज जाता
खातात वर्गात छडी
शाळा सुटल्यावर दप्तर टाकुनी
जणू सल्मानवानी उघडी
सर्वच शांताबाय विचार करता
पडू लागली कोडी
हात जोडते तुम्हीच सांगा
सुटनार का ही तिढी ?







...त गाव मौजे तुपारी येथे राष्ट्रीय सेवा योजना विशेष संस्कार शिबीर उद्घाटन प्रसंगी प्रास्ताविक करताना प्रकल्प अधिकारी प्रा. सौ. कल्पना पाटील शिक्षक स्टाफ, एन.एस.एस. स्वयंसेविका सरपंच मा. नितिन पाटील व उपस्थिती ग्रामस्थ



पुरग्रस्त गाव मौजे तुपारी येथे राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेविकांनी गोळा केलेल्या प्लास्टीक कचरा, सोबत मा. नितिन पाटील व महाविद्यालयाचा स्टाफ



पुरग्रस्त गाव मौजे तुपारी येथे महिलाचे हिमोग्लोबीन, रक्तदाब चेकअप व धनुर्वात इंजेक्शन करताना डॉक्टर व सोबत एन.एस.एस. स्वयंसेविका व उपस्थित ग्रामस्थ महिला



पुरग्रस्त गाव मौजे तुपारी येथील ग्रामस्वच्छता करताना राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेविका



...ग्रस्त गाव मौजे तुपारी येथे एन.एस.एस. विशेष श्रमसंस्कार शिबीर समारोप प्रसंगी मार्गदर्शन करताना नगरसेवक मा. चंद्रशेठ कदम(पुणे) सोबत महाविद्यालयाचे ...चार्य, डॉ. संजय कांबळे, सरपंच मा. नितिन पाटील, मा. संजय पाटील(पलुस ता. माजी सभापती) एन.एस.एस. प्रकल्प अधिकारी प्रा. सौ. कल्पना पाटील



वडोली भिकेश्वर येथे वृक्षारोपन करताना एन.एस.एस. स्वयंसेविका, प्रा. एस. टी. साळुंखे एन.एस.एस. प्रकल्प अधिकारी प्रा. सौ. कल्पना पाटील



... एन.एस.एस. स्वयंसेविका, प्रकल्प अधिकारी प्रा. सौ. कल्पना पाटील



एन. एस. एस. विशेष श्रमसंस्कार शिबीरात पुरग्रस्त गाव तुपारी येथे स्मशान भूमीची स्वच्छता ...


हैद्राबाद येथे झालेल्या नॅशनल Belt Wrestling Competitions मध्ये 52 KG गोल्ड मेडल प्रणोती जाधव


शिवाजी युनिव्हरसिटी, कोल्हापूर Interzonal Wrestling Competition 2nd प्रणोती जाधव


अंतर विभागीय स्त्री/पुरुष योगा स्पर्धेतील विजेते विद्यार्थी, संयोजक व महाविद्यालयाचा स्टाफ


वार्षिक क्रीडा स्पर्धा प्रसंगी मार्गदर्शन करताना महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. संजय कांबळे सर्व स्टाफ व महाविद्यालयाच्या विद्यार्थीनी


वार्षिक क्रीडा स्पर्धे मध्ये कबड्डी खेळताना महाविद्यालयाच्या विद्यार्थीनी सोबत महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. संजय कांबळे व स्टाफ


वार्षिक क्रीडा स्पर्धे मध्ये खो-खो खेळताना महाविद्यालयाच्या विद्यार्थीनी व प्रेक्षक वर्ग


पोलिस भरती पूर्व प्रशिक्षण घेताना महाविद्यालयाच्या विद्यार्थीनी व प्रशिक्षक माजी सैनिक प्रदिप बाजीराव थोरात


पोलिस भरती पूर्व प्रशिक्षण घेताना महाविद्यालयाच्या विद्यार्थीनी व पाहणी करताना महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. संजय कांबळे व जिमखाना प्रमुख प्रा. विद्या पाटील प्रशिक्षक माजी सैनिक प्रदिप बाजीराव थोरात




वाङ्मय मंडळ अंतर्गत भित्तीपत्रकाचे उद्घाटन करताना मा. प्राचार्य डॉ. संजय कांबळे सोबत उपप्राचार्य मारूफ मुजावर, प्रा. वंदना मोहिते, प्राध्यापक वर्ग व विद्यार्थीनी


छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा येथील [illegible] आलेल्या समाजशास्त्र विभागाची महाविद्यालयास सदिच्छा भेट


जागतिक मानसिक आरोग्य दिना निमित्त मार्गदर्शन करताना सौ. शैलजा पाटील मानसोपचार तज्ञ कृष्णा हॉस्पिटल कराड व उपस्थितीत विद्यार्थीनी


अग्रणी कॉलेज अंतर्गत मृदा परीक्षण काळाची गरज एकदिवसीय कार्यशाळा प्रमुख वक्ते मा. राजेश यादव


हिंदी दिन समारोह प्रमुख पाहुण्या सौ. नलिनी जाधव यांच्या समवेत प्राचार्य, डॉ. संजय कांबळे उपप्राचार्य मारूफ मुजावर, प्रा. डॉ. वंदना मोहिते, प्रा. मनोहर माळवे प्रा. आबासाहेब उमाप व विद्यार्थीनी


माजी विद्यार्थीनी स्नेहमेळावा प्रमुख पाहुणे मा. द. श्री. जाधव(आबा) जनरल बॉडी सदस्य रयत शिक्षण संस्था, सातारा मनोगत व्यक्त करताना


माजी विद्यार्थीनी स्नेहमेळावा २०१९-२० उपस्थिती प्राध्यापक वर्ग व माजी विद्यार्थीनी


भूगोल विभागाच्यावतीने पर्यावरण संवर्धन दिन साजरा करताना प्रा. महाडी ए.बी. व विद्यार्थीनी

# विविध उपक्रम



अविष्कार संशोधन कार्यशाळेत बोलताना प्रा. डॉ. बोडरे व्यासपीठावर उपस्थितीत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय कांबळे व स्टाफ



अविष्कार स्पर्धेत पोस्टर प्रदर्शन करताना विद्यार्थीनी कु. ज्योती सोनावले बी.ए. भाग ३



सायबर सुरक्षा या विषयावर मार्गदर्शन करताना श्री. शेळके सर व उपस्थितीत महाविद्यालयाच्या विद्यार्थीनी



महिला समाज प्रबोधन व जाणीव जागृती या विषयावर बोलताना API श्री. लवटे व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय कांबळे, इतर मान्यवर व स्टाफ



आय.बी.पी.एस. सेंटर चे उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करताना श्री. रोशन कुमार बँक ऑफ महाराष्ट्र मॅनेजर सोबत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय कांबळे, उपप्राचार्य मारूफ मुजावर



संविधान दिना निमित्त प्रमुख पाहुणे ॲड. विनायक पाटील मनोगत व्यक्त करत सोबत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय कांबळे, उपप्राचार्य मारूफ मुजावर व इतर



महिलाविषयी कायदे व सुरक्षा या विषयावर मार्गदर्शन करताना ॲड. प्राजक्ता कुलकर्णी व महाविद्यालयाचा स्टाफ



जागतिक एड्स दिना निमित्त मार्गदर्शन करताना वैद्यकिय अधिकारी डॉ. संजय कुमार सो... महाविद्यालयाचे प्राचार्य व स्टाफ



# हिंदी विभाग

"झोली से पुए निकाल लिये,
बढते कपियों के हाथ दिये,
देखा भी नहीं उधर फिर कर
जिस ओर रहा वह भिक्षु इतर
चिल्लाया किया दूर दानव
बोला मैं-धन्य श्रेष्ठ मानव"

सूर्यकांत त्रिपाठी
"निराला"

विभागीय संपादक
प्रा. डॉ. वंदना मोहिते

# अंतरंग

## गद्य विभाग


| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १) | किसान की व्यथा | - | कु. माने स्नेहल | बी.ए.-भाग ३ | १५ |
| २) | हिंदी भाषा/नौकरी के अवसर | - | कु वायदंडे निकीत | बी.ए.-भाग २ | १६ |


## पद्य विभाग


| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १) | मर्द होता तो | - | कु. वाघमारे कोमल | बी.ए.-भाग १ | १७ |
| २) | नारी | - | कु. संभापुरे सुचिता | बी.ए.-भाग १ | १७ |
| ३) | बेटी | - | कु. संभापुरे सुचिता | बी.ए.-भाग १ | १७ |
| ४) | एक औरत के सरल प्रश्न | - | कु. वाघमारे कोमल | बी.ए.-भाग १ | १७ |
| ५) | शील बचाने उठ | - | कु. काटवटे लक्ष्मी | बी.ए.-भाग ३ | १८ |
| ६) | हकिकत | - | कु. कुंभार अनामिका | बी.ए.-भाग ३ | १८ |
| ७) | नारी की वेदना | - | कु. लक्ष्मी काटवटे | बी.ए.-भाग ३ | २० |


## शेरो शायरी


| | | | | |
|---|---|---|---|---|
| कु. वाघमारे कोमल | - | कु. कोमल वाघमारे | बी.ए.-भाग १ | १९ |
| कु. संभापुरे सुचिता | - | कु. सुचिता संभापुरे | बी.ए.-भाग १ | १९ |




# किसान की व्यथा



कु. माने स्नेहल राजेंद्र
बी.ए. भाग - ३

भारत एक कृषी प्रधान देश है। हमारी संपन्नता हमारे कृषि उत्पन्न पर निर्भर करती है। इस लक्ष्य की प्राप्ती के लिए भारतीय कृषक की एक बडी भूमिका है। वास्तव में भारत कृषकों की भूमि है हमारी ७५% जनता गावों में रहती है।

भारतीय किसान का सर्वत्र सम्मान होता है। वह ही संपूर्ण भारतवासियों के लिए अन्न एवं सब्जियाँ उत्पन्न करता है। पूरा साल भारतीय कृषक खेत जोतने बीज बोने एवं फसल उगाने में व्यस्त रहता है। अब कभी-कभी उसके मलिन-मुख पर भी ताजगी दिखाई देने लगती है। के शोषण जमिनदारों से तो उसे मुक्ति मिल ही चुकी है। परन्तु वह आज भी पूर्ण रूप से सुखी नहीं हैं। जिनके पास दो समय का भोजन नहीं है। शरीर ढकने के लिए कपडे नहीं है। टूटे - फूटे मकान और टुटी हुई झोपडियाँ आज भी उनके महल बने हुए है।

हालाँकि स्वतंत्रता प्राप्ति के बाद से किसान के जीवन में कुछ सुधार है। संस्कार ने ही । किसानों की और ध्यान देना शुरू किया है। उनके अभावो को कम करने के प्रयास में कई योजनाएँ सरकार द्वारा चलाई जा रही हैं। किसानों को समय-समय पर गांवों में ही कार्यशाला आयोजित कर कृषि विशेषज्ञों द्वारा कृषि क्षेत्र में हुए नए खोजों की जानकारी दी जा रही है।

इसके अलावा उन्हें रियायती दर पर उच्च स्तर के बीज, आधुनिक कृषि यंत्र, खाद आदि उपलब्ध कराए जा रहे है। उनकी आर्थिक स्थिति सुधारने व्यवसायिक खेती करने के लिए सरकार की और से बहुत कम प्याज दर पर ऋण दिया जा रहा है।

कर्मभूमि में काम करने के दौरान किसान चिलचिलाती धूप के दौरान तनिक भी विचलित नहीं होता। इसी तरह मूसलधार बारिश या फिर कडाके के ठंड की परवाह किए बगैर किसान अपने कृषि कार्य में जुटा रहता है। किसान के जीवन में विश्राम के लिए कोई जगह नहीं है।

वह निरंतर अपने कार्य में लगा रहता है। कितनी बाधाएँ उसे अपने कर्तव्यों से हिला नहीं सकती। अभाव का जीवन व्यतीत करने के बावजूद वह संतोषी प्रवृत्ति का होता है। इतना सब कुछ करने के बाद भी वह अपने जीवन की आवश्यकताएँ पूरी नहीं कर पाता। अभाव में उत्पन्न होने वाला किसान अभाव में जीता है और अभाव में इस संसार से बिदा ले लेता है।

अशिक्षा, अंधविश्वास तथा समाज में व्याप्त कुरीतियां उसके साथी हैं। सरकारी कर्मचारी, बडे जमीदार तथा व्यापारी उसके दुश्मन हैं, जो जीवन भर उसका शोषण करते रहते है। आज से पैंतिस वर्ष पहले के किसान और आज के किसान में बहुत अंतर आया है। स्वतंत्रता प्राप्ति के पश्चात किसान के चेहरे पर कुछ खुशी देखने को मिलती है।

समय अभाव के कारण उसकी आवश्यकताएँ भी बहुत सीमित होती हैं। उसकी सबसे बड़ी आवश्यकता पानी है। यदि समय पर वर्षा नहीं होती है तो किसान उदास हो जाता है। इनकी दिनचर्या रोजाना एक सी ही रहती है। किसान ब्रम्हमुहूर्त में सजग प्रहरी की भांति जग उठता है। वह घर में नहीं सोकर वहा सोता है जहाँ उनका पशुधन होता है।

उठते ही पशुधन की सेवा, इसके पश्चात अपनी कर्मभूमी खेत की और उसके पैर खुद-ब-खुद उठ जाते है। उसका स्नान, भोजन तथा विश्राम आदि जो कुछ भी होता है वह एकान्त वनस्थली में होता है। वह दिनभर कठोर परिश्रम करता है। स्नान भोजन आदि अक्सर वह खेतों पर ही करता है। सांझ ढलते समय वह कंधे पर हल बैलों को हांकता हुआ घर लौटता है।

कितनी मेहनत लगती है,
एक किसान को फसल उगाने में,
उसकी देख रेख में,
कितनी मेहनत लगती है,
उस पिता को वो अनाज खरीद कर लाने में
कितनी मेहनत लगती है
एक माँ को अनाज से रोटी बनाने में
और हमे कितना वक्त लगता है,
उस खाने की थाली को फैकने और बीच में छोड देने में
चाहे ना हो कदर खाने की,
पर कदर जरूर करना
उस किसान की, पिता की
और खाना खिलाने वाली माँ की......

# हिंदी
## भाषा नौकरी के अवसर

कु. चायदंडे निकीता (बी.ए.भाग-३)संकलित
Google.www.IndiaTV.in

अब हिंदी केवल राजभाषा तक सीमित नही है, बल्कि 'वैश्विक' बाजार में भी अपनी जगह बना रही है। हर साल १४ सितंबर को हिंदी दिवस मनाया जाता है और आमतौर पर इस दिन ही हिंदी भाषा की महत्ता, इसकी पहुंच, इसके सम्मान आदि को लेकर बात होती है। अब हिंदी केवल राजभाषा तक सीमित नही है, बल्कि वैश्विक बाजार में भी अपनी जगह बना रही है। आइए जानते है हिंदी भाषा पर अच्छी पकड हो तो कहा-कहा आपको मौका मिल सकता है, और आप अच्छी खासी कमाई कर सकते है।

**१) हिंदी अधिकारी :-**

विभिन्न बँक राजभाषा अधिकारी की नियुक्ति करते है। हिंदी भाषा अधिनियम का प्रावधान है कि सभी संस्थानों में हिंदी अधिकारी की नियुक्ति होगी। भारत सरकार और निजी संस्थानों में हिंदी अधिकारी के रूप में काम करने का अवसर मिल सकता है। देश-विदेश के सरकारी संस्थानो में हिंदी सलाहकार के रूप में भी नियुक्ति हो सकती है।

**२) अनुवादक या द्विभाषिया :-**

प्रिंट मीडिया सहित कई सरकारी विभागों में अनुवादक व हिंदी लेखक के रूप में मौके उपलब्ध है। कई संस्थान अनुवादकों को कॉन्ट्रॅक्ट आधार पर रोजगार देते है। अंग्रेजी या अन्य विदेशी भाषाओं में अपना लेख लिखनेवाले जाने-माने आंतरराष्ट्रीय लेखकों के लेख का अनुवाद हिंदी मे किया जाता है। हिंदी /अंग्रेजी में फिल्मों विज्ञापनों की लिपियों का अनुवाद भी ऐसा ही काम है। इसी तरह द्विभाषी दक्षता के साथ कोई भी फ्रीलान्स अनुवाद के रूप में काम कर सकता है और अपनी ट्रांसलेशन कंपनी भी खोल सकता है।

**३) मीडिया :-**

टीवी और रेडिओ चैनल्स और पत्रिकाओं/समाचार पत्रों के हिंदी संस्करणों में हुई बढोतरी के कारण इन क्षेत्रों में भी नौकरियों के अवसर कई गुणा बढ रहे है। हिंदी पत्रकारिता के क्षेत्र संपादको, पत्रकारों, संवाददाताओं, उपसंपादक, अँकर आदि की आवश्यकता होती है। इन लोगों का अधिकांश कार्य हिंदी में होता है। हिंदी में शैक्षणिक योग्यता रखने के साथ-साथ पत्रकारिता जनसंचार में डिग्री/डिप्लोमा की योग्यता के साथ एक से अधिक स्थानों पर नौकरी का अवसर पा सकते है।

**४) टीचिंग :-**

टीचिंग का प्रोफेशन तो सदाबहार है। देश के प्रमुख स्कूल-कॉलेजों में नर्सरी से लेकर पी.जी लेवल तक टीचिंग का स्कोप है। जब की विदेशी संस्थानों में भी हिंदी अध्यापकों की नियुक्ती होती है। हिंदी से बी.ए. या बी.एड. करने के बाद स्कूलों में हिंदी अध्यापक की नौकरी मिल जाती है। कॉलेज के स्तर पर अध्यापन करले वाले छात्रो को एम.ए के बाद एम.फिल और पीएचडी करने के बाद कॉलेज में प्रवक्ता का पद मिल सकता है। पी.एच.डी होल्डर कॉलेज व विश्वविद्यालय स्तर पर देश मे कही भी लेक्चरर की नौकरी पा सकते है। अध्यापन के लंबे अनुभव पर वे रीडर या प्रोफेसर भी बन सकते है।

**६) इंटरनेट :-**

आज हिंदी की कई वेबसाईट उपलब्ध है। विभिन्न हिंदी पत्र-पत्रिकाओं के पोर्टला एवं ब्लॉग भी इंटरनेट पर है। ऐसे में पोर्टल पर भी जॉब के अवसर उपलब्ध होने लगे है।

**७) सॉफ्टवेअर :-**

हिंदी सॉफ्टवेअर की जरूरत के कारण हिंदी भाषी छात्रों को भी इस क्षेत्र में अच्छे अवसर मिल रहे है।

**८) प्रतियोगी परिक्षा :-**

हिंदी से स्नातक करने के बाद कई प्रतियोगी परिक्षाओं में शामिल होकर बँक, न्यायिक सेवा, सिविल सर्विस और स्टेट सर्विस के अलावा रेलवे या बँक आदि में भी नौकरी के बेहतर अवसर हो सकते है।



# मर्द होता तो

मर्द होता तो कभी बलात्कार नही करता,
माँ की कोख कभी शर्मशार नही करता,
मर्द होता तो लडकियों पर नही टूटता,
मर्द होता तो उनकी इज्जत नही लूटता,
मर्द तो हमेशा दिलो को जीतता है,
लड़की को कुचलना तो नामर्दो की नीचता है,
बहन, बेटी मर्द के साये मे पलती है,
मर्द की जान माँ की दुआ से चलती है,
मर्द होता तो तेजाब नही फेकता उसके शरीर पर,
मर्द होता तो मिट जाता अपनी हीर पर,
मर्द होता तो उनको कोठो पर नही देता,
मर्द होता तो बचियो के नाजुक बदन से नही खेलता,
मर्द होता तो बचियो को माँ की कोख से नही धकेलता,
फिर भी तू खूद को मर्द कहता है,
अरे तुझसे अच्छा तो नामर्द (हिजडा) रहता है

कोमल अरूण वाघमारे बी.ए.भाग - १

# बेटी

मिलना हैं जन्नत जिन्हें उलको मिली हैं बेटियाँ।
बाग सूना रहा जिनका बनकर खिली है, बेटियाँ,
बोझ जो समझे उन्हें और रास्ते का काँटा भी,
पिता की मजबूरी देख ढलती गयी है बेटियाँ,
माँ-बाप के तंग हाल में भी ढलती गयी है बेटियाँ,
इच्छा कबूल माँ-बाप की करती गयी है बेटियाँ,
माँगना कुछ भी नहीं बस माँ- बाप की सेवा हैं करती
सदा घर की इज्जत के लिए मरती गयी हैं बेटियाँ ।

संभापुरे सुचिता प्रकाश बी.ए.भाग - १

# नारी

जहाँ झाँसी की मनु उठा तलवार, बनी थी लक्ष्मीबाई,
उसी धारा पर आज की नारी, फिर क्यूँ है सकुचाई।
बहुत हो रहे जुल्म अब उपर, और बहुत आघात,
अब क्यूँ सहे तू अत्याचार, और क्यूँ दाबे तू मन में बात ।
तुमने तो है बहुत सहा, नहीं मिला बराबर का मान,
मिला कदम अब पुरूषों से, बढा नारी का सम्मान।
याद करो उस नारी को, जो लाई थी देश में आँधी,
बनी देश की महिला मुखिया पहली " इंदिरा गांधी"।
मान बढाया जिसने देश का देकर अपना स्वर
कहते जिनको " स्वर कोकिला" नाम लता मंगेशकर
याद कर इनहि नारी को, बढ़ा अब इच्छाशक्ति
निकल आ परदे के बाहर, बन जा देश की प्रगति।

संभापुरे सुचिता प्रकाश बी.ए.भाग - १

# एक औरत के सरल प्रश्न

देह मेरी, - हल्दी तेरे नाम की।
हथेली मेरी -मेहंदी तुम्हारे नाम की।
सिर मेरा, - चुनरी तुम्हारे नाम की।
मांग मेरी,- सिन्दूर तुम्हारे नाम का।
माथा मेरा,- बिंदिया तुम्हारे नाम की।
नाक मेरी, -नथनी तुम्हारे नाम की।
गला मेरा, - मंगलसूत्र तुम्हारे नाम का।
कलाई मेरी, -चुडियाँ तुम्हारे नाम की।
ऊंगलियाँ मेरी,-बिछुए तुम्हारे नाम के।
बडोंकी चरण वंदना मै करूँ,
और सदा सुहागन का आशीष तुम्हारे नाम का।
यहाँ तक की कोख मेरी, खून मेरा, दूध मेरा और बच्चे तुम्हारे नाम के।
घर के दरवाजे पर लगी नेमप्लेट तुम्हारे नाम की।
और तो और मेरे अपने नाम के सम्मुख लिख गोत्र भी मेरा नही तुम्हारे नाम का ।
सबकुछ तो तुम्हारे नाम का
नम्रता से पूछती हूँ,
आखिर तुम्हारे पास क्या है मेरे नाम का?

कोमल अरूण वाघमारे बी.ए.भाग - १

# शील बचाने उठ

चल उठ स्त्री बांध कफन अब
कोई रक्षक नही आएगा
हत्या - शोषण - बलात्कार से अब
कोई तुझे नही बचाएगा ।
ये कलयुग है निर्ममता यहाँ
स्नेह की आस किससे लगाओगी?
स्तन पर नजरे टिकाए बैठे
दुःशासन से ना बच पाओगी।
कैसी आस लगा रखी है तुमने
जिस्म के ठेकेदारों से ?
खुद की रक्षा खुद के सिर है
कब तक बेचारी कहलाओगी?
वस्त्र कोई खींचेगा तुम्हारा
तुम पर मर्दानगी दिखाएगा
ऐसे बलात्कारियों को तुम
कब नामर्द- नपुंसक बनाओगी?
छोड संताप उठ जा अब भोग्या
कोई नही बचाने अब आएगा
'नूतन' आगमन के साथ करो सामना
मौन ईश्वर सर झुकाएगा ।
शस्त्र कब तक ना उठाओगी?
सदियों से उपभोग की वस्तू
स्वयं को कितना सताओगी?
शील बचाने खड्ग उठा लो

कु. काटवटे लक्ष्मी मनोहर बी.ए. भाग - ३

# हकिकत

ड्ड' दोस्ती का शुक्रिया कुछ इस तरह अदा करूँ,
आप भुल भी जाओ तो मै हर पल याद करूँ,
खुदाने बस सिखाया हैं मुझे,
कि खुद से पहले आपके लिए दुआ करूँ।

शुक्रिया ऐ दोस्त। मेरी जिन्दगी मे आने के लिए,
हर लम्हे को इतना खुबसूरत बनाने के लिए,
तू है तो हर खुशी पर मेरा नाम लिखा गया है,
शुक्रिया मूझे इतना खुशनसीब बनाने के लिए।
कभी इसका दिल रखा
और कभी उसका दिल
रखा, इस कश्मकश मे
भूल गए, खुद का दिल
कहाँ रखा........
किताबों में ही जिंदगी दिखने लग जाती है
जब जिंदगी का कोई मकसद हो
वरना सारी उम्र गुजर जाती है किस्मत
खराब थी कहते कहते..... !!
अगर कोई लड़की सुन कर भी
चुप रहे ।
तो यह मत समझना कि वह
कमजोर है।
बल्कि सच तो यह है कि वह अपने
मम्मी पापा के दिए हुए संस्कारो
से बंधी हुई है।

कु. माने स्नेहल राजेंद्र बी.ए.भाग - ३



# शेरो-शायरी

मुस्कान का कोई मोल नहीं होता,
कुछ रिश्तो का तोल नहीं होता,
दोस्त तो मिल जाते है हर रास्ते पर,
लेकिन हर कोई आपकी तरह अनमोल
नही होता ।
किस हद तक जाना है
ये कौन जानता है,
किस मंजिल को पाना है,
ये कौन जानता है,
दोस्ती के दो पल जी भर के जी लो,
किस रोज बिछड जाना है,
ये कौन जानता है।

दर्द मे कोई मौसम प्यारा नही होता,
दिल हो प्यासा तो पानी से गुजारा नहीं होता,
कोई देखे तो हमारी बेबसी
हम सब के हो जाने पर कोई हमारा नही होता,

हर सपने को अपनी आँखो मे रखो
मार्ग नही मंजिल को अपने यादो मे रखो
हर सफलता आपकी होगी
बस लक्ष अपने निगाहो मे रखो।

कु. कोमल अरूण वाघमारे बी.ए. भाग - १

लोग कहते हैं अच्छे लोग मरकर
अकसर सितारे बन जाते है।
लेकिन हमारा मानना यह है कि,
आसमान के सितारे टूटकर ही
आप जैसे माँ-बाप बनते है।

धरती के दोष छुपाने के लिए गगन होता है,
धरती के दोष छुपाने के लिए तन होता है,
मरने के बाद भी कुछ दोष रह जाते हैं,
जिन्हे छिपाने के लिए कफन होता है।

खुदा करे हमारी दोस्ती ऐसी हो की,
चोट तुम्हे लगे तो दर्द मुझे हो,
दिल तुम्हारा धडके और धडकन मेरी हो,
नोकरी तुम्हें लगे तो सैलरी मेरी हो,
प्यार तुम्हे हुए और तुम्हारी मेरी हो......

प्यार करने वालों की
किस्मत बुरी होती है,
हर मुलाकात जुदाई से,
जुडी होती है,
वक्त मिले तो रिश्तो की किताब पढ लेना
दोस्ती हर रिश्ते से बडी होती है।

माँ माँ होती है,
माँ खुदा होती है,
उसका एहसास तब होता है,
जब ओ हमसे जुदा होती है।

कु. संभापुरे मुचिता प्रकाश बी.ए. भाग - १

# नारी की वेदना

बहुत किया वो जुल्म तुमने
सहती रही मैं बस दिल थामे,
बढती गई लालसा तुम्हारी,
फिर भी चुप थी वो मासुम नारी,
पर, अब और सहुँगी अत्याचार नही
टूट चुका वो बाँध सब्र का,
और कष्ट स्वीकार नही।

पहले मैने माफ किया,
पर इसे तुमने कमजोरी समझा
तोड दी तुमने परकाष्ठा सहनशील की,
और मुझको इतना मजबूर किया,
रोक सकती मुझे अब कोई दीवार नही।
टूट चुका वो बाँध सब्र का,
और कष्ट स्वीकार नही।

नारी पर अधिकारी जता कर,
खुद को मर्द समझते हो,
जब जननी इस नारी का,
क्या थोडा भी दर्द समझते हो,
हूँ मैं भी इंसान कोई पशु का अवतार नहीं ।
टूट चुका वो बाँध सब्र का
और कष्ट स्वीकार नही ।

कभी सीता बनकर दी अग्निपरीक्षा,
कभी दुर्गा बन बुराईयों का संहार किया,
तो कभी माँ बनकर दी प्रथम शिक्षा,
तो कभी पत्नी बनकर प्यार किया,
तू ही बता क्या मैं बराबरी की हकदार नहीं ।
टूट चुका वो बांध सब्र का,
और कष्ट स्वीकार नहीं।

कु. काटवटे लक्ष्मी मनोहर बी.ए. भाग - ३






शिक्षक दिन समारंभ प्रसंगी प्राचार्य. डॉ. संजय कांबळे, प्राचार्य अनिल पोतदार प्राचार्या प्रिती करडे, महाविद्यालयाचा स्टाफ व विद्यार्थीनी


सावित्रीबाई फुले जयंती निमित्त [illegible]
उपस्थित प्राचार्य डॉ. संजय कांबळे, [illegible] महाविद्यालयाचा स्टाफ


ऑगस्ट क्रांती दिन निमित्त मार्गदर्शन करताना ॲड. संभाजीराव मोहिते, व्यासपीठावर उपस्थितीत प्राचार्य, डॉ. संजय कांबळे, उपप्राचार्य व स्टाफ


क्रीडा दिना निमित्त मार्गदर्शन करताना प्रा.डॉ. [illegible] पाटील (कृष्णा महाविद्यालय [illegible])
व्यासपीठ उपस्थितीत प्राचार्य, डॉ. संजय कांबळे, उपप्राचार्य [illegible] व प्रा. [illegible] पाटील


अवयव दान जाणीव जागृती कार्यक्रमास उपस्थितीत डॉ. देशपांडे (नाशिक) व त्याचे सहकारी डॉक्टर, स्टाफ आणि प्राचार्य डॉ. संजय कांबळे व महाविद्यालयाचा स्टाफ


२१ जून आंतरराष्ट्रीय योगा दिन साजरा करताना महाविद्यालयाचा स्टाफ


उद्योजकता विकास समितीच्या वतीने ट्रेड फेअरचे उद्घाटन
प्रा. डॉ. मच्छिंद्र सकटे व महाविद्यालयाचा स्टाफ


ट्रेड फेअर निमित्ताने विविध पदार्थांचा स्वाद घेताना विद्यार्थी व शिक्षक



प्राचार्य डॉ. संजय कांबळे यांच्या समवेत त्रिवेणी संपादक मंडळ व प्रमुख संपादक डॉ. वंदना मोहिते



प्राचार्य डॉ.संजय कांबळे यांच्या समवेत प्राध्यापक वर्ग



प्राचार्य डॉ.संजय कांबळे यांच्या समवेत महाविद्यालयातील शिक्षकेतर सेवक वर्ग





Hon. Pri. Dr. Sanjay Kamble, API Ajay Gorad,
Dr. M.D. Sakate Provided School bag to affected flood students.



बी.ए. भाग ३ इतिहास विभागाची ऐतिहासिक सहल वसंत गड किल्ला प्रा. सुरेश साळुंखे,
प्रा. मारूती तांबे सोबत विद्यार्थीनी




रोना बाबत जागृती कार्यक्रम डॉ. संजय कुंभार वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र उंब्रज
सोबत प्राचार्य डॉ. संजय कांबळे व स्टाफ



२ ऑक्टोबर महात्मा गांधी जयंती निमित्त चरखा प्रात्यक्षिक देताना मा. जिवन इंगळे,
मा. इनामदार गुरूजी (ज्येष्ठ गांधीवादी) सोबत मा. प्राचार्य डॉ. संजय कांबळे व एन.एस.एस. समिती



ाशास्त्र विभाग आयोजित व्यक्तिमत्व विकास या विषयावर मार्गदर्शन करताना
. सौरभ भोसले, संस्थापक व्हिजनसीवाय पुणे सोबत प्रा. डॉ. मनिषा पाटील
व महाविद्यालयाचा स्टाफ




रयत शिक्षण संस्था शताब्दी महोत्सावा निमित्त गीतगंधाली कार्यक्रम सादर करताना
प्रा. संभाजी पाटील, प्रा. प्रज्ञा पवार, व सहकारी



पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जयंतीनिमित्त चित्ररथ मिरवणूक



लोकमान्य टिळक यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमेस विनम्र अभिवादन करताना महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ. संजय कांबळे व स्टाफ



पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जयंतीनिमित्त प्र[...] करताना महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ. संजय कांबळे व स्टा[...]



आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिनानिमित्त मार्गदर्शन करताना आय.क्यु.ए.सी. कोऑर्डिनेटर प्रा. माळगे एम. एल. सर



# English Section

" One best book is
equal to a hundred
good friends, but
one good friend is
equal to a library"

Dr. A.P.J. Abdul Kalam

**Section Editor**
Mr. Phase N. T.

# Index


**PROSE SECTION**

1. Maharani Yesubai Bhosale - Miss. Sadhana Sankpal B.A.III 22
2. International Women Day 8th March - Miss Priyanka Babar B.A.III 24
3. Citizenship Amedment Act CAA - Miss Anuja Joshi B.A.III 26
4. National Register of Citizens NRC - Miss Amruta Nikam B.A.III 27

**POETRY SECTION**

1. Success - Miss. Mruali Gaikwad B.A.III 23
2. The wonder of Nature - Miss. Pragati Shinde B.A.III 23
3. What he gave me ? - Miss Priyanka Babar B.A.III 25
4. Success - Miss Priyanka Babar B.A.III 25
5. If I could go back in time ? - Miss Shrawani Thorat B.A.III 25






# Maharani
## Yesubai Bhosale

Miss Sadhna Sankpal
( B.A. III)

In Maratha history, scarcely has a personality that so respected at the time been so ignored later. The story of Yesubai, queen to Chhatrapati Sambhaji is of a person who lived through the turbulent times of Maratha history from the time of her marriage in 1669, until her death around 1730. In effect, she was witness to the coronation of Shivaji Raja at Raigad in 1674, the momentous was against the Mughals from 1681 until 1707, the March of Maratha armies to Delhi in 1719, and the firmly established rule of her son Shahu, with Balaji Vishwanath and Bajirao as his peshwas.

The story of the Maratha Empire begining with the founaing of the kingdom by Chhatrapati Shivaji, who in the last four years of his life created an empire extending to the lower most reaches of the Deccan. In the years after his death, his son Chhatrapati Sambhaji of strenuously fought enemies on many fronts; the Siddi, the Portuguese, the Bijapur kingdom and finally, the Mughals under Aurangazeb.

In 1689, Aurangazeb's General Mukarrab Khan made a dash into the deep recesses of the Konkan costal strip and captured the Maratha king, who was put to a cruel death a few weeks later at Vadhu near Koregaon Bhima.

In the next few months, the Maratha capital Raigad was surrounded fell into Mughal hands under an army led by I liquid khan. Rajaram the younger son of Shivaji Raja escaped to the deep south and led a resistance for eight long.

Yesubai was then lodged in the 'gulal bar', a crimson tented section of the Mughal camp with her eight year old son Shahu. Aurangazeb treated Shahu as a pawn in his fight with the Marathas, even sending him outside his camp to try and bring the Maratha Generals into the Mughal fold, pretending that he would hand over the Deccan to Shahu as his representative and then return to Delhi. The ploy did not work.

Later, he attempted to convert Shahu to Islam, a move Yesubai deflected with the help of Aurangazeb's daughter Zinat Unnissa.

There have been certain powerful personalities in our past, we should all be proud of as Indians. History of Yesubai is one such thing that we should at least be aware about. Most of us might know that Yesubai was the second king of Marathas and the eldest son of Chhatrapati Shivaji Maharaj. Yesubai Shirke was the daughter of Pilajirao Shirke, who was a Maratha Sardar under Chhatrapati Shivaji. As per legends, Yesubai was very good looking and intelligent at the same time another interesting aspect about Yesubai's history is that she fought against her own brother Ganoji Shirke, when he wanted " Jangir" from Sambhaji. Sambhaji and Yesubai were companions for life. She had two children Bhavani Bai and Shahu. Yesubai was kept captive for 10 more years so that Shahu danced to the tunes of Mughals and signed to their treaties. Peshwa Balaji Vishwanath Bhat helped Yesubai to get out for Mughal's prison in 1719 after negotiating a big treaty.

It is still not very clear as to how Yesubai died. Several theories have been put forth to find reasons of Yesubai's death however, the exact date of Yesubai's death is also not known.

I don't know, what is Aim?
But I know........
I can live a few moments without breathing
But I can't live without my Aim.

I don't know, what is Maturing?
But I know maturity is not when
We start speaking big things but
It is when we start understanding small things.

I don't know, what are feelings ?
But I know........
Don't make our feelings like the garden
Everybody walk on it........
But let it be like sky, everybody
Wishes to touch it

I don't know, what is enjoyment ?
But I know.......
Enjoy yourself when you can afford it.

I don't know, what is choice ?
But I know......
If you have choice, the choose the best
If you have no choice, then do the best.

I don't know what is excuse ?
But I know .....
Success and excuse do not walk together.

If you want excuse
Forget about success and
If you want success don't
Give any excuse




Miss. Mrunali Gaikwad
( B.A.III)

## The Wonder of Nature

Nature ! Nature! So lushand green
The wonder of wonder anyone has seen,
So cool, calm and full of life
Makes us forget all our life
Think of a forget full of trees.
Fluttering and dancing in the breeze
Cut them down and construct to
wers wait for ages to get a shower
The birds that soar high in the sky,
Can we initiate them however hard we try
Learn to wonder and gape in things
And see the happiness it brings.
We have got such wonderful things
Do what you can and save a wing.
So that our children in future,
Can see the things we have Nurtured.

Miss. Pragati Shashikant Shinde
( B.A.- III)






Miss Priyanka Babar
(B.A.III)

Every year on 8th March my female fraternity all over the world celebrates ' International women's Day' So first of all let me wish all the girl students and the teachers of my college a Happy Women's day.

But do we know when and why this day is celebrated? It was first decided to celebrate on 19th March as an ' International women's Day, because on this day Parsian king had promissed to make some unfulfilled reforms for the women. However the fortune did not smile on this blessed event.

In 1908, the first 'National women's Day' was celebrated on the last Sunday of February in the United States of America. The status and the problems faced by woman all over the world became controversial. Thus emphasis was given on celebrating ' International women's Day' so that the problems related to women's could be resolved thereby a conference over 1000 women from about 17 countries welcomed the idea and hence the day is celebrated.

Now a day 8th March is celebrated as ' International woman's Day' Appreciating economic, political and social achievement of women hundreds of events are organised not just on this day but throughout the month of March to mark this achievement. Orgazations, Governments and women's groups around the world choose different themes each year that reflect global and regional gender issue. These themes are published around the world to make them more specific and relevant.

This year the theme for Internationals women's Day is 'Equal Rights & Equal Opportunities for the Progress of all'.

Come! Let's rise at the occasion, make a combined effort for a beautiful, peaceful tommorrow.

## Success

One should talk but think more,
One should read but write more,
One should play but study more,
I promise, he or she will succeed surely !

You should eat but chew more,
You should sleep but work more,
You should punish but pardon more,
I promise, you will succeed definitely !
One should spent but save more
One should consume but produce more,
One should preach but follow more,
I promise, he or she will succeed certainly !

You should hate but love more,
You should order but obey more,
You should ignore but accept more,
I promise, you will succeed forever !

Miss. Babar Priyanka Chandrakant
(B.A. III)

## What he gave me ?

I asked god for vigour and
God gave me difficulties to make me strong .

I asked god for sanity and
God gave me problem to solve.

I asked god for wealth and
God gave me a brain to work.

I asked god for nerve and
God gave me danger to overcome.

I asked god to emotion and
God gave me troubled people to help

I asked god for goodwill and
God gave me opportunities.

I got nothing I needed
He gave everything I wanted

And at last my prayers have been answered

Miss. Babar Priyanka Chandrakant
(B.A. III)

## If I Could Go back In Time ?



If I could go back in time today,
way before we met,
I'd search and find you right away,
To form our loving duet.
Far, far back, I'd go for you,
To marry you much soonar
We dtie the knot, and you would be
my amorous honeymooner.
I love, our anniversary now ;
I'm happier every year
I just wish there' d been more time
for me to love you dear !

Miss. Shrawani Thorat
(B.A.III)





# CITIZENSHIP AMENDMENT ACT (CAA)

Name - Joshi Anuja Hanmant
(B.A.III)

The Citizenship Amendment Act 2019 ( CAA) was passed by the parliament of India on 11 December. The act also seeks to relax the requirement of residence in india for citizenship by naturalization from 11 years to 5 years for migrants covered under the Act

The Hindu nationalist Bhartiya Janata party (BJP) which leads the indian government had promised in previous election manifestos to offer Indian citizenship to persecuted religious minorities from neighbouring countries under the 2019 amendment migrants who had entered indian by 31 December 2014 and had suffered ' religious'persecution or fear of religious persecution in their country of origin were made eligible for citizenship. The amendment also relaxed the residence requirement for naturalisation of these migrants from twelve years to six. According to intelligence Bureau records, there will be just over 30,000 immediate beneficiaries of the bill .

The amendment has been widely criticised as discriminating on the basis of religion in particular for excluding Muslims, the office of the united nations high commissioner for human Rights called it fundamentally discriminatory, adding that while India's goal of profecting persecuted group is welcome, this should be accomplished through a non-discriminatory robust national asylum system. Critics express concerns that the bill would be used along with the National Register of Citizens stateless, as they may be unable to meet stringent birth or identify proof, requirements. Commentators also question the exclusion of persecuted religious minorities from other regions such as Tibet, Srilanka and Myanmar. The indian government says that Pakistan, Afganistan and Bangladesh have Islam as their state religious and therefore muslims are unlikely to face religious persecution there. However, Certain muslim groups sush as Hazaras and and Ahmadis have historically faced persecution in these countries.

The passage of the legislation caused large scale protests in india. Assam and other northeastern states have seen violent demonstrations against the bill over fears that granting Indian citizenship to refugees and immigrants will couse a loss of their political rights, culture and land rights and motivate further migration from Bangladesh in other parts of india. Protesters said the bill discriminated that Indian citizenship to be granted to muslim refugees and immigrants. Major protests against the Act were held at universities in India. Students at Aligarh muslim & Jamia Millia Islamia alleged brutal suppression by the police. The protests have led to the deaths of several protesters, injuries to protesters and police personnel damage to public and private property.

NRC
NATIONAL REGISTER OF CITIZENS

Miss. Amruta Nikam
(B.A.III)

The National Register of Citizens (NRC) is a register of all Indian citizens whose creation is mandated by the 2003 amendment of the Citizenship Act 1955. Its purpose is to document all the legal citizens of india so that the illegal migrants can be identified and deport. It has been implemented for the state of Assam starting in 2013-14. The Government of India plans to implement it for India. The national population Register (NPR) is a list of all the people residing in India and includes both the citizens and the non-citizens. This defination was stated by then minister of state for Home affairs, Kiren Rijiju, as a response in the Rajya sabha that was released on 26 November 2014 by the Ministry of Home Affairs, Government of India. It stated that the NPR is the first step towards creation of National Register if Indian Citizens ( NRIC) by verifying the citizenship status of every resident.

Residents of a locality living there for at least six months with plans to continue there for at least residence for another six months or more are included in the list of the Citizenship Act 1955, and Citizenship (Registration of citizens and issue of National Identify Cards) Rules 2003. (Passed by the BJP government under vajpayee). The listing is done at the local village, sub - district, district & state

**Background :-**

Assam, being a border state with unique problems of illegal immigration had a Register of Citizens created for it in 1951 based on the 1951 census data. However, it was not maintained after words. The Illegal Migrants Act, 1983 was then passed by the Parliament, creating a separate tribunal process for identifying illegal migrants in Assam. The Supreme Court of India struck it down as unconstitutional in 2005, after which the government of India agreed to update the Assam NRC.

Following unsatisfactory progress on the process of updating the Assam NRC for over a decade, the supereme court started directing and monitoring the process in 2013. The final update NRC for Assam, Published on 31 million names out of its population of 33 million, leaving out 1.9 millon exercise, did not find the result meeting its expectations. It belives that several legitimate citizens were excluded while many illegal migrants were included.

The BJP has promised to implement the NRC for all of india in its election manifesto for the 2019 Indian general election. In November 2019, Home Minister Amit Shah declared in the Rajya sabha of the Indian parliament that the NRC would be implemented throughout the country.

According to the citizenship rules, 2003, the central government can issue an order to prepare the National Population Register ( NPR) and crate the NRC based on the data gathered in it. The 2003 amendment further states that the local officials would then decide if the person's name will be added to the NRC or not, thereby deciding his citizenship status. No new rules or laws are needed to conduct this exercise in the whole of India.





# सामाजिकशास्त्रे

विभाग

*The mediocre teachers tells*
*The Good Teacher explains*
*The superior teacher demonstrates*
*The great teacher inspires.*

*- William Arthur Ward*

विभागीय संपादक
प्रा. आशा महावीर

# अंतरंग


| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १) | '' सावित्रीबाई फुले '' – | कु. अनिता पवार | बी.ए. III | इतिहास | ३१ |
| २) | '' उंब्रज परिसरातील गोसावी – समाजाचा अभ्यास – | कु. श्रध्दा कुंभार | बी.ए. II | भूगोल | ३३ |
| ३) | 'भावनिक बुद्धिमत्ता' – | कु. काजल गायकवाड | बी.ए. II | मानसशास्त्र | ३५ |
| ४) | नागरीकत्व सुधारणा कायदा – | कु. ज्योती सोनावले | बी.ए. III | इतिहास | ३७ |
| ५) | औंध वस्तुसंग्रहालय – | कु. सोनाली भाकरे | बी.ए. III | इतिहास | ३९ |
| ६) | गांडूळ खत निर्मिती – | कु. प्रतिक्षा पवार | बी.ए. II | भूगोल | ४१ |
| ७) | व्यक्तिमत्व विकास – | कु. प्रणाली घाडगे | बी.ए. II | मानसशास्त्र | ४३ |
| ८) | शेती व अर्थसंकल्प – | कु. अर्चना चव्हाण | बी.ए. II | अंर्थशास्त्र | ४५ |
| ९) | पानिपत युद्ध व सातारा जिल्ह्यातील शिंदे घराणे – | कु. नम्रता भोपते | बी.ए. II | इतिहास | ४६ |






# सावित्रीबाई फुले


कु. पवार अनिता तानाजी B.A.III


'' ज्ञान नाही विदया नाही, ते घेणेची गोडी नाही बुद्वी
असुनी चालत नाही, तयास मानव म्हणावे का?''

असा महत्त्वपूर्ण प्रश्न आपल्या काव्यातुन निर्माण करून अज्ञानांच्या अंधकारात खितपत पडलेल्या दिनांना दैदिप्यमान मार्ग दाखविणाऱ्या खरी खुरी विदयेची दैवत असणाऱ्या क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांचा जन्म दि. ३ जानेवारी १८३१ मध्ये सातारा जिल्ह्यांतील खंडाळा तालुक्यातील नायगांव येथे नेवासे पाटलांच्या कुळांत झाला व अवघ्या नवव्या वर्षीच त्यांचा विवाह युगप्रवर्तक क्रांती सुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्याशी झाला, आणि १८४० पासुन त्यांच्या शिक्षणाला प्रारंभ झाला, व ज्योतिबाच्या ज्योतीवर ज्ञानांची ज्योत पेटली. अंधाराला संपविण्यासाठीच महात्मा फुले यांची इथल्या वर्ग व्यवस्थेला उध्द्वस्त करण्यासाठीच महात्मा फुले ने समतेचे महायुद्ध पुकारले होते, त्यांत सावित्रीने उडी घेतली. आपल्या संसाराचा त्याग करून इतरांच्या कल्याणासाठी चंदनासम साध्वी झिजली. या देशांचे सर्व अनर्थ एका अविद्येने केला आहे. हे कटू सत्य महात्मा फुले यांनी ओळखून १८४८ मध्ये पुणे येथे भिडेचा वाड्यात मुलींसाठी पहिली शाळा काढली. व सावित्री १ जानेवारी १८४८ रोजी तिथल्या पहिल्या शिक्षिका झाल्या. देशांतून पहिली स्त्री शिक्षिका बनण्यांचा मान पटकावला. मनुवादाने बरबटलेल्या नरधमांनी सावित्रीच्या अंगावर शेण, विष्ठा टाकुन त्यांना विचलित करण्याचा प्रयत्न केला. पण सावित्री बाईंनी हे तर माझ्या कार्याबद्दल केला जात असलेला फुलांचा वर्षावच आहे. असे सांगुन समतेचा ज्वालामुखी आपल्या हृदयामध्ये सतत धगधगत ठेवून कार्याला गतिमान केले. जेव्हा ज्योतिबांनी १ मे १८४९ पुणे येथील उस्मान शेखच्या वाड्यात प्रौढांच्या शाळेची स्थापना केली तेव्हेही सावित्रीने अध्यापनांची महत्त्वपूर्ण भुमिका बजावली. पुढे पुणे-सातारा नगर जिल्ह्यांत समाज जागृतीसाठी स्थापन केलेल्या काही शाळांमधुनही सावित्री बाईंनी शिक्षिकेची भुमिका पार पाडून कर्तव्य पुर्ण केले.एवढेच नाही तर १८४९ मध्ये शुद्र अतिशुद्रांच्या शिक्षणांसाठी आपल्या पती बरोबर गृह त्याग करून हजारो वर्षातुन उपेक्षित असणाऱ्यांना शिक्षणांचा कानमंत्र दिला. हे करत असताना ज्योतिबा सावित्रीचे जीवन विषमतेच्या चटक्याने होरपळून निघत पण त्यांचे लक्ष यत्कींचीतही त्यांनी ढळू दिले नाही व आपला लढा सतत तेवत ठेवला १८५२ मध्ये जेव्हा शाळांची तपासणी झाली तेव्हा सावित्रीबाईंना आदर्श शिक्षिका म्हणून अभिप्राय मिळाला. म्हणूनच १२ जानेवारी १८५३ रोजी मेजर कँडी यांच्या हस्ते फुले दांपत्यांचा विश्रामबाग वाड्यांत त्यांच्या कृतीयुक्त कार्याबद्दल गौरव करण्यांत आला. या प्रेरणेनंतर सावित्री व ज्योतिबा पेटूनच उठले. विषमतेला जाळून खाक करण्यांसाठी म्हणूनच त्यांनी हिंदू धर्माच्या सुधारणेसाठी आपली उभे आयुष्य खर्च घातले, सुधारणेचा भाग पुढे नेत असताना, त्यांनी बालविवाह, सतीप्रथा, जातिभेद कर्मकांड यांचा धिक्कार करून विधवा पुर्नविवाह व एक ईश्वरवाद यांचा पुरस्कार केला. तसेच समतेची शिकवण सुध्दा दिली.

तत्कालीन कुमारीकांच्या मुलांची बालहत्या प्रचंड प्रमाणांवर होत होती. तेव्हा निष्पाप अर्भकांची हत्या होऊ नये म्हणून म. फुले यांनी १८५३ मध्ये आपल्या घरांत बालहत्या प्रतिबंध ग्रहांची सुरूवात केली. तेव्हा सावित्रीने त्यांचा आनंदाने स्विकार केला. या पवित्र कार्याने कित्येक मुलांना जीवनदान मिळाले. पण या सावित्री ज्योतीबा दांपत्यांना स्वतःला मुलबाळ झाले नाही. सावित्री ज्योतीबांना म्हणाल्या मला मुल होत नाही. तेव्हा तुमचे दुसरे लग्न करावे, तेव्हा समतेचा महामेड फुले म्हणाले कदाचित माझ्यांत दोष असेल आपण तुझेच दुसरे लग्न करू व आपण त्यांचा स्वीकार करू व सावित्री स्तब्ध झाल्या. केवढे हे औदार्य? मग पुढे या दांपत्याने काशीबाई नावांच्या एका ब्राम्हण विधवेचा मुलगा यशवंत याला दत्तक घेतले.व तो पुढे शिकुन डॉक्टर झाला. आई वडिलांच्या पाऊलावर पाऊल देण्यांसाठी हिंदू धर्मातील वर्णव्यवस्थेने आती शुद्र ठरवून गाव कुसाबाहेर राहण्यास भाग पाडलेल्या अस्पृश्य समाजांसाठी १८६८ साली ज्योतिबा व सावित्रीने आपल्या घरचा पाण्यांचा हौद खुला करून देऊन एक समतेची क्रांतीच केली. यावेळी अनेक संकटांना तोंड दयावे लागले. अंधश्रद्धेनेच देशांची प्रगती झाली नाही.माणूस माणसापासून दुर गेला आहे म्हणून ते आपल्या साहित्यातुन म्हणतात.

''धोंडे मुले देती। नवसापावती, लग्न का करती। नारीनर।।
सावित्री वदते। करून विचार, जीवन साकार। करूनी घ्या।।

दगडांचे देव जर मुलांना जन्माला घालत असतील तर महिलांना पुरूषांशी लग्न करण्यांची गरज काय? असा जळजळीत प्रश्न निर्माण करून इथल्या व्यवस्थेवर असुड ओढून व समाजांला अंधश्रद्धेतुन बाहेर काढण्यासाठी प्रयत्न केला जेव्हा पुणे परिसरात १८७५ ते १८७७ दरम्यान सतत दुष्काळ पडला होता. शेकडो मुले अन्न म्हणून तडफडून मरू लागली. तेव्हा ज्योतीबांनी ५२ अन्नछत्रे
तेव्हा ज्योतीबांनी ५२ अन्नछत्रे उघडून आंधळे पांगळे व लहान मुले यांना सतत जेवण दिले.

धनकवडी येथे एक अन्नछत्र उभारले व त्यांची सर्व जबाबदारी सावित्रीबाईने स्वतःवर घेतली. अनेकांना भुक बळीपासुन वाचविले तिथे ते स्वतःच भाकरी करून खाऊ घालत असत. रोज दोन हजार भाकरी या अन्नछत्रांमध्ये तयार करून वाढल्या जात असत. यांसाठी सावित्रीबाई कधीही थकल्या नाहीत. त्या तर समतेच्या ऊर्जा स्त्रोत होत्या. सतत मेणबत्ती समान जळणाऱ्या सावित्रीला कधीही सोने नाण्यांच्या मोहाने स्पर्श केला नाही. काळया मण्यांची पोत व एक मंगळसुत्र एवढेच तिचे सौभ्याग्यांच कुंकू हे दागिने होते. सावित्रीने ज्योतिबा घरी नसतानाही अनेक गरजू लोकांच्या गरजा भागवून त्यांना न्याय दिला.

ज्योतिबा फुले १८११ मध्ये पक्षघाताने आजारी पडले.तेव्हा मात्र सावित्रीबाई थोड्या खचल्या. त्यांची ज्योतिबांची भरपुर सेवा केली. पण दुर्दैवाने ज्योतिबा यांतुन सावरू शकले नाहीत. तरीही ते सावित्रीबाईला सतत प्रेरणा देत राहिले. तेव्हा सावित्रीबाइ 'न डगमगता कार्यरत राहिल्या. आयुष्यभर समाजाची सेवा करणाऱ्या सावित्रीने जवळपास दोन वर्ष आपल्या पतीची सेवा केली. अखेर २८ नोव्हें. १८९० रोजी सावित्रीचे कुंकू असणाऱ्या ज्योतिबांवर काळाने झडप घातली. तिच्यावर दुःखाचा डोंगर कोसळला. पण मोठया धैर्याने तिने हे दुःख झेलले. त्यातच ज्योतिबांच्या अंत्य विधीच्या वेळी त्यांच्या अंत्यविधीसाठी वाद सुरू झाला, कारण ज्योतिबांनी माझ्या विरोधी, सत्यशोधकांच्या विरोधी, माझ्या भाऊ बंधकीचे लोक वागले आहेत. त्यांना माझ्या शवाला हात सुद्धा लावू देवू नये. असे सांगितले होते. त्यावेळी ज्योतिबांचे भाऊबंध वारसा हक्क सांगत बाबा फुले व माहादबा फुले भांडण करू लागले. तिरडीला खांदा देण्यासाठी व अग्नी देण्यासाठी यशवंत हा आमच्या वंशाचा नाही असे म्हणू लागले व वाद निर्माण झाला. तेव्हा सावित्रीने गाडगे हातात धरले व पतीच्या चितेला अग्नीही दिला. हिंदु रूढी परंपरेच्या गालांवर मारलेली सावित्रीची ही एक थप्पडच होती.

१८९७ मध्ये पुणे परिसरात प्लेगची साथ सुरू झाली. तेव्हा सावित्रीबाईने आपला मुलगा यशवंत याला पुण्यात प्लेग ग्रस्तांना मोफत सेवा देण्यांस सांगुन अनेकांचे जीव वाचवले. सावित्रीबाई स्वतः आपल्या खांदयावर प्लेगच्या लहान बालकांला घेऊन यशवंतांच्या दवाखान्यात आणत व इलाज करून त्यांना जीवदान देत असत. सत्र चालु असतानाच स्वतः सावित्रीबाईच प्लेगच्या शिकार झाल्या. रात्रंन दिवस चंदनासमान झिजणाऱ्या सावित्रीबाईंवर १० मार्च १८९७ रोजी काळानं झडप घातली. त्याचे महानिर्वाण झाले. संबंध भारत हा पोरका झाला.

सावित्रीबाई फुले त्यांच्या कृतीव्यक्त कार्यामुळे त्या जगातल्या सर्व स्त्री-पुरूषांना दिप स्तंभ ठरतात. त्यांच या देशांतल्या विदयेच्या खऱ्या देवता आहेत. सावित्रीबाई फुले या लेखिका व कवयित्री म्हणूनही प्रसिद्ध होत्या. काव्यफुले बावनकशी सुबोध रत्नाकर, मातोश्री सावित्रीबाईंची भाषणे व गाणी इत्यादी साहित्य रचना त्यांच्या नावांवर जमा आहेत. यांपैकी 'बावनकशी सुबोध रत्नाकर' हा त्यांचा काव्य संग्रह विशेष प्रसिद्ध आहे.



उंब्रज परिसरातील

# गोसावी

## समाजाचा अभ्यास

कु. श्रद्धा शंकर कुंभार
बी. ए.भाग - २ (भूगोल विभाग)

भारतीय समाज विविध जाती-जमातीत विभागलेला आहे यात हजारोपेक्षा अधिक जाती आणि उपजाती आहेत. महाराष्ट्रात अनेक जाती आहेत. त्यातील एक जात गोसावी म्हणून ओळखली जाते. उंब्रज परिसरात राहणारी गोसावी जातीचा आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक अशा सर्वांगिण दृष्टीकोनातून अभ्यास करून त्यांच्या या मागसालेल्या स्थितीचे कारण, त्यांच्या समस्या जाणून घेण्याच्या एक छोटासा प्रयत्न.

उंब्रज परिसरात राहणारा गोसावी समाज साधे राहणीमान. आणि स्वतःची एक वेगळी ओळख करून राहतो, त्यांच्या सामाजिक रूढी परंपरा आहे त्यांचे जीवन वैशिष्ट्यपूर्ण आहे.

### १) मानवीजीवन -

उंब्रज परिसरातील गोसावी समाज एक साधी जात आहे. राहणीमान साधे, उंब्रज परिसरात राहून स्वतःची वेगळी ओळख करून राहतो. हा समाज मासेमारीसाठी प्रामुख्याने प्रसिद्ध आहे. त्यांच्या जीवनाचा अभ्यास करून त्यांची आर्थिक स्थिती, शैक्षणिक स्थिती मागासलेली असण्याचे कारण तसेच त्यांची सामाजिक, सांस्कृतिक आर्थिक आणि आरोग्यविषयक समस्या जाणून घेण्याचा प्रयत्न केला.

त्यांची शारीरिक रचना एक सारखी नाहीत शरीर उंची ५ ते ६ फुटांपर्यंत आहे. केस सरळ असून त्यांचा रंग तपकिरी किंवा गोरा आहे. कामामुळे स्वतःकडे ते जास्त लक्ष देत नाहीत. मराठी भाषिकांच्यात राहिल्यामुळे ते मराठी भाषा बोलतात परंतु त्यांची भाषा तेलगू, गुजराती व मराठी भाषेचा वापर करतात. आधुनिक समाजाच्या संपर्कात आल्यामुळे ते भटकी नसून स्थायीक झाले आहेत. घरांची रचना साधी असून त्यांना आकार नाही. निवासी मार्ग सुव्यवस्थित नाही. सुयोजनेचा अभाव दिसून येतो. आधुनिकतेचा त्यांच्या वस्त्र आणि जीवनावर परिणाम दिसून येतो.

### २) सामाजिक व सांस्कृतिक जीवन -

गोसावी समाजातील सामाजिक व सांस्कृतिक जीवन व आपले सामाजिक जीवनात बदल दिसून येतो. आधुनिकतेचा व सातारा शहरात राहिल्यामुळे, समाजाच्या संपर्कामुळे त्यांच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनात बदल दिसून येतो. हा विघातक आहे. आपले स्वतःचे सामाजिक व सांस्कृतिक जीवन विसरत चालला आहे.

गोसावी भटक्या जातीचे लोक एकसमुहात राहतात. पुरूषप्रधान संस्कृती, वृद्धांना मानाचे स्थान आहे. गोसावी जातीत संयुक्त व विभक्त कुटुंब पद्धती प्रचलित आहे. परंतु सुधारित लोकांच्या संपर्कात आल्याने यांचा कल विभक्त पद्धतीकडे दिसून येतो. गोसावी समाजाचा अभ्यास केल्यानंतर त्यांची विवाहसंस्था स्वरूप व कार्य महत्वाचे आहे. त्या समाजात एक पत्नी विवाह प्रथा आहे. लग्न गुजराती पद्धतीने दोन दिवस चालतो, परंतु आसपासच्या संस्कृतीच्या संपर्कात असल्याने मराठी पद्धतीने विवाहदेखील करू लागले आहेत. गोसावी समाजात कुलदैवत म्हणून महालक्ष्मीची पूजन केले जाते. या समाजात होळी व दसरा हे सण उत्सव मोठया उत्साहाने साजरा करतात. मंदीर त्यांच्या घरांच्या मध्यभागी असते. उत्सवाच्या दिवशी काही लोक कोंबडी खातात तर काही लोक पुरणपोळी खातात. या उत्सवात काही लोक पारंपारिक वस्त्र व चांदीचे दागिने घालतात व पूर्ण उत्साहाने सण साजरे करतात.

### ३) धार्मिक जीवन -

मानवाच्या सामाजिक जीवनात इतर सामाजिक

सत्ताप्रमाणेच धर्मसंस्था पण महत्वाची संस्था आहे. मानवाच्या जीवनातील घाणऱ्या व वाईट घटनाचा संबंध तो त्या अलौकिक शक्तीशी लावू लागला मानवाच्या जीवनात धर्माचे अस्तित्व दिसून येते या अलौकिक शक्तीवर श्रद्धा ठेवून तो कर्मकांड करतो.

गोसावी समाजात कुलदैवी ही महालक्ष्मी आहे. चैत्र व अश्विन या दोन महिन्यात देवीची पुजा केली जाते. गोसावी समाजाचे धार्मिक उत्सव, सण, समारंभ हे पार पाडण्याची जबाबदारी भगत वर असते. तो संपूर्ण जबाबदारी घेऊन पूजा प्रक्रिया करतो.

४) आर्थिक जीवन -

गोसावी भटकी जमाती असल्यामुळे ते भटके जीवन व्यक्त करतात असे नाही कारण उंब्रज परिसरात राहत असल्याने त्यांचे जीवन स्थिर झाले आहे. त्यांची आर्थिक स्थिती ही सर्वसाधारण स्वरूपाची आहे. आधुनिक अर्थव्यवस्थेची गुंतागुंत यांच्यात दिसून देत नाही. परंतु आपल्या कमीत कमी गरजा पूर्ण करतात. आर्थिक क्रियेत मासेमारी, जाळे विणणे, मजुरी करणे, भंगार गोळा करणे, खादय मागून खादयसंकलन करणे, विटभट्टीवर मजूरकाम करणे इत्यादी कामांचा समावेश आहे.

या समाजातील काही महिला वर्ग तसेच लहान मुले सकाळी उठून उंब्रज परिसरात खादय संकलनासाठी जातात व सर्व घरातून शिळे अन्न, पोळया गोळया करतात ही त्यांची प्राथमिक स्वरूपाची आर्थिक क्रिया आहे. या समाजातील पुरूषवर्ग मासेमारी हा व्यवसाय करतात. मासेमारी करताना गळ लावून ते मासे पकडतात. काही प्रमाणात आर्थिक प्राप्तीसाठी बाजारात मासे विकतात, तसेच आपल्या रोजच्या जेवणात मासे खातात. त्याचबरोबर पशुपालन, हस्तव्यवसाय व काही प्रमाणात मजूरी करतात.

**गोसावी समाजाच्या समस्या :-**

उंब्रज परिसरातील गोसावी समाजाची सामाजिक रचना तशी थोडी खालची आहे. अनेक प्रश्नांनी त्यांना हतबल केले आहे. त्यांनी उंब्रज परिसरातील मराठी संस्कृती स्विकारलेली आहे. त्यामुळे त्यांच्यात एक वेगळेपण निर्माण झाले आहे. गोसावी समाजाची समस्या ही परंपरागत जीवन पद्धतीतून निर्माण झाली आहे. तर इतर संस्कृतीच्या संपर्काने काही समस्या निर्माण झालेल्या दिसून येतात. त्यात आर्थिक समस्या, सांस्कृतिक, सामाजिक आरोग्य विषयक समस्या व शैक्षणिक समस्यांचा समावेश आहे.

**आर्थिक समस्या व उपाययोजना :-**

अन्न, वस्त्र, निवारा या आवश्यक गरजांच्या पूर्ततेसाठी हा समाज धडपडत असतो व या गरजा भागवण्यावरच व्यक्तीचे व समाजाचे अस्तित्व अवलंबून आहे. त्यांच्याकडे स्वतःची शेतजमीन नाही. उदरनिर्वाहासाठी मासेमारी, भंगार गोळा करणे, हस्तव्यवसाय व खादयसंकलनही ते करतात. आर्थिक समस्या निर्माण झाल्याने त्यांचे जीवनमान व त्यांच्या मनावर परिणाम झालेला आहे.

आर्थिक समस्येवर मात करण्यासाठी शिक्षित समाज केला पाहिजे, स्वयंरोजगार योजनाविषयी माहिती, स्वयंरोजगार उपलब्धी, कुटीर उदयोगाचे शिक्षण देऊन शासनाच्या योजना त्यांच्यापर्यंत आणल्या पाहिजेत.

**सामाजिक व सांस्कृतिक समस्या व उपाययोजना :-**

आधुनिक समाजाशी संपर्कात आल्यामुळे त्यांच्यात परंपरागत, सांस्कृतिक जीवनातील काही समस्या निर्माण झाल्या. गुजराती पद्धतीनुसार कार्य न करता मराठी संस्कृतीचा अवलंब. मराठी भाषा स्विकारल्याने आपली भाषा कमी प्रमाणात बोलतात. यातूनच स्वाभाविक स्वयं संस्कृतीचा, स्वतःच्या परंपरागत जीवन पद्धतीचा त्याग त्यांनी केला आहे. विवाह प्रथेत बदल, समाज व्यवस्थेत बदल केल्याने सामाजिक समस्या निर्माण झाल्या.

आपला समाज, समाजरचना याबद्दलचा अभिमान, संस्कृतीचे जतन व त्याचे महत्व प्रथा परंपरेचे जतन, व्यसनाधिनतेबद्दल प्रबोधन हे करणे गरजेचे आहे.

**आरोग्यविषयक समस्या व उपाययोजना :-**

रोजच्या जेवणात भात, मासे व शिळे अन्न असल्यामुळे आवश्यक ती जीवनसत्वे मिळत नाहीत. कॅल्शिअमयुक्त पदार्थ, विटॅमीनचे प्रमाण नसते. लहान मुलांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष, महिलांच्यात मिसरीचा अतिवापर, स्वच्छतेचा अभाव, अस्वच्छ गटारी. अस्वच्छ परिसर, घाणीचे साम्राज्य यांमुळे रोगांचा प्रसार होतो त्यामुळे आरोग्यविषयक प्रबोधनाची गरज जास्त दिसून येते.

स्वच्छतेचे महत्त्व सांगणे, स्वच्छता मोहिम राबवणे, आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करणे, प्राथमिक केंद्राची सुविधा, पाण्याविषयी माहिती देणे, स्वच्छता राखणे हे पटवून दिल्याने आरोग्यावर योग्य परिणाम होणार व स्वास्थ सुधारेल.

**शैक्षणिक समस्या व उपाययोजना :-**

शिक्षण घेतलेले युवक पुन्हा आपल्या कुटुंबात न येता त्यांना आधुनिक समाज प्रिय होतो. त्यांना मागासलेल्या समाजाची लाज वाटते. जी पिढी म्हातारपणी आई वडिलांचा आधार असतात. ती पिढी शिकल्यानंतर त्यांना सोडून जाते. यामुळे शिक्षणाविषयी या समाजात नकारात्मक दृष्टीकोन निर्माण झाला आहे.

मुलांना शैक्षणिक सवलती देणे, शिक्षण अभियानांतर्गत समाजाची जनजागृती, मुलांना पुस्तके, गणवेश देणे, कमवा आणि शिका यांसारख्या योजना राबवणे. रात्रीची शाळा सुरू करणे, स्त्रियांना शिक्षित करणे तसेच स्त्रियांचे प्रबोधन करणे आवश्यक आहे.

अशा प्रकारे या समाजात खूप समस्या दिसून आल्या यांना प्रबोधनाची, आर्थिक स्थिती जाणून त्यांच्या परिस्थिती व वेळ मिळेल त्यानुसार शिक्षण देण्याची गरज आज दिसून येते.





# भावनिक बुद्धिमत्ता

गायकवाड काजल विलास
B.A.II मानसशास्त्र

बुद्धिमत्तेमध्ये बौद्धिक बुद्धिमत्ता आणि भावनिक बुद्धिमत्ता सुखी व समाधानी जीवन जगण्यासाठी महत्वाचे मानले जाते.

बुद्धिच्या संदर्भातील भावनिक बुद्धिमत्ता ही एक नवीन संकल्पना मानसशास्त्रात उदयास आली आहे. भावनांवर नियंत्रण ठेवण्याचे कार्य बुद्धिमत्तेचे असुन त्यातुनच भावनिक बुद्धिमत्ता या संकल्पनेचा उदय झाला असावा. भावनिक बुद्धिमत्ता प्रत्येक व्यक्तिमध्ये कमी जास्त प्रमाणात असते आणि ती व्यक्तिच्या वर्तनातुन व्यक्त होते.

भावनिक बुद्धिमत्ता ही संज्ञा सर्वप्रथम अमेरिकन मानसशास्त्रज्ञ पीटर सॅलोव्ही व जॉन मेयर यांनी १९१० मध्ये वापरली . त्यानंतर गार्डनर यांनी बुद्धिमत्तेच्या बहुविध सिध्दांतामध्ये व्यक्तिअंतर्गत बुद्धिमत्तेत स्वतःच्या भावना ओळखण्याचा समावेश केला आहे.

व्यक्तिमत्व विकासाचे स्वरूप भावनात्मक (Emotional), बोधात्मक (Intellectual) आणि क्रियात्मक (Practical) या क्षेत्राशी संबंधित असते आणि आपल्या व्यक्तिमत्वाचा समतोल विकास होण्यासाठी व या तीन क्षेत्रांतील विकासासाठी योग्य प्रमाणात प्रयत्न होणे आवश्यक आहे.

'भावना (Emotion) म्हणजे तरी काय ?

'भावना या शब्दाला इंग्रजीमध्ये 'Emotion ' म्हटले जाते. मुळ लॅटीन शब्द 'Emovere ' या पासून Emotion केले. ज्याचा अर्थ उत्तेजित करणे असा होतो. त्यावरून असे म्हणता येते की, 'भावना' हे व्यक्तिच्या उत्तेजित अवस्थेचे नाव आहे.

**व्याख्या -**

'डॅनियन गोलमन यांनी भावनिक बुद्धीमत्तेविषयी सर्वप्रथम लेखन व संशोधन केले गोलमन च्या मते, भावनिक बुद्धिमत्ता ही आपल्या स्वतःच्या व इतरांच्या भावना ओळखण्याची, स्वतःला प्रेरित करण्याची आणि स्वतः व इतर यांच्या परस्पर संबंधातील भावनाचे व्यवस्थापन करण्याची क्षमता आहे.

'सॅलोव्ही व मेयर यांच्यामते भावनिक बुद्धिमत्ता म्हणजे असा संच आहे की ज्यामध्ये भावनांचे मापन, मुल्यमापन, प्रकटीकरण व नियंत्रण यांचा समावेश होतो.

'स्वतःच्या भावनांवर आणि त्यांच्या अभिव्यक्तिवर नियंत्रण ठेवता येणे, आजूबाजूच्या व्यक्तिशी सुसंवाद साधता येणे, वागण्यात लवचिकता असणे, स्वयंप्रेरणेनुसार व जीवन उद्दिष्टानुसार काम करता येणे या सर्व गुणांच्या मिश्रणाला भावनिक बुद्धिमत्ता म्हणतात'

भावनिक बुद्धिमत्ता असणाऱ्या व्यक्तिमध्ये दोन घटक अत्यंत कार्यरत असतात. भावनिकदृष्ट्या स्थैर्य (Emotional Stability ) आणि भावनिक परिपक्वता (Emotional Maturity ) असणाऱ्या व्यक्ती आपल्या भावनांवर नियंत्रण ठेवून वर्तन करतात. या व्यक्ती कोणत्याही परिस्थितीमध्ये समायोजन (Adjustment) साधण्यास प्रवृत्त असतात. या व्यक्ती स्वयंप्रेरणेनुसार कार्य असतात.

व्यक्तिचे व्यक्तिमत्व घडविण्यात भावनिक बुद्धिमत्तेची महत्त्वाची भूमिका आहे. वयापरत्वे भावनिक पक्वता येते. आजच्या या स्पर्धेच्या युगात अनेक ताणतणावांचे प्रसंग येतात. समस्या उभ्या राहतात. त्या सोडविण्याकरीता स्व-समायोजन (Self Adjustment ) क्षमता अंगी असावी लागते. व्यक्तिच्या व्यक्तिमत्त्वाचा समतोल विकास हा मोठया प्रमाणावर त्याच्या भावनिक बुद्धिमत्तेवर अवलंबुन असतो. प्रत्येक व्यक्तित काम करण्याची शक्ती, ऊर्जा, उत्साह असतो. तो भावनिक बुद्धिमत्तेमुळे मजबूत होतो.

**सॅलोव्ही यांनी उलगडलेले भावनिक बुद्धिमत्तेचे घटक व पैलू खालीलप्रमाणे**

**१) स्वत:च्या भावना ओळखणे**

अनेकदा आपल्याला स्वत:च्या भावनाची यथायोग्य जाणीव नसते. आपल्याला दु:ख झालंय की राग आलाय..... आपल्या अंतरीच्या खऱ्या भावना ओळखता येणं, त्या आधारे विचार करून योग्य निर्णय घेता येण हे भावनिक शहाणपणाच लक्षण ठरत. आपल्याला नेमकं काय हव आहे, हे कळल्याशिवाय त्या दृष्टीनं प्रयत्न होत नाहीत. ज्यांना ते कळत ते मात्र सहजतेण व आत्मविश्वासानं यशाकड वाटचाल करू शकतात.

**2) भावनांचे नियमन करणे**

आपल्या अंतरंगात भावभावनांचा खेळ सतत सुरू असतो. भावना कमी.अधिक तीव्रतेच्या असतात. परिस्थितीही सतत बदलत असते. या सर्व चढउतारात आपल्या भावना पुरेशा नियंत्रणात ठेवणं, त्या योग्य रीतीनं हाताळणं गरजेच असतं. ज्यांना हे साधत नाही ते चटकन निराश, चिंताग्रस्त होतात. मात्र ज्याच्याकडं हे कौशल्य असत ते स्वस्थपणे, शांतपणे विचार करू शकतात. योग्य कृती करू शकतात व प्रतिकूल परिस्थितीवर मात करू शकतात.

भावभावनांविषयीची जाणीव आजइतकी पूर्वी कधीही नव्हती. यापूर्वी तर भावना दाबून ठेवणं हा गुणधर्म मानला गेला. आज लोकांच्या भावनिक अडचणींमध्ये सहानभुतीने पाहिले जाते. तसेच तुमच्या भावना व्यक्त करण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते. आयुष्यातील सहानुभुतीनं महत्वाच्या निर्णयामध्ये भावनांचे महत्त्व आजइतके ताणतणाव हा मोडलेल्या हाडाइतका किंवा त्याहूनही भयानक असू शकतो याबद्दल आज दुमत नाही. आजच्या काळातील मानसशास्त्रातील संशोधन पूर्वी उपलब्ध नव्हते. मानवी मनोव्यापाराबद्दलची जिज्ञासा या संशोधनांच्या मुळाशी होते.

सिग्मंड फ्रॉईड यांनी सर्वप्रथम मानवी मन आणि त्याला अस्वस्थ करणाऱ्या गोष्टी यासंबंधात सिद्धांत मांडले त्यानंतरही अनेक सिद्धांत मांडले गेले, पण मूळ उद्देश अर्थातच लोकांच्या मानसिक यातना कमी करणे हा होता. भावनिक स्वास्थ (Emotional Health ) विषयी बोलताना ८ पासूनची 0 पर्यंतची अवस्था मनस्वास्थ असणारी अशी मोजपट्टीही सांगितली गेली. नंतरच्या काळात फक्त अस्वस्थता दूर करणे एवढाच उद्देश न ठेवता NLP अशी स्थिती मिळवण्यावर भर दिला.

आज २१ व्या शतकात भावनिक 'बुद्धिमत्ता' आणि ''सुखसमाधान'' असलेले यशस्वी जीवन या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. इतकेच नव्हे तर '' भावनिक बुद्धिमत्ता'' ही सुखी जीवनाची मोजपट्टी म्हणावी लागेल.

बुद्ध्यांक आणि भावनिक बुद्धिमत्ता या जरी दोन वेगळ्या गोष्टी असल्या तरी बऱ्याचदा त्या एकमेकांना पूरक असतात. या दोघांच्या संयोजनाने कोणाचेही आयुष्यातले यशापयश व सुख ठरविले जाते.

गोलमन यांनी स्पष्ट केले आहे कि व्यक्तिच्या जीवनात बौद्धिक बुद्धिमत्तेस २०% व भावनिक बुद्धिमत्तेस ८०% इतके महत्व असते. यावरून आपल्याला असे लक्षात येते की बौद्धीक मत्तेपेक्षा मोठयाप्रमाणावर सुखी जीवनासाठी भावनिक बुद्धिमत्ता महत्वाची मानली जाते.



# नागरीकत्व सुधारणा,कायदा



सोनावले ज्योती शंकर B.A.III (इतिहास विभाग)

भारतीय नागरीकत्व मिळविण्यासाठी विदेशी नागरिकाने अर्ज करण्यापूर्वी सलग एक वर्ष आणि गेल्या १४ वर्षांपैकी ११ वर्षे भारतात वास्तव्य केलेले असणे आवश्यक आहे. नागरीकत्व दुरूस्ती विधेयकाने पाकिस्तान बांग्लादेश आणि अफगाणिस्तानमधील मुस्लिमेतर निर्वासितांसाठी हा कालावधी सहा वर्षांपर्यंत कमी केला आहे.

विद्यमान कायद्यानुसार, बेकायदा निर्वासितांना भारताचे नागरीकत्व मिळत नाही. अशा व्यक्तींना विदेशी नागरिक कायदा आणि पारपत्र कायद्यानुसार तुरुंगात टाकता येते. याबाबतची किमान आठ ते दहा हजार प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत. दुरूस्ती विधेयकातील तरतुदी नुसार वरील तीन देशांमधील हिंदू, शीख, बौद्ध, जैन, पारशी आणि ख्रिस्ती निर्वासितांना नागरीकत्व मिळू शकणार आहे. त्यांच्यावर कारवाईही होणार नाही.

आसाम करारासंबंधीच्या कायद्यातील ६ अ कलमाच्या आधारे बेकायदा निर्वासितांवर न्यायालयात खटले सुरू असल्यास संबंधितांना नागरिकत्व मिळाल्यानंतर हे खटले रद्द होतील. आसाममधील राष्ट्रीय नागरीक नोंदणी (एनआरसी) यादीतून वगळलेल्या १९ लाख नागरिकांपैकी बिगरमुस्लिमांना यामुळे दिलासा मिळणार आहे.

*** काय आहे दुरूस्ती विधेयक ?**

पाकिस्तान, बांग्लादेश आणि अफगाणिस्तान मधील मुस्लिमेतर निर्वासितांना भारताचे नागरिकत्व देण्याची तरतूद या तीन देशांमध्ये धार्मिक द्वेषाला बळी पडत भारतात आश्रय घेण्यास भाग पडलेल्यांना नागरिकत्व देण्याचे उद्दिष्ट बेकायदा स्थलांतरच्या आरोपांमधून अशा नागरीकांची सुटका होणार.

३१ डिसेंबर २०१४ पूर्वी भारतात प्रवेश केलेले निर्वासित नागरिकत्वासाठी पात्र निर्वासितांकडे जन्माचा दाखला नसल्यास सहा वर्षे भारतात राहिल्यानंतर ते नागरिकत्वासाठी अर्ज करू.

ओव्हरसीज सिटिझन ऑफ इंडिया (ओसीआय) कार्ड धारकांनी नागरिकत्व कायद्याचा भंग केल्यास त्यांची नोंदणी करण्याचीही तरतूद नव्या विधेयकात .

*** कोणत्या राज्यांना सवलत**

राज्यघटनेच्या सहाव्या परिशिष्टात नमूद केलेल्या आसाम, मेघालय,त्रिपुरा आणि मिझोराम राज्यांमधील आदिवासीबहुल भागांमध्ये नागरिकत्व दुरूस्ती विधेयक लागू होणार नाही. तसेच, अरूणाचल प्रदेश, नागालँड आणि मिझोराम या इनरलाइन परमिट पद्धत लागू असलेल्या राज्यांमध्येही विधेयक लागू होणार नाही. याच धर्तीवर मणिपूरलाही सवलत

देण्यात आली आहे

● विरोध कशामुळे ?

या विधेयकामुळे भयानतेच्या अधिकाराचा भंग होत असल्याचा आरोप होत आहे. धर्माच्या आधारावर नागरिकत्व दिले जाऊ शकत नाही. अशा विधेयकाला आसाम कराही अर्थहीन होत असल्याचा विरोधकाचा दावा आहे.

● नवी दिल्ली, ११ डिसेंबर :- Citizenship Amendment Bill राज्यसभेत ममत झाल आणि नागरिकत्व सुधारणा कायद्याची वाट मोकळी झाली. हा कायदेबदल अस्तित्वात आल्याने नेमका काय फरक पडेल? कुठल्या देशातल्या निर्वासितांसाठी हा कायदा उपयुक्त ठरेल आणि ईशान्य भारतात याला एवढा विरोध का होत आहे.... यासारख्या तुमच्या मनातले १२ प्रश्न आणि त्याची उत्तरं......

1) CAB म्हणजेच नागरिकत्व सुधारणा कायदयानुसार तिबेटी निर्वासितांना नागरिकत्व मिळू शकतं का ?

No : नागरिकत्व सुधारणा कायदयानुसार हिंदू, शीख, बौद्ध, जैन पारशी आणि ख्रिश्चन व्यक्तींना नागरीकत्व मिळू शकतं.

पाकिस्तान, अफगाणिस्तान, बांग्लादेश या देशातल्या ज्या व्यक्तींना तिथल्या धार्मिक छळामुळे भारतात स्थलांतर केलं आहे

अशा सगळ्या व्यक्तींना नागरिकत्व मिळेल, हा कायदा तिबेटी निर्वासितांना लागू नाही.

२) या कायदयानुसार पाकिस्तानामधून भारतात आलेल्या अहमदिया पंथाच्या व्यक्तिंना नागरिकत्व मिळू शकलं का ?

No : नागरीकत्व सुधारणा कायदा हा हिंदू, शीख, बौद्ध, जैन, पारशी आणि ख्रिश्चन समुदायातल्या व्यक्तीसाठीच मर्यादित आहे. यामध्ये इस्लाममधल्या अहमदमिया पंथासारख्या पंथांचा समावेश नाही.

**संबंधित - मोदी सरकारचा मोठा विजय, राज्यसभेत नागरिकत्व विधेयक मंजूर**

३) बांग्लादेशामधल्या एखादया हिंदू व्यक्तीने २०१५ मध्ये भारतात बेकायदेशीररित्या प्रवेश केला असेल तर तिला CAB (Citizenship Amendment Bill) अंतर्गत नागरिकत्व मिळू शकतं का ?

No : CAB हे विधेयक भारतात ३१ डिसेंबर २०१४ मध्ये आलेल्या व्यक्तींनाच लागू आहे.

४) एखादया बौद्ध व्यक्तीने बांग्लादेशमधून भारतात बेकायदा स्थलांतर केलं असेल आणि तिचं नाव आसाम मधल्या नॅशनल

रजिस्टर ऑफ सिटीझन्स मध्ये नसेल. त्याचबरोबर फॉरिनर्स ट्रिब्युनलमध्ये त्या व्यक्तीच्या विरूद्ध खटला प्रलंबित असेल.

तरीही ती व्यक्ती नागरिकत्वासाठी अर्ज करू शकते का ?

५) पाकिस्तानमधून आलेली एखादी बेकायदेशीर ख्रिश्चन स्थलांतरित व्यक्ती जर नागालँडमधल्या दिमापुरमध्ये राहत असेल

तर ती व्यक्ती नागरिकत्वासाठी अर्ज करू शकत नाही का ? कारण नागालँड हे इनर लाइन परमिटने संरक्षित आहे आणि ते

CAB च्या कक्षेबाहेर आहे.

No : नागालँडमधल्या दिमापुरला इनर लाइन परमिट लागू नाही.

६) त्रिपुरामध्ये बेकायदेशीररित्या स्थायिक झालेली एखादी बंगाली हिंदू व्यक्ती असेल तर तिला CAB अंतर्गत येत नाहीत.

त्यामुळे या भागात स्थायिक झालेले बेकायदेशीर स्थलांतरित CAB अंतर्गत नागरिकत्वासाठी अर्ज करू शकत नाहीत.

त्याचबरोबर CAB साठी ३१ डिसेंबर २०१४ ही अंतिम तारीख ठरवण्यात आली आहे.

७) पाकिस्तान, अफगाणिस्तान आणि बांग्लादेश या देशांतून धार्मिक छळामुळे ज्या हिंदू, शीख, बौद्ध, जैन, पारशी आणि

ख्रिश्चन व्यक्तींनी भारतात स्थलांतर केले आहे. त्यांना CAB नुसार आपोआप नागरिकत्व मिळेलं का ?





# औंध वस्तुसंग्रहालय

B.A. II History

कलाप्रेमी राजाचा हा सुंदर दरबार,
ऋतुंना जिवंत करणारा कोण हा शिल्पकार
मातृत्व शिल्प श्रेष्ठ की प्रणयीभाव,
ही शिल्पा शिल्पांची स्पर्धा कोण जिंकणार ?
मनातील रंग हे गहिरे, चित्रांत कसे उमटले ?
प्रत्येक कलाकृतीत मन हे हरविले !
श्री भवानी चित्र संग्रहालय व ग्रंथालय : औंध .....
एक कलासंग्रह !

**औंधचे भवानी संग्रहालयाचा निर्मिती इतिहास :-**

औंध भवानी संग्रहालयातील शिल्प, चित्रे, कोरीव शिल्पे सोने आणि चांदीच्या मूर्ती या सर्व एकत्र जमविण्याचे काम एका माणसाने केले ते म्हणजे औंधचे राजे भवानराव पंत प्रतिनिधी या संग्रहालयामध्ये प्रदेशातील ठिकठिकाणच्या भारतातील अनेक वस्तू एकत्र ठेवलेल्या आढळतात. सन १९१९ मध्ये एक गोष्ट चार बैल असलेल्या एका खास बैलगाडीतून संग्रहालयासाठी एका मोठया लाकडी पेटीमधून एक वस्तू आणण्यात आली होती. पेटी उलगडल्यावर त्यात संगमरवरीची एक सुंदर मूर्ती बाहेर काढण्यात आली. ग्रीक देवता 'डायना' ची ही मूर्ती होती. पॅरीसमधल्या लुव्हर म्युझियम मधल्या मूर्तीची ही प्रतीकृती होती. त्यानंतर सुमारे पंचवीस वर्षानंतर म्हणजे सन २१९३७ मध्ये भवानराव पंत यांनी हेन्री मूर या जगप्रसिद्ध शिल्पकाराने बनवलेले एक शिल्प (मदर अँड चाइल्ड) या संग्रहालयासाठी मिळवले हे शिल्प त्यावेळी त्यांनी चाळीस डॉलरला विकत घेतले होते. जाणकारांच्या मते आज या शिल्पाची किंमत कोटयावधी रूपये आहे.

भवानराव ज्यावेळी औंध संस्थेचे राजे झाले त्यावेळी म्हणजे सन १९०९ मध्ये राजवाडयाचे एकही कलात्मक वस्तू नव्हती. भवानरावांच्या आगमनानंतर मात्र विविध प्रकारची चित्र, शिल्प, गालिचे इत्यादी वस्तूंनी राजवाडा भरून गेला.

कलात्मक वस्तूंचा संग्रह करण्याची त्यांना विशेष आवड होती. वेगवेगळया वस्तू ते उत्साहाने जमवीत असत. भवानरावांच्या बालपणापासून त्यांच्या वडीलांना कलेची आवड लावल्यामुळे त्यांना कलेमध्ये विशेष स्वास्थ निर्माण झाले.

१९०९ मध्ये भवानरावांचे वडील श्री. निवासराव यांचे निधन झाले. त्यावेळपर्यंत भवानराव चित्रकलेत पारंगत झाले होते. त्यांनी स्वतःची अनेक तैलचित्रे बनवली होती. या काळात

भवानरावांनी काढलेल्या रामायणावरील चित्रे आजही भवानी संग्रहालयात आहेत. भवानरावांनी स्वत: सन १८८८ ते सन १९०५ या काळात त्रावणकोरच्या रवी वर्मा यांच्या स्टुडीओला अनेकदा भेट दिली. भवानरावांचे स्वत चे तंत्रमंत्र खास असे होते. त्यांनी महाभारतावर काढलेल्या बारा मोठया चित्रांमध्ये ही शैली उठून दिसते. ही चित्रे सध्या औंधच्या श्री यमाईदेवी मंदिरात पाहावयास मिळतात तसेच रामायणावर भवानरावांनी काढलेली ६० चित्रे ही सुद्धा खास त्यांच्या शैलीतीलच आहेत.

औंध मध्ये सन १९१२ ते सन १९३४ या काळात जगातल्या वेगवेगळया भागातून विविध वस्तू आणल्या जात होत्या. सोन्याची नाणी, गालिचे, चादरी अशा वेगवेगळया वस्तू विकणाऱ्या एका व्यापाऱ्यासह भवानराव महाबळेश्वराला गेले. तिथे या व्यापाराने त्यांच्यासाठी दिल्लीहून आणलेले अष्टनायिका ही चित्रांची मालिका दाखवली हे पाहून राजे भवानरावांना इतका आनंद झाला की त्यांनी आजूबाजूच्या सगळयांना बोलावून ही चित्रे दाखवली आणि त्या सतराव्या शतकातील चित्रांबद्दल माहिती सांगितली. सन १९२७ ते सन १९३७ या काळात भवानरावांनी अशा प्रकारच्या चित्रांचे अनेक संच विकत घेऊन ते आपल्या संग्रही ठेवले.

पंजाबी कलाकारांची १९ व्या शतकाच्या सुरूवातीला बनवण्यात आलेली काही चित्रे या काळात भवानरावांनी आणली होती. ही चित्रे महाभारतातील प्रसंग चित्रीत करणारी होती. त्यामध्ये काही चित्रे अतिशय सुंदर होती. भवानराव १९३५ मध्ये आजारी पडले. त्यांना या आजारात खूप थकवा आला. त्यामुळे डॉक्टरांनी हवा पालटासाठी त्यांना युरोपच्या दौऱ्यावर जाण्याचा सल्ला दिला. भवानराव सहा महिन्यांसाठी दौऱ्यावर गेले. या दौऱ्यात त्यांनी जर्मनी, फ्रान्स, इटली, स्पेन इत्यादी युरोपातील शहरामधील अनेक संग्रहालये पाहिली. बराच प्रवास केला आणि खूप काही शिकले. या दौऱ्यावर भवानरावांनी त्या काळात दहा हजार रूपये खर्च केले. युरोपमधील महत्वाची मानली जाणारी सुमारे २० संग्रहालये पाहिल्यावर भवानरावांनी भारतात अशा प्रकारचे मोठे प्रशस्त आणि भरपूर हवा व प्रकाश असलेले संग्रहालय बांधण्याचे ठरविले.

सन १९३६ पर्यंत भवानरावांनी शेकडो आकर्षक वस्तू जमविल्या होत्या. रंगीत दगड आणि खडे एकत्र चिकटवून तयार केली गेलेली मोईझाक चित्रे यांनी त्या काळात जमविली होती. त्यामध्ये इम्प्रेशनिस्ट म्हणून ओळखली जाणारी क्युबीस्ट म्हणून प्रसिद्ध तसेच अमूल्य होती.

युरोपमधील संग्रहालयामध्ये पाहिलेल्या अभिजात चित्रांची प्रतिकृती त्यांनी येथे मिळवल्या होत्या राजे भवानरावांनी कोल्हापूर येथे राहणाऱ्या आपल्या पुतण्याला चित्रकलेचे शिक्षण घेण्यासाठी खास युरोपला पाठविले होते. त्यांच्या पुतण्याचे फ्रान्स, इंग्लंड, इटली मधील अनेक संग्रहालये पाहिली आणि तेथील चित्रांच्या प्रतिकृती येथे बनवल्या.

भवानरावांकडे शिल्पांचाही मोठा संग्रह होता. मायकेल अँजेलाचे प्रसिध्द चित्र 'डेव्हिड' हे त्यांना फार आवडत असे. त्याची एक प्रतिकृती त्यांनी बनवून घेतली होती. आज भवानी संग्रहालयात आपल्याला अनेक सुंदर सुंदर शिल्प आणि काही शिल्पांच्या प्रतिकृती आढळतात. एकदा भवानराव महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटकमधल्या २६ कलाकारांना घेऊन अजिंठा, वेरूळ, लेण्यांमध्ये गेले आणि या शिल्पकारांनी बनविलेल्या प्रतिकृती आजही सर्वत्र प्रसिद्ध आहेत. आजपर्यंत अजिंठा, वेरूळ बनविण्यात आलेली सुंदर चित्रे हीच आहेत.





# “गांडूळ खत निर्मिती” क्षेत्रीय अध्ययन

कु. प्रतिक्षा सा[illegible] पवार
बी.ए.भाग – [illegible] विभाग

मृदा भुगोल अभ्यास विषय अंतर्गत ‘‘गांडूळ खत निर्मिती’’ हा प्रकल्प निवडलेला आहे. जमिनीच्या विविध समस्यांत एक उपाययोजना म्हणून गांडूळ खत निर्मिती करणे ही एक उपयुक्त प्रक्रिया आहे. हे खत सेंद्रिय पदार्थातून तयार केले जाते. सेंद्रिय पदार्थांचे विघटन व्हावे यासाठी गांडूळांचा वापर केला जातो. गांडूळ खताच्या वापरामुळे जमिनीतील भौतिक गुणधर्मात योग्य बदल होऊन जमिनीची सुधारणा होते. जमिनीचा पोत, दर्जा, यात सुधारणा होते. समतोल राखण्यात गांडूळचे विशेष महत्त्व आहे.

* **अभ्यासाची उद्दिष्टे :–**

१) गांडूळ खत निर्मिती याचा अध्ययन करणे.
२) गांडूळ खताचा शेतीसाठी होणारा फायदा याचे अध्ययन करणे.
३) जमिनीचा कस वाढविण्याच्या दृष्टीने गांडूळ खताचे महत्व अभ्यासणे.
४) गांडूळ खत वापराविषयी जनजागृती करणे.

* अभ्यास क्षेत्र : गाव : कोपर्डे (हवेली)
* **अभ्यास पद्धती :–**

१) क्षेत्रीय मुलाखत
२) निरीक्षण
३) माहितीचे विश्लेषण
४) फोटो

* **निरीक्षण :–**

१) आजच्या पर्यावरणात्मक परिस्थितीत नैसर्गिक खत किती महत्वाचे आहे हे लक्षात येते.
२) गांडूळ खत निर्मितीत गांडूळ अत्यंत महत्वाचा घटक आहे.
३) गांडूळ खत निर्मितीत गांडूळ खतासाठी फारसा खर्च लागत नाही.
३) कमी जागेत आवश्यक वातावरणात गांडूळ खतनिर्मिती करता येते.
४) शेतकऱ्यांना गांडूळ खत निर्मिती अधिक फायदा मिळवता येतो हे लक्षात येते.

* **माहितीचे विश्लेषण :–**

गांडूळ खत हे एक नैसर्गिकरित्या तयार केले जाणारे खत असून त्याचे अनेक फायदे आहेत. गांडूळ खतामध्ये हयुमसचे प्रमाण जास्त असल्याने नत्र, स्फुरद, पलाश व इतर मुलद्रव्ये पिकात लवकर उपलब्ध होतात. जमिनीच्या सुपीकता जलधारणा क्षमता वाढते. व जमिनीची धुप कमी होते. शेतकऱ्याला या खताचा वापर करून कमी खर्चात अधिक उत्पादन मिळवता येते. तसेच पीक उत्तम प्रतीचे येते. गांडूळ खत निर्मितीमुळे पर्यावरणाचा समतोल राखला जातो.

* **गांडूळ खत प्रक्रिया :**

गांडूळ खत हे मुख्यतः चार पद्धतीने तयार केले जाते.

१) सिमेंटच्या टाकीमध्ये खतनिर्मिती
२) जाळीदार बॉक्समध्ये खतनिर्मिती
३) जमिनीवर प्लास्टिक कागद टाकुन वाफ्यात खतनिर्मिती
४) झाडाखाली ढिग पद्धतीने खतनिर्मिती

* **गांडूळ खत निर्मितीच्या पायऱ्या :-**

१) शेतातील काही कचरा व इतर सेंद्रिय पदार्थ एकत्रित करून त्याचे तुकडे करणे.
२) शेणखत, गोमुत्र यांचे मिश्रण तयार करणे.
३) अर्धवट कुजलेले पदार्थ व गांडूळ सोडणे.
४) साधारण ३० ते ४५ दिवसात खत तयार होते.
५) गांडूळ आणि खत वेगळे करणे.
६) गांडूळ खताचा शेतीसाठी वापर करतात.

* **गांडूळांची निवड :-**

चांगले उत्पादन मिळविण्यासाठी चांगल्या गांडूळांची निवड करणे आवश्यक असते. गांडूळ प्रजातीपैकी आयसिनिया प्रोटिया ही चांगली प्रजाती आहे. हे गांडूळ ५ ते ७ इंच अंदाजे १ वितभर लांब असून त्यांचा रंग तांबुस काळा असतो. खत निर्मितीसाठी चांगल्या प्रतीची गांडूळ निवडणे अत्यंत महत्वाचे असते.

* **जागेची निवड व बांधणी :-**

गांडूळ पैदास करण्यास जागेची निवड करताना जमिन पाण्याचा निचरा होणारी असावी. तसेच खत निर्मितीसाठी सावलीची आवश्यकता असते. तसेच अति तापमान आवश्यक नसते. त्यामुळे एखादया मोठया झाडाखाली खत निर्मिती करता येऊ शकते. सुर्यप्रकाश व पावसापासून संरक्षणासाठी छपराची शेड तयार करावी लागते. छपरासाठी प्लॅस्टीक, कागद, सिमेंट अथवा लोखंडी पत्रा, नारळाची झापे यांचा वापर केला जातो.

* **इतर आवश्यक घटक :-**

गांडूळ खत निर्मिती करताना पिकांचे अवशेष, इतर पालापाचोळा, शेणखत, गोमुत्र, तसेच पाणी, इ.

* **गांडूळ खताचे थर :-**

**गांडूळ खताचे एकूण पाच थर आहेत ते खालीलप्रमाणे -**

१) पहिला थर - या थर अगदी तळाचा थर आहे. या थरामध्ये ऊसाची पाचट, पालापाचोळा, नारळाचा काथ्या, शेतातील इतर कचरा याचा समावेश असतो. हा थर ३ फुट रुंद, १० फुट लांब, ४ इंच उंचीचा असतो.
२) दुसरा थर :- या थरामध्ये शेणाचा काला मुत्र याचा वापर करावा लागतो. हा थर १२ ते १५ से.मी असावा. यासाठी म्हैस, गाय, शेळया, कोंबडया यांची विष्ठा ८ ते १५ दिवस साठवावे.
३) तिसरा थर :- हा थरात गांडूळाचा थर असतो. यामध्ये प्रति किलो प्रमाणे कचऱ्यामध्ये १००० गांडूळ सोडावे.
४) चौथा थर :- या थरातील इतर कचरा पालापाचोळा शेणामध्ये मिसळून टाकतात.
५) पाचवा थर :- हा सर्वात वरचा आच्छादनाचा थर असतो.

* **गांडुळ खत तयार करताना घ्याययाची काळजी :-**

१) पाणी मारताना जास्त पाणी साचणार नाही याची काळजी घ्यावी.
२) गांडूळ खताच्या वाफ्यावर सरळ सुर्यप्रकाश येणार नाही अशी काळजी घ्यावी.
३) बेडुक, उंदीर, घुस, मुंग्या, गोम व पक्षी यापासून रक्षण करावे.
४) बेसन, गुळ, दही, ताक याचे यांचे मिश्रण हे गांडुळाची वाढ होण्यास पोषक द्रव्य म्हणून वापरावी.

* **गांडुळ खताचे फायदे :-**

गांडूळ खतामुळे जमिनीचा पोत सुधारतो. मातीच्या कणाच्या रचनेत उपयुक्त बदल घडून येतात. गांडूळाची विष्ठा म्हणजे एक उपयुक्त खत आहे. यातून झाडांच्या वाढीसाठी लागणारे नायट्रोजन, फॉस्फरस, पोटॅशिअम व सुक्ष्म अन्नद्रव्ये झाडांना, पिकांना मिळत असतात. जमिनीची नैसर्गिकरित्या मशागत केली जाते.

* **गांडूळ खतात असणारी अन्नद्रव्ये :-**

१) मुख्य अन्नघटक : नत्र, स्फुरद, पालाश
२) दुय्यम अन्नघटक : कॅल्शिअम, मॅग्नेशिअम, गंधक, लोह
३) **सुक्ष्म अन्नघटक :-** मॉलिब्हेनग, तांबे, झिंक, बेरॉन या अन्न द्रव्याखेरीज गांडूळ खतात उपयुक्त सुक्ष्म जिवाणू संप्रेरके विकरे सुध्दा आढळून येतात.

१) गांडूळ खताच्या वापरा लोकांमध्ये अधिक जनजागृती निर्माण करणे आवश्यक आहे.
२) शेतकऱ्यांना हे खत सहजरित्या निर्माण करता येऊ शकते.
३) गांडूळ खतामुळे होणारे फायदे लोकांना माहित नाहित.
४) शेतीसाठी रासायनिक खतांचा वापर करत असलेले आढळतात.
५) गांडूळ खताची निर्मिती करताना अनेक सेंद्रिय टाकाऊ पदार्थांचा वापर करता येतो.
६) गांडूळ खताच्या वापराद्वारे जमिनीचा कस वाढविता येतो.
७) जमिनीची जलसंधारण क्षमता वाढते.
८) गांडूळ खताच्या निर्मितीतून व या खताच्या विक्रीद्वारे शेतकऱ्यांना आर्थिक फायदा सुद्धा होऊ शकतो.
९) जमिनीचा समतोल राखला जातो.





# व्यक्तिमत्व विकास

प्रणाली घाडगे बी.ए.-II

प्रत्येक व्यक्तीला आपले एक स्वतंत्र व्यक्तिमत्व असते. त्या व्यक्तिमत्वाच्या विकास करणे प्रत्येकाला गरजेचे असते. व्यक्तीचा शारीरिक, मानसिक, भावनिक आणि सामाजिक विकास होत असतो. या विकासातून तिचा पिंड घडत असतो. व्यक्तिचा हा घडलेला पिंड म्हणजे व्यक्तिमत्व होय.

शरीराचा रंग व ठेवण, बुद्धी इत्यादी गोष्टी घेऊन व्यक्ती जन्माला येते. या गोष्टी तिला अनुवंशिकतेने मिळालेल्या असतात. व्यक्तीकडे असलेल्या उपजत अशा बाबींना जैविक बीजे म्हणता येईल. जीवन जगत असताना विविध बाह्य घटकांचा प्रामुख्याने सामाजिक घटकांचा व्यक्तीच्या विकासावर परिणाम होत असतो. जैविक बीजे आणि बाह्य घटक यांच्यामधील आंतरक्रियेचा परिपाक म्हणजे व्यक्तीचे व्यक्तिमत्व होय. अर्थात व्यक्तिमत्व विकासात अनुवंशिकता आणि वातावरण या दोन्हीशी संबंधित घटकांचा वाटा असतो. व्यक्तिमत्व विकासात वाटा असणाऱ्या घटकांमध्ये शरीररचना, अंतस्त्राव ग्रंथी, वेगवेगळया क्षमता, सभोवताली किंवा भौगोलिक परिस्थिती, कुटुंब, शेजारी, मित्र अशा अनेक घटकांचा समावेश होत असतो.

प्रत्येक व्यक्तीची शरीर रचना वेगवेगळी असते काही व्यक्तींचे शरीर उंच धिप्पाड तर काहींचे बुटके शरीर असते. काही व्यक्तिंचे शरीर सुडौल आणि व्यंगरहित असते. तर काहींच्या ठिकाणी शारीरिक व्यंगे असतात. व्यक्तिच्या शरीररचनेचा तिच्या समायोजनावर चांगला अथवा वाईट परिणाम होतो. उत्तम शरीरयष्टी आणि आकर्षक चेहरा असणाऱ्या व्यक्तीचा चेहरा इतरांवर लवकर प्रभाव पडतो. उत्तम शरीर संपत्तीच्या बळावर एखादा व्यक्ती नेता बनू शकतो.

काही व्यक्ती अतिशय बारीक असतात. माणूस लहानपणी जरी बारीक असेल पण योग्य आहार आणि नियमित व्यायाम यामुळे आपणांस शरीर भारदस्त बनवता येते. यासाठी सर्वांनी नियमित व्यायाम, योगासने आणि प्राणायाम नियमित करणे अतिशय आवश्यक आहे. योग्य व्यायाम, योग्य आहार आणि योग्य रोजनिशी यामुळे शरीरयष्टी उत्तम ठेवता येते. प्रत्येक व्यक्तीच्या व्यक्तिमत्व विकासासाठी हे अतिशय आवश्यक आहे.

शरीरयष्टी बरोबरच अंतस्त्राव ग्रंथींचाही शरीर रचनेवर परिणाम होत असतो. कंठपिंडातून जास्त स्त्राव होऊन रक्तात मिसळला तर वर्तनात अस्थिरता व चांचल्य येते. हा स्त्राव कमी झाला तर व्यक्ती सुस्त बनते. वृक्कस्थ पिंडातील स्त्रावामुळे भावनिक उद्रेकांच्या समयी शरीर व्यापावर ताबा राहतो. जननग्रंथीतील स्त्राव कामवासना वाढवितात. थोडक्यात हे

लक्षात घ्यायवास हवे की, व्यक्तिमत्व विकासात अंतस्त्राव ग्रंथीचा महत्वाचा वाटा आहे.

बौद्धिक क्षमतेचा व्यक्तिमत्व विकासावर फार परिणाम होतो. ज्या गोष्टी तैल बुद्धिच्या व्यक्ती सहज करू शकतात. त्या गोष्टी मंद बुद्धिच्या व्यक्तिंना जमत नाही. एखादया व्यक्तीच्या बुद्धिमत्तेची चमक दिसताच अन्य व्यक्ती प्रभावित होतात. बुद्धिसामर्थ्याने कोणतीही व्यक्ती इतरांवर आपले वर्चस्व प्रस्थापित करू शकते. व्यक्तिच्या व्यक्तिमत्वाच्या विकासासाठी कुशाग्र बुद्धिमत्ता चांगली असेल तर त्या व्यक्तीकडे बघताक्षणी त्याच्या चेहऱ्यावरील तेजाने त्याच्या उत्तम व्यक्तिमत्वाचे ज्ञान होते. अभिक्षमतेमुळे व्यक्तिमत्व परिपुष्ठ होण्यास मदत मिळते.

व्यक्तिच्या व्यक्तिमत्वावर भौगोलिक परिस्थितीचाही प्रभाव पडल्याचे दिसून येते. भौगोलिक परिस्थितीनुसार व्यक्तिमत्वाला विशिष्ट वळण लागते. डोंगर व जंगल असलेल्या प्रदेशातील लोक जास्त कष्टाळू असतात. सुपिक मैदानी प्रदेशातील लोक जास्त धडपड न करणारे, संथ व ऐषआरामाचे जीवन जगणारे असतात. अशाप्रकारे प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे भौगोलिक परिस्थितीचा व्यक्तिचा व्यक्तिमत्व विकासावर अनुकूल किंवा प्रतिकुल परिणाम होत नाही.

या सर्व गोष्टींमध्ये कुटुंब, कुटुंबसंस्था, कुटुंबातील प्रत्येक व्यक्ती, प्रत्येकाचा स्वभाव यांचाही व्यक्तिच्या व्यक्तिमत्वावर परिणाम होत असतो. घर हाच मुलांचा पहिला सामाजिक परिणाम होत असतो. घर हाच मुलांचा पहिला सामाजिक परिसर होय. आई वडील आणि कुटुंबातील अन्य व्यक्तींच्या वर्तनाचा तसेच घरातील सर्व वातावरणाचा मुलांच्या वर्तनावर फार परिणाम होत असतो. मुलांच्या योग्य प्रकारच्या व्यक्तिमत्व विकासासाठी त्याची मातृप्रेमाची गरज योग्य त्या प्रमाणात लहानपणीच भागविली जाणे अत्यावश्यक असते. त्या मुलाला प्रेमळ, वत्सल, सद्वर्तनी, फाजील लाड न करणारे आणि आपत्याच्या योग्य विकासाची काळजी घेणारे आई वडील लाभतात त्यांचे व्यक्तिमत्व योग्य रीतीने उमलते. आणि भविष्यात ते उत्तम व्यक्तिमत्वाचे व्यक्ती म्हणून ओळखले जातात. जर एखादया घरामध्ये वडीलांचा आवश्यकतेपेक्षा जास्त दरारा असेल व मुलाला कोणतेही स्वातंत्र्य लाभत नसेल तर अशी मुले भित्री फातर स्वभावाची होतात. अशा मुलांचा व्यक्तिमत्वाचा विकास होण्यास वेळ लागतो. मातापित्यांचा लहानपणीच वियोग झालेली मुले धास्तावलेली आणि चिंताग्रस्त होतात. ज्या मुलांचा फाजील लाड झालेला असतो ती मुले लहरी, स्वार्थी आणि हेकट स्वभावाची होतात. त्यामुळे मुलांचे व्यक्तिमत्व चांगल्या प्रकारे विकसित होऊ शकत नाही.

कुटुंबाबरोबरच शेजारी आणि मित्र यांचाही प्रभाव व्यक्तिच्या व्यक्तिमत्वावर होत असतो कळत नकळत शेजाऱ्यांच्या वागण्याचा त्यांच्या विचारांचा त्याचबरोबर त्यांच्या राहणीमानाचाही प्रभाव व्यक्तिच्या व्यक्तिमत्वावर होत असतो. व्यक्ति कुटुंबाबाहेर आपल्या मित्रांसोबत असतो. त्यांच्या वर्तन, विचार, राहणीमान याचाही प्रभाव व्यक्तिच्या व्यक्तिमत्वावर होत असतो. प्रत्येकाला आपले व्यक्तिमत्व सुधारणे व्यक्तिमत्वाचा विकास करणे आवश्यक असते.

प्रत्येक व्यक्तीने आपल्या व्यक्तिमत्वाच्या विकासासाठी SWOT Analysis करणे गरजेचे आहे.

**SWOT**

*** S :- Strength -** बलस्थाने

प्रत्येक व्यक्तीने स्वतःमध्ये कोणती बलस्थाने किंवा गुण आहेत. याचा आंतर्मुख

* **W :- Weaknesses -** मर्यादा/ दोष

प्रत्येक व्यक्तीने आपल्यामधील दोष/मर्यादा ओळखून त्यावर आंतरमुख होऊन विचार करावा आणि आपले दोष दूर करण्यासाठी प्रयत्न करावा.

* **O - Oportunity -** संधी

प्रत्येकाने आपल्या आयुष्यात येणाऱ्या प्रत्येक सुसंधीचे सोने करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावा.

* **T :- Threats -** तृटी

प्रत्येक व्यक्तीने आपल्या व्यक्तिमत्वातील तृटी ओळखून त्या सुधारण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे आवश्यक आहे. प्रत्येकाने वरीलप्रमाणे स्वतःचे SWOT Analysis केले तर व्यक्तिमत्व विकास होण्यास मदत होईल.






भारताच्या विकासासाठी कृषीचा विकास होणे आवश्यक आहे. कृषी क्षेत्र हे भारताच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. या अर्थसंकल्पामध्ये शेतकऱ्यांचा व गरीब जनतेचा विचार करण्यात आला आहे. याला अनुसार कृषी विकासासाठी अनेक कार्यक्रम राबवण्याचे ठरवले आहे.

**कृषी क्षेत्राच्या विकासासाठी १६ कलमी कार्यक्रम**

- कमी पाणीवापर, खतांच्या संतुलित वापराद्वारे उत्पादनवाढीसाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन
- देशातील पाणीटंचाई ग्रस्त १०० जिल्हयांसाठी समग्र उपाययोजना अन्नदाता योजनेचा विस्तार 'ऊर्जादाता' पर्यंत 'सौरऊर्जा' निर्मिती द्वारे उत्पन्न मिळवण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन
- 'प्रधानमंत्री किसान ऊर्जा सुरक्षा' (कुसुम) योजनेचा विस्तार करून २० लाख शेतकऱ्यांना मदत
- नाबार्डद्वारे देशभरातील गोदामांचे सुसूत्रीकरण करण्याबरोबरच नवी गोदामे उभारणार
- ग्रामीण भागांतील महिलांच्या सक्षमीकरणासाठी धान्यलक्ष्मी योजनेंतर्गत 'मुद्रा' किंवा नाबार्डकडून अर्थसाहाय्य.
- 'किसान रेल' आणि 'कृषी उडान' योजनांद्वारे वेगवान शेतमाल पुरवठा.
- ईशान्येकडील राज्यांसह आदिवासीबहुल जिल्हयांवर विशेष लक्ष
- फलोदयानास चालना, राज्य सरकारच्या मदतीने प्रत्येक जिल्हयात एक फळ उत्पादनास प्रोत्साहन
- पावसाच्या पाण्यावर शेती अवलंबून असलेल्या भागांत एकात्मिक

शेती योजनेचा विस्तार, सौर ऊर्जा निर्मिती आणि मधुमक्षिका पालनासाठी प्रोत्साहन कृषी उत्पादनाच्या ऑनलाइन पेठांचे बळकटीकरण देशाची दुध उत्पादन प्रक्रिया क्षमता २०२५ पर्यंत दुप्पट म्हणजे

- १०८ दशलक्ष मेट्रिक टनांपर्यंत वाढविण्याचे लक्ष्य
- येत्या २०२१ –२२ पर्यंत मत्स्योत्पादन २०० लाख टनांपर्यंत वाढविणार
- २०११ पर्यंत १५ लाख कोटी इतके कृषी कर्जवाटपाचे लक्ष्य
- लाळया-खुरकूत रोगाचे २०२५ पर्यंत निर्मूलन करण्याचा निर्धार
- जनावरांच्या रोगनिर्मूलनावरही भर
- सागरी विकासाचा भाग म्हणून मत्स्य शैवालवाढीवर भर
- मत्स्य क्षेत्रात युवकांच्या सहभागवाढीसाठी "सागरमित्र" योजना आणि मत्स्य उत्पादकांच्या ५०० संघटना उभारणार.

*** किसान रेल**

- भारतीय रेल्वेकडून 'किसान रेल' योजना राबविण्यात आली. नाशवंत शेतमालाच्या पुरवठयासाठी 'किसान रेल' सुरू करण्यात येणार आहे. एक्सप्रेस आणि मालगाडयांमध्ये शीतपेटीची सुविधा येणार आहे. त्यामुळे नाशवंत शेतमालाची वाहतुक वेगवान होईल, असे सीतारामन यांनी सांगितले.
- रेल्वेच्या सेवेत आधीच अशा नऊ शीतगाडया आहेत. या शीतकपाटाची/ गाडयांची वहन क्षमता प्रत्येक १७ टनांची आहे. असे रेल्वे मंडळाचे अध्यक्ष व्ही. के. यादव यांनी सांगितले.

*** कृषी उडान**

- शेतमालाला चांगला भाव मिळावा या उद्देशाने शेतमालाच्या वाहतुकीत मदत करण्यासाठी हवाई वाहतूक मंत्रालयात तर्फे 'कृषी उडान योजना' राबविण्यात येणार आहे.
- नागरी हवाई वाहतूक मंत्रालयातर्फे आंतरराष्ट्रीय आणि देशांतर्गत हवाई मार्गावर ही योजना राबविली जाईल. यातून शेतमालाच्या मूल्यवर्धनासाठी मोठी मदत होईल. विशेषतः देशाच्या ईशान्येकडील भाग आणि आदिवासी

जिल्हयांसाठी ही मोदी सरकारने २०१६ मध्ये प्रादेशिक दळणवळण सुधारावे यासाठी उडान योजना सुरू केली होती.

योजनेअंतर्गत दुर्गम दुर्लक्षित भागातील विमान वाहतुकीला प्रोत्साहन देण्यासाठी तसेच त्या मार्गावरील हवाई प्रवास भाडे माफक असावे म्हणून संबंधित विमान कंपन्यांना केंद्र तसेच राज्य सरकार आणि विमानतळ प्राधिकरणाकडून आर्थिक सवलती दिल्या जातात. सरकारने आखलेल्या या योजना जर अस्तित्वात आल्या तर खरचं कृषीचा विकास होईल व शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यास मदत होईल. भारत हा देश समृद्ध बनण्यास मदत होईल.



## पानिपत युद्ध
## सातारा जिल्हयातील शिंदे घराणे

भोपते नम्रता शरद बी.ए.भाग-२ इतिहास

मराठयांचा चिवट अतुलनीय पराक्रमाची पराकष्टा म्हणजे पानिपतचा रणसंग्राम होय. १७६०-६१ च्या या युद्धात 'बचेंगे तो और भी लढेंगे' असे म्हणत रक्ताच्या अखेरच्या थेंबापर्यंत मागे न हटता गनिमास भिडणारे दत्ताजी शिंदे, जयाप्पा शिंदे, तुकोजी शिंदे, ज्योतिबा शिंदे, जनकोजी शिंदे, साबाजी शिंदे व या रणसग्रामात गंभीर जखमी होऊन वाचलेले व नंतर आपल्या पराक्रमाने पानिपतचा बदला घेऊन दिल्लीसह अटकेपर्यंत छत्रपतींचा १ भगवा फडकता ठेवणारे महादजी शिंदे यांची मुळ जन्मभुमी म्हणजे सातारा जिल्हयातील कण्हेरखेड होय. ' पानिपत' हा शब्द जरी कानी पडला तर आज महाराष्ट्रातील प्रत्येक जण हळहळतो. कारण परकीय शत्रूशी लढताना आमच्या बापजाद्यांनी रक्ताची होळी खेळली तो दिवस होता. 'मकर संक्रांतीला १४ जानेवारी १७६१ महाराष्ट्रातील अख्खी पिढी पानिपतावर खपली. त्याच्या स्मरणार्थ ऐतिहासिक वारसा लाभलेल्या गावात त्यांची स्मारके उभी आहेत. काही चांगल्या स्थितीत आहेततर काही नामशेष झाली आहेत.पानिपत आणि कण्हेरखेड गाव म्हंटलं की फक्त डोळयासमोर उभा राहतो मराठा वीरांचा पराक्रम आणि बलिदान या वीरांच्या स्मृतीचा जागर राहण्यासाठी गावात १६ खांबी स्मारक, ४ खांबी स्मारक व अलिजा बहाद्दर श्रीमंत महादजी शिंदे सरकार यांचा भव्य राजवाडा तसेच घोडयांच्या पागा, शिव-शंकराचे (कव्हरेश्वर) स्वयंभू मंदिर असून जानाई मंदिरासारखी मंदिरे आहेत. शिवकाळापासून स्वराज्य सेवेत असलेलं शिंदे घराणे हे खऱ्या अर्थान 'वेडात मराठे वीर दौडले सात' या प्रतापराव गुजरांच्या सोबतील अवघ्या सात मावळयांनी केलेल्या पराक्रमावेळी विठोजी शिंदेच्या सहभागाने नावारूपाला आलं पुढे जाऊन कण्हेरखेडच्या शिंदे घराण्यातील कन्येचा विवाह दस्तुर खुद्द छत्रपतीच्या घराण्यात झाला. तेही छत्रपती श्री संभाजी महाराज यांचे सुपुत्र श्री छत्रपती शाहू महाराज यांच्याशी छत्रपती श्री शाहू महाराजांच्या सेवेत अगदी औरंगजेबच्या कैदेपासून कण्हेर खेडचे नेमाजी शिंदे होते. पुढे याच गावच्या शिंदे भावकीने स्वराज्याची सेवा कायम राखत पानिपतच रणमैदान गाजवलं अगदी उदगिरच्या किल्ल्यापासून कुंजपुरा किल्ला ते दिल्लीच्या लाल किल्ल्यावर भगवा फडकावण्यात या घराण्याने शौर्य गाजवले. 'अटकेपार झेंडा रोवला' ही म्हण आजही प्रचलित आहे. ते मराठयांच्या पराक्रमामुळे अटक किल्ल्यावर साबाजी शिंदे, मानाजी शिंदे यांनी शिवरायांचा भगवा जरीपटका फडकवला व सरळ नजर रोखली ती अब्दालीच्या साम्राज्यावर इ.स. १७५८ मध्ये मराठयांनी दिल्लीवर कब्जा मिळवला व मुघलांना नाममात्र राज्यकर्ते बनवले. पानिपतमध्ये अमरत्व मिळालेल्या विरांचे १६ खांबी स्मारक

४ खांबी स्मारक, फक्त कण्हेरखेड साठीच प्रेरणा नाहीत तर संबंध हिंदूस्थानासाठी लढलेल्या ४८ मराठा सरदार घराण्याचा सेना व १८ पगड जातीतील प्रत्येक मावळयांच प्रतीक आहे. आपण भाग्यवान आहोत की सातारा जिल्हयातील कोरेगाव तालुक्यातील कण्हेरखेड या गावातील दत्ताजी शिंदे, जनकोजी शिंदे, जयाप्पाराव शिंदे, तुकोजी शिंदे, ज्योतिबा शिंदे, बयाजी शिंदे, येसाजी शिंदे, जीवाजीराव शिंदे, धारराव शिंदे, संभाजी शिंदे, हणमंतराव शिंदे, फिरंगोजी शिंदे, मानाजी शिंदे, खलोजी शिंदे, आनंदराव शिंदे आदी सुपुत्रांनी व अनेक मराठा सरदारांनी पराक्रमाची शर्थ करून परकीय आक्रमणापासून हिंदूस्थानचे रक्षण केले. या विरांची पानीपतकालीन स्मारके आजही संबंध देशाला 'तमसो मा ज्योतिर्गमय' असा संदेश देत आहेत. हा केवळ स्मारके नसून, आपल्या बापजाद्यांच्या छातीचे कोट आहेत. ज्यांनी अब्दाली नजीबसारख्या क्रूर, कपटी परकीय आक्रमणकारांना सैर-भैर केलं व हिंदुस्थान अबाधित राखला स्वराज्याचा अखंड शिवकार्यात आपले सर्वस्व झोकलं अशा या शिवरायांच्या मावळयांना अभिवादन!





# अहवाल
विभाग



"Education is the most
powerful weapon
we can use to
change the world"

- Nelson Mandela

विभागीय संपादक
प्रा. डॉ. वंदना मोहिते

# अंतरंग


| | | | |
|---|---|---|---|
| ❖ | Individual Report 2019 - 20 | - | 49 |
| ❖ | विभागिय अहवाल | - | 51 |
| 1) | Competitive Examination Guidance Centre | - | 52 |
| 2) | Spoken English Course | - | 52 |
| 3) | IQAC/RUSA Committee | - | 52 |
| 4) | UGC Committee | - | 53 |
| 5) | मराठी विभाग अहवाल | - | 53 |
| 6) | अविष्कार समिती | - | 53 |
| 7) | प्लेसमेंट सेल | - | 53 |
| 8) | हेल्थ सेंटर | - | 54 |
| 9) | शैक्षणिक सहल कमिटी | - | 54 |
| 10) | अॅकॅडमिक कॅलेंडर, टाईम टेबल व रोल कॉल कमिटी | - | 54 |
| 11) | शॉर्ट टर्म कोर्स कमिटी | - | 54 |
| 12) | रेमिडीयल कोर्स कमिटी | - | 55 |
| 13) | महिला लैंगिक छळ व तक्रार निवारण कमिटी | - | 55 |
| 14) | स्कॉलरशिप कमिटी | - | 55 |
| 15) | Staff List | - | 56 |




## Individual Report 2019-20

**प्रा.मारुफ मुजावर (हिंदी)**

1) Research Paper published - SHODHA SARITA International Multidisciplinary Research Journal - Approved UGC Care - ISSN - 2348 - 2397
2) सहभाग :- एक दिवशीय कार्यशाळा – 'विद्यार्थी कल्याण निवडणुका' संयोजक : शिवाजी विद्यापीठ , कोल्हापूर, दि. 15 जुन 2019.
3) संशोधन पेपर प्रस्तुती व सहभाग – एक दिवशीय राष्ट्रीय चर्चासत्र – 'द रोल ऑफ मास मिडीया इन टीचींग लंग्वेज' संयोजक : विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर दि. 5 ऑक्टोंबर 2019.
4) संशोधक पेपर प्रस्तुती व सहभाग – एक दिवशीय राष्ट्रीय चर्चासत्र – 'इक्कीसवी सदी के हिंदी कथा साहित्य में चित्रित विविध विमर्श' – संयोजक : नाईट ऑफ आर्टस् अॅण्ड कॉमर्स कॉलेज, इंचलकरंजी दि. 7 डिसेंबर 2019
17) सहभाग – एक दिवशीय आंतरराष्ट्रीय चर्चासत्र – संयोजक डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज, औंधगाव, पुणे दि.15 डिसें.2019
18) सहभाग – द्वी दिवशीय राष्ट्रीय चर्चासत्र, 'रिसर्च आउटलूक इनोवेटीव प्रॅक्टीस' संयोजक स.गा.म. कॉलेज, कराड दि. 28 व 29 फेब्रुवारी 2020
19) एल.आय.सी. समिती सदस्य –पी.व्ही.पी महाविद्यालय, कवटेमहंकाळ दि. 28 डिसेंबर 2019
20) एल.आस.सी. समिती सदस्य – प्रा. डॉ. एन.डी.पाटील महाविद्यालय, मलकापुर दि. 7 जानेवारी 2020.
24) प्रिसायडींग ऑफिसर – सार्वत्रिक निवडणुक 2019 – दि. 21 ऑक्टोंबर 2019.
25) मेजर प्रोजेक्ट प्रपोजल सादर – स्ट्राईड (STRIDE ) – विषय : 'आधुनिक हिंदी साहित्य की विकास यात्रा में मराठी भाषी-साहित्यकारों का योगदान' दि. 30 सप्टेंबर 2019.

**Personal Report Mr. Nilesh T. Phase**

1. Presented a research paper entitled "Racism in Rahul Varma's Plays" in Two Day International Conference held on 18th & 20th Dec, 2019 by Dahiwadi College Dahiwadi
2. Completed 'Annual Refresher Course' for career Advancement Scheme (CAS) orgnized by UGC - HRDC Gujrat University.

**Dr. Vandana Mohite**

1) कर्मवीर विद्याप्रबोधिनी, सातारा व डी.जी कॉलेज सातारा यांच्या संयुक्त तत्वावधाने आयोजित दोन दिवसीय व्याख्यानमालेत सहभाग घेतला. विषय (Issues in Higher Education)
2) छत्रपती शिवाजी कॉलेज सातारा येथे एक दिवशीय वर्कशॉपसाठी उपस्थित विषय (Soft Skills and E. Governance ")
3) महाविद्यालयातील महिला तक्रार निवारण समिती, व वाङमय मंडळ कमिटी अंतर्गत चेअरमन म्हणून कार्यरत

**Mrs. Asha Budharam Madavi M.A. NET Department of Geography**

3. Lecture delivered on **" Culture and Literature of Tribe"** The World Tribe Day in S.G.M College Karad. ( 30th August - 2019)
4. Worked as a **LIC committee of Shivaji University, Kolhapur.** Visited to Mahila Mahavidyalaya Kasaba Beed, Kolhapur. (18th Dec - 2019)
5. Completed Fifteen Days Online Certificate Course on **'Research Methodology'** with " A" Grade. ( 4th Dec. 2019 to 19th Dec - 2019)
6. Attend One Day workshop on **" GIS & New Geographical Technology"** in S.G.M. College Karad. (28th December - 2019)
8. Attend Two Days workshop on **" UGC Grant, GST, TDS, Account writing and process"** organized by Rayat Shikshan Sanstha's Satara. ( 10th & 11th January - 2020)

10 Completed Faculty Development Course in **'Train to Trainer'** by **MIIRDC & PMMMNMTT** Savitribai Phule Pune University (17th to 26th February 2020)

11 Worked as a Co-ordinator of **Short Term Courses** in the M.R. Jagtap Mahila Mahavidyala, Umbraj

12 Attend One Day National Conference on **Emerging Trends in Zoology and Biotechnology"** on 7th March 2020 organized by Department of Zoology and Biotechnology in Sadguru Gadage Maharaj College, Karad

13 Attend Two Days National Workshop on **"Preparation of IIQA & SSR"** under the PARAMARSH Scheme held on 14th & 15th March 2020 organized by IQAC cell in Sadguru Gadage Maharaj College, Karad.

14 **"Effectiveness of Different Detergent (Rin & Wheel) Solution on Population of Mosquito Larva : Case Study"**. Research paper published in IJCRT (www.ijcrt.org) & 7.97 Impact factor by Google Scholar 26th March 2020.

15 Completed Two weeks Faculty Development Programme on **'Managing Online Classes and Co-Creating MOOCs'** by **MIIRDC & PMMMNMTT.** (20th April to 06th May 2020)

**प्रा.डॉ. उमाप ए.एस. मराठी विभाग प्रमुख**

1) शुक्रवार दि. 10 जाने. 2020 रोजी शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर आणि रयत शिक्षण संस्थेचे छ. शिवाजी कॉलेज, सातारा. मराठी विभागाने आयोजित केलेल्या राष्ट्रीय आंतरमहाविद्यालयीन मराठी कथाकथन स्पर्धेचे परीक्षक म्हणून काम केले.

2) दिनांक 17, 18 व 19 जाने. 2020 उंब्रज ता. कराड, जि. सातारा येथील साहित्यप्रेमी समाज यांनी आयोजित केलेल्या त्रिवेणी साहित्य संमेलनात स्वरचित कवितेचे काव्यगायन केले.

**Mrs. Patil Kalpaba N. Dept. of Psychology**

2. **'Jungs archetype Theory and Literature'** Research Paper Present and Published at One Day Interdisciplinary International Conference at S.G.M. College, Karad, held on 12 Feb. 2020. (Publication Details AJANTA - ISSN 2277-5730 - Impact Factor - 6.399, Vol, IX Issue - 1 January to March 2020)

3. **'Quality of Life and Occupational Stress among Male and Female Police Constables'** Research Paper Present and published at One Day Interdisciplinary International Conference at Balwant College, Vita, held on 23 Feb. 2020 ( Publication Details - Aayushi International Interdisciplinary Peer Reviewed Journal - ISSN - 2349 - 638X, Impact Factor - 6.293)

7. Completed Two Weeks Faculty Development Programme on **" Managing Online Classes and Co-creating Moocs' by MHRDC & PMMMNMTT. "** ( 20th April to 06th May 2020)

**Prof. Manisha Ghadage**

1. Attend one Day State level conference on. "Environment and Society' at Devchand College. Arjunnagar, Paper presentation entitled " Importance of organic Farming.
2. Attend Lead College one day workshop on " the roll of media in the orientation of Society" at S.G.M. college, Karad, dated 10 Jan. 2020

**शैला माने**

1) Research Paper Publication - 2 दिवशीय राष्ट्रीय चर्चासत्र - '' मध्ययुगीन मराठी वाङ्मयातील विविध संप्रदाय'' संयोजक-सदगुरू गाडगे महाराज कॉलेज कराड. 1 व 2 फेब्रु. 2020 (Research Journal ISSN No. 2319 - 6025)

2) Research Paper Publication - 2 दिवशीय राष्ट्रीय चर्चासत्र - ' ज्ञानेश्वरी ते विज्ञानेश्वरी'' संयोजक - महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालय, श्रीगोंदा दि. 17 व 18 फेब्रु. 2020.





## राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबीर

शैक्षणिक वर्ष २०१९ - २० मध्ये शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर व महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना समितीच्यावतीने, विशेष श्रमसंस्कार शिबीर दि. ३०/०८/२०१९ ते ०५/०९/२०१९ या कालावधीत पूरग्रस्त गाव मौजे तुपारी ता. पलूस, जि. सांगली येथे संपन्न झाले. शिवाजी विद्यापीठाचे माननीय कुलगुरू महोदय, डॉ. देवानंद शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार यावर्षीची गंभीर पूरपरिस्थिती पाहता, सांगली व कोल्हापूर जिल्हयातील पूरग्रस्त भागात विशेष श्रमसंस्कार शिबीर घेण्याचे आयोजन करण्यात आले. त्यासाठी सांगली जिल्हयातील, पलूस तालुक्यातील मौजे तुपारी या पूरग्रस्त गावाची निवड करण्यात आली.

शिबीराच्या पहिल्या दिवशी औपचारिकरित्या शिबीराचे उद्घाटन करण्यात आले. प्रा. डॉ. मच्छिंद्र सकटे सर अध्यक्षस्थानी होते. या कार्यक्रमाला ५० स्वयंसेविका, महाविद्यालयाचा स्टाफ, तुपारीचे सरपंच व सर्व मान्यवर ग्रामस्थ उपस्थित होते. उद्घाटनानंतर मौजे तुपारी या संपूर्ण गावातील प्लास्टिक सर्व स्वयंसेविकांनी गोळा केले. यामध्ये प्लास्टिक पिशव्या, प्लास्टीक सर्व स्वयंसेविकांनी गोळा केले. यामध्ये प्लास्टिक पिशव्या, प्लास्टिक बाटल्या इ. चा समावेश होता. ग्रामपंचायतीच्या माध्यमातून त्याची विल्हेवाट लावण्यासाठी ते पंचायत समितीच्या ताब्यात देण्यात आले शिबीराच्या दुसऱ्या दिवशी म्हणजेच दि. ३१/०८/२०१९ रोजी सकाळची प्रार्थना झाल्यानंतर ग्रामस्वच्छता करण्यात आली. त्यामध्ये गावातील मुख्य रस्ता, दह्यारी वाटेचा रस्ता, गावातील सर्व छोटेमोठे रस्ते, गल्लीबोळ यांची स्वच्छता करण्यात आली.

शिबीराच्या तिसऱ्या दिवशी म्हणजेच दि. ०१/०९/२०१९ रोजी सकाळची प्रार्थना झाल्यानंतर स्वयंसेविकांनी स्मशानभूमी स्वच्छतेला सुरुवात केली. संपूर्ण स्मशानभूमी जवळजवळ १० ते १२ दिवस पाण्याखाली होती. नदी जवळ असल्यामुळे स्मशानभूमीच्या संपूर्ण शेडवर गाळ साचला होता. तो गाळ काढून स्मशानभूमीची योग्यप्रकारे स्वच्छता करण्यात आली. सदरकामी सरपंच व गावातील इतर व्यक्ती यांचीही मदत मिळाली. त्याचदिवशी पलूस तालुका पंचायत समितीचे माजी सभापती, सरपंच व काही ग्रामपंचायत सदस्य यांच्या हस्ते स्मशानभूमी सभोवती वृक्षारोपण करण्यात आले. शिबीराच्या चौथ्या दिवशी म्हणजेच दि. ०२/०९/२०१९ रोजी स्मशानभूमीची उर्वरित स्वच्छता करण्यात आली. याचदिवशी सायंकाळी डॉ. वैशाली सावंत, माजी सभापती पलूस तालुका पंचायत समिती यांचे महिला व युवतींचे आरोग्य या विषयावर प्रबोधनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

शिबीराच्या पाचव्या दिवशी दि. ०३/०९/२०१९ रोजी स्वयंसेविकांनी कृष्णा नदीच्या खचलेल्या बंधाऱ्याची पाहणी केली. वृक्षारोपणासाठी नदीच्या बंधाऱ्यापासून पश्चिम बाजूस खड्डे खणण्यात आले. जवळजवळ २५ वृक्षांची लागवड करण्यात आली. तसेच सदर दिवशी गावापासून जवळच असलेले मानवनिर्मित मागेश्वर देवालयाभोवतीची स्वच्छता करण्यात आली. शिबीराच्या सहाव्या दिवशी दि. ०४/०९/२०१९ रोजी पूरग्रस्त गावातील महिलांसाठी आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये हिमोग्लोबिन तपासणी, धनुर्वात इंजेक्शन व आरोग्याच्या इतर समस्यांचे निराकरण करण्यात आले. यासाठी डॉ. विनय पाटील व त्यांच्या टीमचे सहकार्य लाभले. सदर शिबीरात ८० महिला व मुलींचे आरोग्य तपासणी करण्यात आली. यादिवशी सांगली जिल्हा परिषदेचे गटनेते मा. शरदभाऊ लाड, तसेच आंबेगावबुद्रुक पुणे येथील नगरसेवक मा. श्री.युवराज बेलदरे व त्यांच्या सहकाऱ्यांनी शिबीराला सदिच्छा भेट दिली. सदर दिवशी सायंकाळी श्री. गोपाळ पाटसुते सर यांचे 'युवाशक्ती आणि भारत' काल, आज व उद्या' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

दि. ०५/०९/२०१९ रोजी विशेष श्रमसंस्कार शिबीराचा समारोप समारंभ संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी पूरग्रस्त गावाला भेट देण्यासाठी आलेले मा. श्री. चंद्रशेठ कदम, नगरसेवक, पुणे महानगरपालिका हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. अध्यक्षस्थानी पलूस तालुका पंचायत समितीचे माजी सभापती, मा. श्री. संजय पाटील हे होते. प्रमुख उपस्थितीमध्ये मौजे तुपारीचे प्रथम नागरिक, सरपंच, मा. श्री. नितीन पाटील, सर्व ग्रामपंचायत सदस्य, माजी सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. राष्ट्रीय सेवा योजना समितीच्या कार्यक्रम अधिकारी प्रा.सौ.पाटील के. एन. यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. दोन स्वयंसेविकांनी आपले मनोगत व्यक्त केले. महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी मार्गदर्शन केले. शिबीर यशस्वी होण्यासाठी सर्व ग्रामस्थांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## नियमित कार्यक्रम अहवाल

शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये शिवाजी विद्यापीठाच्या सूचनेनुसार यावर्षी आषाढी एकादशी निमित्त असणाऱ्या दिंडी सोहळयात दि० ४ व ५ जुलै २०१९ रोजी राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेविकांनी सहभाग नोंदवला. यामध्ये एकूण २० स्वयंसेविकांनी सहभाग घेतला. फलटण याठिकाणी दिंडी मुक्कामी होती. फलटण येथील विमानतळ, रस्ते तसेच दिंडी थांबलेल्या ठिकाणची स्वच्छता करण्यात आली. महाविद्यालयाचे प्रा.डॉ. मोहिते व्ही. एस., प्रा. पवार एल.के. आणि प्रा. तांबे एम.जी. या प्राध्यापकांनी सहभाग घेतला. ११ जुलै २०१९ रोजी तंबाकू विरोधी दिनी एन.एस.एस. स्वयंसेविका व स्टाफने शपथ घेतली.

कॉलेज परिसर स्वच्छता - राष्ट्रीय सेवा योजना समितीच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये वेळोवेळी कॉलेज परिसर स्वच्छता करण्यात आली १५ ऑगस्टच्या अनुषंगाने दि. १४/०८/२०१९ रोजी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेतील ४० स्वयंसेविकांनी कॉलेज परिसर स्वच्छता केली. तसेच २२ सप्टेंबर कर्मवीर जयंतीच्या अनुषंगाने दि. २१/०९/२०१९ यादिवशी देखील महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेविकांनी कॉलेज परिसर स्वच्छता केली. २०/१२/२०१९ रोजी माजी विद्यार्थिनी मेळाव्याच्या अनुषंगाने महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी कॉलेज परिसर स्वच्छता केली.

वृक्षारोपण - महाराष्ट्र शासनाच्या ३३ कोटी वृक्षलागवड कार्यक्रमाच्या धोरणाच्या अनुषंगाने, शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये राष्ट्रीय सेवा योजना समितीच्या वतीने दि. २९ सप्टेंबर २०१९ रोजी बहोली भिकेश्वर ता. कराड जि. सातारा वाडिकाणी गावठाण भागात एकूण १०० रोपांची लागवड करण्यात आली. त्यासाठी शासकीय वनविभाग, शाखा वाडे ता. कराड जि. सातारा यांनी रोपांची उपलब्धता करून दिली. या वृक्षारोपणासाठी बहोली भिकेश्वर या गावच्या प्रथम नागरिक सरपंच सौ. मदा नामदेव साळुंखे, सर्व ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेविका आणि महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेविका, कार्यक्रम अधिकारी प्रा. सौ. पाटील के. एन., प्रा. साळुंखे एम.टी. व शिक्षकेतर सेवक आदि उपस्थित होते. दि. २ ऑक्टोबर २०१९ रोजी महात्मा गांधी जयंती साजरी करण्यात आली. या दिवसाचे औचित्य साधून राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेविकांनी व एन.एस.एस. समितीतील सर्व सन्माननीय सदस्य यांनीही परिसर स्वच्छतेमध्ये आपले योगदान दिले. सदर दिवशी एन.एस.एस समितीच्या वतीने श्री. जीवन इगळे यांचे 'चरख्यावर सूतकताई' चे प्रात्यक्षिक ठेवण्यात आले. उपस्थित सर्व विद्यार्थी, प्राध्यापक व मा. प्राचार्य यांनी सूतकताईचे प्रात्यक्षिक प्रत्यक्षात करून बघितले. समितीच्या वतीने दि. ७ डिसेंबर २०१९ रोजी, 'एडस् जाणीवजागृती' या विषयावर प्रबोधनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले. यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र, उंब्रज येथील वैद्यकिय अधिकारी डॉ. संजय कुंभार यांनी मार्गदर्शन केले.

समितीचे कामकाज यशस्वी होण्यासाठी महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ. एस.एम कांबळे साहेब यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

**एन.एस.एस. प्रकल्प अधिकारी, प्रा.सौ.पाटील के.एन.**

## Competitive Examination Guidance Centre

**'Competitive Examination Guidance Centre'** was established in the academic year 2012-13. Since then it has been running effectively. 24 students have enrolled their names in this academic year. A separate schedule of this course is prepared. Faculties of various subjects guide the students as per the time table.

In order to create awareness about competitive examinations among the students, speeches of successful candidates are organized. **Hon. Dr. Dnyanda Phanase, Dy. Director, Rurban development, Govt. of Maharashtra** guided the students on how to prepare for competitive examinations, Hon. Mr. Suman Kumar, Manager, Bank of Maharashtra. Umbraj Branch and **Hon. Mr. Ramesh Kamble, Extension Officer, Dept. of Education, Patan** also inspired the students with their speeches.

**Chairman Mr. Phase N.T**

## Spoken English Course

Dept. of English runs ' Spoken English Course' of 6 months duration. The course was started from 2011. This year 22 students have taken admission for this course. A separate syllabus of the course has been designed. At the end of the course a written and an oral examination of the students in conducted. Mr. Rahul Wadate has been appointed as an instructor of the course. There is a qualitative improvement among the students in terms of communication in English.

A well-equipped language lab has been established in the year 2005. One software of Spoken English' has been purchased by the college. There are necessary facilities Such as 20-01 delegate units, one computer, one LCD projector and internet connection in the language lab.

Dept. of English runs' Spoken English Course' Of 6 months duration. This year 19 students have taken admission for this course. A separate syllabi of the course has been designed. At the end of the course a written and oral examination of the students is conducted. Mr. Rahul Wadate has been appointed as an instructor of the course. The students of the college get maximum benefits of Language lab.

## Committee Chairman Mr. Phase N.T.

Internal Quality Assurance Cell has been working in the college since 2005. Internal Quality Assurance cell is very keen to create the quality oriented atmosphere in the college. IQAC cell prepared and submitted AQAR within time. For this the several meetings were held with the committee members and criterion heads. The IQAC committee organized number of functions to maintain the quality in the college. The IQAV is binded to create quality and sustain this quality in the institution. The principal and the committee members always raised their hand of cooperation to maintain quality in the college.

The RUSA Committee send the proposal to UGC the UGC sanctioned two crore but unfortunately the institution was not able to share its share. The college is participated in the " Paramarsh Scheme" as a mentee college. Number of functions were attended by the member of RUSA committee.



The IQAC committee of the college has taken initiative in Academic and administrative Audit (AAA). Rayat Shikshan Sanstha asses yearly performance of the institution. In the Academic year the Sanstha assed the performance of the institution. All the seven criterion heads prepared their criteria and satisfactorily the institution undergone the audit.

**Chairman Mr. Manohar Malge**

## UGC Committee

Throughout the year the UGC Committee was remain active. The Committee done the correspondence with UGC throughout the year. The NOC of UGC grant to IQAC was taken in the year. The grant to fashion designing was utilized in the year and audited statement and utilization submitted to UGC.

**Chairman Mr. Manohar Malge**

## मराठी विभाग

शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये मराठी विभागांमार्फत विद्यार्थिनींच्या शैक्षणिक आणि व्यक्तिमत्व विकासाच्या दृष्टीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

दि. १ ऑगस्ट २०१९ रोजी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त अण्णाभाऊ साठे महामंडळाचे अध्यक्ष मा. श्री. अमित गोरखे यांचे ''अण्णाभाऊ साठे : जीवन आणि कार्य'' हया विषयावर व्याख्यान संपन्न झाले. सदर कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. संजय कांबळे यांनी मार्गदर्शक केले. यावेळी प्रा.डॉ.मच्छिंद्र सकटे यांचे विशेष सहकार्य लाभले.

महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रकानुसार दि. १ जानेवारी २०२० ते १५ जानेवारी २०२० हया कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमांतर्गत विविध साहित्य आणि मराठी भाषेच्या संवर्धन अभिरूची संदर्भात कार्यक्रम संपन्न झाले. यामध्ये विशेषतः कवितावाचन, व्याख्यान, भित्तीपत्रक, निबंध लेखन इत्यादी कार्यक्रम घेण्यात आले. विद्यार्थिनींनी उत्स्फुर्तपणे कार्यक्रमात सहभाग घेतला.

दि. २७ फेब्रुवारी २०२० जेष्ठ साहित्यिक वि.वि. शिरवाडकर यांची जयंती आणि मराठी राजभाषा गौरव दिन महाविद्यालयात संपन्न झाला. सदर कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून मा. सौ. मीनाक्षी फासे यांनी मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमास मा. प्राचार्य डॉ. संजय कांबळे. हे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते.

मराठी विभागाच्या विविध कार्यक्रमास मा. प्राचार्य डॉ. संजय कांबळे यांचे अनमोल मार्गदर्शन लाभले. तसेच मराठी विभागातील शिक्षक प्रा. संग्राम गोसावी आणि प्रा. सौ. माने एम. पी. यांचे विशेष सहकार्य लाभले.

**प्रा. डॉ. उमाप ए. एस मराठी विभाग प्रमुख**

## अविष्कार अहवाल - २०१९ - २०२०

अविष्कार संशोधन प्रकल्पांतर्गत महाविद्यालयामध्ये शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये विद्यार्थिनींना विविध विषयामध्ये संशोधन करण्यास प्रेरणा मिळावी व त्यांचा शैक्षणिक व सर्वांगिण विकास होण्याच्या महाविद्यालयात विविध कार्यक्रमांचे यशस्वीरीत्या आयोजन करण्यात आले.

दि. ६ जाने. २०२० रोजी शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर आणि बाळासाहेब देसाई कॉलेज पाटण यांच्या संयुक्त विद्यमाने पाटण येथे अविष्कार संशोधन महोत्सव संपन्न झाला. सदर महोत्सवात महाविद्यालयातील कु. ज्योती शंकर सोनावले हिने 'विनिमयाच्या माध्यमातील अविष्कार तर कु. सानिया सत्तार मोमीन बी.ए.भाग-३ हिने 'सिंधु संस्कृती : सभ्यतेचं एक लेणं तसेच श्रावणी राजेंद्र बोरात बी.ए.भाग -३ 'आपत्ती व्यवस्थापन' हया विषयावर संशोधनपर पोस्टर्स सादर केले. सदर कार्यक्रमात विद्यार्थिनींबरोबर प्रा. डॉ. उमाप ए.एस.यांनी सहभाग घेतला.

शनिवार दि. ०८ फेब्रु. २०२० रोजी रयत शिक्षण संस्थेमार्फत एस.एम.जोशी कॉलेज हडपसर पुणे, येथे संपन्न झाले. सदर अविष्कार महोत्सवात महाविद्यालयातील कु. ज्योती शंकर सोनावले बी.ए.भाग-३ आणि कु. सानिया सत्तार मोमीन बी.ए.भाग - २ हया विद्यार्थिनींनी पाटण येथे सादर केलेले पोस्टर्स हया महोत्सवात पुन्हा सादर करून सहभाग घेतला.

कराड येथील एस.जी.एम. कॉलेजमधील प्रा.डॉ. बोडरे यांनी महाविद्यालयात मंगळवार दिनांक २४ डिसेंबर. २०१९ रोजी अविष्कार संशोधन कार्यशाळेत विद्यार्थिनींना व शिक्षकांना मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमात प्राचार्य डॉ. संजय कांबळे हे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते.

अशाप्रकारे आविष्कार संशोधन प्रकल्पांतर्गत महाविद्यालयात विविध कार्यक्रम घडून आले. मा. प्राचार्य डॉ. संजय कांबळे यांनी अनमोल असे मार्गदर्शन केले. तसेच कमिटी सदस्यांचे विशेष सहकार्य लाभले.

**प्रा.डॉ.उमाप ए.एस प्रमुख, अविष्कार संशोधन प्रकल्प**

## प्लेसमेंट सेल कमिटी अहवाल २०१९ - २०

शैक्षणिक वर्ष २०१९ - २० मध्ये महाविद्यालयात प्लेसमेंट सेल कमिटी कार्यरत आहे. कमिटी अंतर्गत महाविद्यालयातील बी.ए.भाग ३ मधील विद्यार्थिनींसाठी पदवीनंतर असणाऱ्या करिअरच्या संधी या विषयावर वेळोवेळी मार्गदर्शन केले. तसेच रोजगाराच्या विविध संधींविषयी जाहिरातींची माहिती करून दिली. या शैक्षणिक वर्षामध्ये प्लेसमेंट सेल मार्फत दि. ०२/०१/२०२० रोजी संगणक क्षेत्रातील रोजगार संधी या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेस महाविद्यालयातील ६५ विद्यार्थिनी

हा होता. तसेच ०९/०१/२०२० रोजी मा. डॉ. मोहन भोसले यांचे 'करीयर क्षेत्रातील करीअरच्या संधी' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. या दोन्ही कार्यक्रमाचा विद्यार्थिनींना लाभ झाला.

मागील शैक्षणिक वर्षात उत्तीर्ण झालेल्या व ज्यांना नोकरी मिळाली अशा विद्यार्थिनींची माहिती घेण्यात आली. त्यानुसार १ विद्यार्थिनीला रोजगाराची संधी मिळाली कमिटीचे कामकाज यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी मा.प्राचार्य व समितीतील सर्व सदस्यांचे मोलाचे सहकार्य मिळाले.

**प्रा. साळुंखे एस.टी चेअरमन प्लेसमेंट सेल कमिटी**

## हेल्थ सेंटर

महाविद्यालयामध्ये विद्यार्थिनी व कर्मचारी यांचेसाठी हेल्थ सेंटर कार्यरत आहे. हेल्थ सेंटर कमिटीच्या सदस्यांची पहिली मिटींग दि. २२/०७/२०१९ रोजी आ. प्राचार्य डॉ. संजय कांबळे यांच्या उपस्थितीत प्राचार्य केबीनमध्ये पार पडली. सदर मिटींगमध्ये वर्षभर घ्यावयाचे कार्यक्रम व राबवायचे उपक्रम याविषयी चर्चा झाली आणि ते उपक्रम वर्षभर राबविण्याचे ठरले. हेल्थ सेंटरच्या वतीने वर्षभरामध्ये जे उपक्रम राबविण्यात आले त्याची थोडक्यात माहिती पुढीलप्रमाणे

१) स्त्रियांच्या आरोग्य विषयक मार्गदर्शन हा कार्यक्रम दि. ३१ जुलै २०१९ रोजी सातारा तर्जनिकेतन विभागाद्वारे आयोजित करण्यात आला. सदर कार्यक्रमात श्री. के.डी माने व मा. श्री. ए.ए.देशपांडे यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. हा कार्यक्रम आमच्या विद्यार्थिनींसाठी आरोग्याबाबत खूपच उपयुक्त ठरला.

२) विवेकवाहीनी रोटरी क्लब उंब्रज व महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने अवयवदान श्रेष्ठ दान या विषयावर दि.०५/०२/२०२० रोजी आयोजित करण्यात आला. सदर कार्यक्रमास मा. श्री.द.श्री. जाधव, मा. प्राचार्य अनिल पोतदार उपस्थित होते यावेळी अवयवदानाबाबत समाजात जागृती निर्माण करण्यासाठी विद्यार्थिनींची रॅली काढण्यात आली.

३) महाविद्यालयातील हेल्थ सेंटर मा. गांधी ज्युनिअर कॉलेज व प्राथमिक आरोग्य केंद्र उंब्रज यांचे संयुक्त विद्यमाने दि. १३/०३/२०२० रोजी कोरोना संसर्ग जागृती अभियान राबविण्यात आले. यावेळी उंब्रज प्राथमिक आरोग्य केंद्राचे प्रमुख वै द्य कि य अधिकारी मा. डॉ. संजय कुंभार यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले सदर कार्यक्रम आमच्या विद्यार्थिनींमध्ये कोरोना विषाणूबाबत जागृती निर्माण होण्यास खुपच उपयुक्त ठरला. हेल्थ सेंटरचे कामकाज मा.प्राचार्य, डॉ. संजय कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली वर्षभर अतिशय चांगल्या पध्दतीने सुरु असून सर्व कमिटी सदस्य व कार्यालयीन सेवक वर्ग यांचे उत्कृष्ट सहकार्य लाभले.

**चेअरमन हेल्थ सेंटर प्रा. साळुंखे ए. टी**

## शैक्षणिक अभ्यास सहल कमिटी - २०१९ - २० अहवाल

इतिहास विभागाच्या बी.ए.भाग.३ च्या विद्यार्थिनींची शैक्षणिक अभ्यास सहल शिवकालीन किल्ले वसंतगड व तळबीड येथील स्वराज्याचे सरसेनापती हंबीरराव मोहिते यांची समाधीचे दर्शन घेण्यासाठी दि. १८/०२/२०२० रोजी आयोजित करण्यात आली. या सहलीमध्ये १५ मुली व प्रा. सुरेश साळुंखे (इतिहास विभाग प्रमुख), प्रा. मारुती तांबे प्राध्यापक सहभागी झाले होते.

या सहलीमध्ये डोंगरी किल्ला वसंतगडावरील बांधकाम तटबंदी, बुरूज, दरवाजे, चंद्रसेनमंदिर, पाण्याची तळे, टाकी इत्यादी ठिकाणची पाहणी केली. तसेच किल्ल्याचा इतिहास जाणून घेतला त्यानंतर किल्ल्याच्या पायथ्याशी असणाऱ्या तळबीड गावातील सरसेनापती हंबीरराव मोहिते यांच्या समाधीचे दर्शन घेतले. तसेच तळबीड गावचा इतिहास जाणून घेतला. ही शैक्षणिक अभ्यास सहल आमच्या मुली व प्राध्यापकांसाठी उपयुक्त ठरली. सहली साठी मा. प्राचार्य डॉ. संजय कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच समाजशास्त्र विभागाची सहल डॉ. मच्छींद्र सकटे यांच्या मार्गदर्शनाखाली वेंगुर्ला येथे गेली होती या अभ्यास सहलीमध्ये मुलींनी कातकरी आदिवासी जमातीचा अभ्यास केला. ही सहल विद्यार्थिनीसाठी उपयुक्त होती.

**सहल विभाग प्राचार्य (प्रा. साळुंखे एस.टी)**

**१) <u>अॅकॅडमिक कॅलेंडर, टाईम टेबल व रोल कॉल कमिटी :</u>** शैक्षणिक वर्ष जून 2019 ते मे 2020 पर्यंतचे अॅकॅडमीक कॅलेंडर यांचे नियोजन मा. प्राचार्य डॉ. एस.एम.कांबळे साहेब यांच्या मार्गदर्शनाने करण्यात आले. प्रत्येक महिन्यात कोणते काम असेल याचा आराखडा तयार करण्यात आला. महाविद्यालयातील सर्व समितीचे कार्य यात मांडण्यात आले व अॅकॅडमिक कॅलेंडर अनुसार कार्यवाही करण्यात आली. जून 2019 ते एप्रिल 2020 पर्यंतचे टाईम टेबल तयार करण्यात आले. प्रत्येक विषय शिक्षकांच्या नावांसह कोणताही अडथळा न येता टाईम टेबल तयार करण्यात आले. अॅकॅडमिक कॅलेंडर, टाईम टेबल व रोल कॉल कमिटी तयार करण्यासाठी सर्वांचे सहकार्य लाभले. मा. प्राचार्य डॉ.एस.एम.कांबळे साहेब यांनी नेहमीच मार्गदर्शन केले याबद्दल चेअरमन या नात्याने मी त्यांची आभारी आहे.

**2) <u>शॉर्ट टर्म कोर्सेस समिती :</u>** शैक्षणिक वर्ष 2019 - 2020 मध्ये मा. प्राचार्य डॉ. एस.एम. कांबळे साहेब यांच्याशी चर्चा केल्या नंतर या समितीचे कार्य सुरु करण्यात आले. प्रवेश प्रक्रिया बरोबरच शॉर्ट टर्म कोर्सेस मधील एकूण 10 कोर्सेसचे प्रवेश देखील केले जातात. विद्यार्थिनींच्या आवडी अनुसार त्यांना एक कोर्स घेण्याची परवानगी दिली जाते. महाविद्यालयात ऑफिस ऑटोमेशन, स्पोकेन इंग्लिश, बालवाडी शिक्षक शिक्षण प्रशिक्षण, पाक कला, ड्रेस मेकिंग, ब्युटी केयर, कराटे प्रशिक्षण, प्राथमिक योगा, बॉक्सिंग, एम.पी.एस.सी. पुर्व तयारी असे एकूण 10 कोर्सेस आहेत. बी. ए. भाग1 साठी कराटे प्रशिक्षण आवश्यक कोर्स आहे. कोर्स शिक्षक विषयी चर्चा करण्यात आली व सुरळीतपणे कार्य सुरु झाले. गरजू व आर्थिकदृष्ट्या कमकुवत परिस्थिती असणाऱ्या विद्यार्थिनींना प्राचार्य डॉ.एस.एम कांबळे साहेब यांच्या परवानगीने सवलत देण्यात आली. तसेच महाविद्यालयातील प्रा.ए.बी.मडावी, डॉ.व्ही.एस.मोहिते, प्रा. के.एन. पाटील व प्रा. एम. तांबे सर यांनी काही विद्यार्थिनींना आर्थिक मदत केली. हे सर्व कोर्सेस व्यवस्थितपणे चालावे यासाठी समितीची बैठक घेण्यात आली व वर्ग व्यवस्थितपणे चालतात का यांचे निरीक्षण समन्वयक यांनी केले. अशा प्रकारे या समितीचे कार्य व्यवस्थितपणे पार पाडण्यात आले. मा. प्राचार्य डॉ. एस.एम. कांबळे साहेब यांनी नेहमीच मार्गदर्शन केले याबद्दल चेअरमन या नात्याने मी त्यांची व सर्व समिती सदस्यांची आभारी आहे.



3) <u>रेमिडीयल कोर्सेस समिती</u> : या समितीचे कार्य बैठक मा. प्राचार्य डॉ एम.एस. कांबळे साहेब यांच्याशी चर्चा केल्या नंतर सुरु करण्यात आले. या समितीत सर्व मागासवर्गीय विद्यार्थिनी व ज्या अभ्यासात कमकुवत आहेत असे सर्वांचे समावेश या रेमिडीयल कोर्स यादीत करण्यात आले. यांची यादी करताना मागासवर्गीय विद्यार्थिनी बरोबर ज्यांना निदान चाचणी मध्ये कमी मार्क मिळाले व त्यांना तेच विषय हवेत. अशा विद्यार्थिनींना या रेमिडीयल कोर्स मध्ये समाविष्ट करण्यात आले. द्वितीय सत्रात शिक्षकांना ज्यादा तास घेवून त्यांना मार्गदर्शन करण्याचे ठरवण्यात आले. या समितीचे कार्य व्यवस्थितपणे चालावे यासाठी समितीची बैठक घेण्यात आली. अशा प्रकारे या समितीचे कार्य व्यवस्थितपणे पार पाडण्यात आले. मा. प्राचार्य डॉ. एस.एम. कांबळे साहेब यांनी नेहमीच मार्गदर्शन केले याबद्दल चेअरमन या नात्याने मी त्यांची व सर्व समिती सदस्यांची आभारी आहे.

**प्रा. आशा बुधराम मडावी चेअरमन - अॅकॅडमिक कॅलेंडर, टाईम टेबल व रोल कॉल कमिटी**

**2) <u>शॉर्ट टर्म कोर्सेस समिती :</u>** शैक्षणिक वर्ष 2019 - 2020 मध्ये मा. प्राचार्य डॉ. एस.एम. कांबळे साहेब यांच्याशी चर्चा केल्या नंतर या समितीचे कार्य सुरु करण्यात आले. प्रवेश प्रक्रिया बरोबरच शॉर्ट टर्म कोर्सेस मधील एकूण 10 कोर्सेसचे प्रवेश देखील केले जातात. विद्यार्थिनींच्या आवडी अनुसार त्यांना एक कोर्स घेण्याची परवानगी दिली जाते. महाविद्यालयात ऑफिस ऑटोमेशन, स्पोकेन इंग्लिश, बालवाडी शिक्षक शिक्षण प्रशिक्षण, पाक कला, ड्रेस मेकिंग, ब्युटी केयर, कराटे प्रशिक्षण, प्राथमिक योगा, बॉक्सिंग, एम.पी.एस.सी. पुर्व तयारी असे एकूण 10 कोर्सेस आहेत. बी. ए. भाग1 साठी कराटे प्रशिक्षण आवश्यक कोर्स आहे. कोर्स शिक्षक विषयी चर्चा करण्यात आली व सुरळीतपणे कार्य सुरु झाले. गरजू व आर्थिकदृष्ट्या कमकुवत परिस्थिती असणाऱ्या विद्यार्थिनींना प्राचार्य डॉ.एस.एम कांबळे साहेब यांच्या परवानगीने सवलत देण्यात आली. तसेच महाविद्यालयातील प्रा.ए.बी.मडावी, डॉ.व्ही.एस.मोहिते, प्रा. के.एन. पाटील व प्रा. एम. तांबे सर यांनी काही विद्यार्थिनींना आर्थिक मदत केली. हे सर्व कोर्सेस व्यवस्थितपणे चालावे यासाठी समितीची बैठक घेण्यात आली व वर्ग व्यवस्थितपणे चालतात का यांचे निरीक्षण समन्वयक यांनी केले. अशा प्रकारे या समितीचे कार्य व्यवस्थितपणे पार पाडण्यात आले. मा. प्राचार्य डॉ. एस.एम. कांबळे साहेब यांनी नेहमीच मार्गदर्शन केले याबद्दल चेअरमन या नात्याने मी त्यांची व सर्व समिती सदस्यांची आभारी आहे.

**प्रा. आशा बुधराम मडावी समन्वयक - शॉर्ट टर्म कोर्सेस समिती**

**3) <u>रेमिडीयल कोर्सेस समिती :</u>** या समितीचे कार्य बैठक मा. प्राचार्य डॉ.एम.एस.कांबळे साहेब यांच्याशी चर्चा केल्या नंतर सुरु करण्यात आले. या समितीत सर्व मागासवर्गीय विद्यार्थिनी व ज्या अभ्यासात कमकुवत आहेत असे सर्वांचे समावेश या रेमिडीयल कोर्स यादीत करण्यात आले. यांची यादी करताना मागासवर्गीय विद्यार्थिनी बरोबर ज्यांना निदान चाचणी मध्ये कमी मार्क मिळाले व त्यांना तेच विषय हवेत. अशा विद्यार्थिनींना या रेमिडीयल कोर्स मध्ये समाविष्ट करण्यात आले. द्वितीय सत्रात शिक्षकांना ज्यादा तास घेवून त्यांना मार्गदर्शन करण्याचे ठरवण्यात आले. या समितीचे कार्य व्यवस्थितपणे चालावे यासाठी समितीची बैठक घेण्यात आली. अशा प्रकारे या समितीचे कार्य व्यवस्थितपणे पार पाडण्यात आले. मा. प्राचार्य डॉ. एस.एम. कांबळे साहेब यांनी नेहमीच मार्गदर्शन केले याबद्दल चेअरमन या नात्याने मी त्यांची व सर्व समिती सदस्यांची आभारी आहे.

**प्रा. आशा बुधराम मडावी समन्वयक - रेमिडीयल कोर्सेस समिती**

## महिला लैंगिक छळ व तक्रार निवारण समिती -

शैक्षणिक वर्ष 2019 - 20 मध्ये महिलाबाबतच्या या कमिटीची स्थापना विद्यार्थिनींची सुरक्षा अडचणीचे निवारण करण्यासाठी करण्यात आली. विद्यार्थिनींच्या तक्रारीसाठी 2 तक्रार पेटयांची व्यवस्था करण्यात आली आहे. वर्षातून 2 वेळा तक्रार पेटी उघडून मा. प्राचार्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थिनींच्या अडचणींचे निवारण केले जाते.

1) दि. 07/12/2019 रोजी ''महिला सुरक्षा विषयक कायदे व मार्गदर्शन'' याविषयावर अॅड. सौ.प्राजक्ता कुलकर्णी यांचे व्याख्यान संपन्न झाले.

2) 23/12/2019 रोजी महिला समाजप्रबोधन व जनजागृती अंतर्गत महिलांविषयीचा कार्यक्रम घेण्यात आला या प्रसंगी मा. एस.जे. गायकवाड, शिवाजी जगताप (सहायक फौजदार) दत्तात्रय लवटे, स्नेहल तातार्ड यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य उपस्थित होते.

3) 07/03/2020 रोजी स्त्रियांची सुरक्षितता (इच फॉर इक्वल 2020) अंतर्गत प्रा. डॉ. वंदना मोहिते यांचे व्याख्यान झाले. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून प्रा. कल्पना पाटील उपस्थित होत्या. तसेच यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापिकांनी आपले विचार व्यक्त केले. **प्रा. डॉ. वंदना मोहिते चेअरमन**

## स्कॉलरशिप

शैक्षणिक वर्ष 2019-2020 मध्ये सर्व विद्यार्थिनींनी विविध स्कॉलरशिपसाठी आपले अर्ज दाखल केले होते. त्यामध्ये आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या राजर्षी शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेचे पात्र विद्यार्थिनींनी ऑनलाईन फॉर्म भरले होते. तसेच इतर सर्व मागासवर्गीय विद्यार्थिनींनी आपले ऑनलाईन अर्ज भरले होते.

महाराष्ट्र शासन व शिवाजी विद्यापीठ यांच्यावतीने घेतलेल्या कार्यशाळांना प्राचार्य डॉ.एस.एम.कांबळे, समिती प्रमुख म्हणून प्रा.एम.एस. मुजावर, श्री. भरत पवार यांनी उपस्थिती दाखविली. कार्यशाळेत दिलेल्या सुचनेनुसार महाविद्यालयातील सर्व विद्यार्थिनींची वेळोवेळी मिटींग घेऊन चर्चा करण्यात आली.

पात्र विद्यार्थिनींनी फॉर्मची सर्व पुर्तता केल्यानंतर शासनाच्या वतीने त्यांच्या स्कॉलरशीप खात्यावर रक्कम जमा झाली आहे. स्कॉलरशिप समितीचे सर्व कामकाज पार पाडण्यासाठी मा. प्राचार्य डॉ. एस.एम.कांबळे साहेब यांचे योग्य मार्गदर्शन मिळाले. समिती मधील सदस्य प्रा.एम.एल. माळगे, डॉ. एम.डी. सकटे, प्रा.ए.बी.मडावी व श्री. बी.ए.पवार यांचे बहुमोल सहकार्य लाभले.

**प्रा. मारुफ मुजावर चेअरमन**

# Rayat Shikshan Sanstha's
# Sou. M.R. Jagtap Mahila Mahavidyalaya, Umbraj
## STAFF LIST

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | Prin. Dr. Sanjay Kambale | M.Com, NET, M.Phil Ph.D | |
| 2 | Prof. Dr. Machindra Sakte | M.A, Ph.D | Sociology |
| 3 | Prof. Suresh Salunkhe | M.A.M. Phil | History |
| 4 | Prof. Maruf Mujawar | M.A., M. Phil | Hindi |
| 5 | Prof. Manohar Malge | M.A | English |
| 6 | Prof. Nilesh Phase | M.A. SET | English |
| 7 | Prof. Dr. Vandana Mohite | M.A. M.Phil, Ph.D | Hindi |
| 8 | Prof. Aasha Madavi | M.A. NET. | Geography |
| 9 | Prof. Dr. Abasaheb Umap | M.A. NET, Ph.D | Marathi |
| 10 | Prof. Shobha Korade | M.A. M.Lib, NET | Librarian |
| 11 | Prof. Dr. Pankaj Dhamal | B.A. M. PEd, Ph.D | Phy. Director |
| 12 | Prof. Kalpana Patil | M.A. SET | Psychology |
| 13 | Prof. Maruti Tambe | M.A | History |
| 14 | Prof. Manisha Ghadage | M.A. | Sociology |
| 15 | Prof. Sangram Gosavi | M.A., SET | Marathi |
| 16 | Prof. Shaila Mane | M.A. , SET | Marathi |
| 17 | Prof. Swati Gavade | M.A. NET, SET | Economics |

### NON-TEACHING STAFF

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | Shri. Bharat Pawar | Sr. Clerk | M., B. Lib, I.S. |
| 2 | Shri. Kiran Bhakare | Jr. Clerk | B.Sc. |
| 3 | Shri. Rajendra Kamble | Lib. Attendant | $10^{th}$ |
| 4 | Shri. Yuvraj Virkar | Lib. Attendant | $12^{th}$ |
| 5 | Shri. Adhik Jadhav | Peon | $7^{th}$ |
| 6 | Shri. Nita Mohite | Clerk | B.A |







वार्षिक वितरण समारंभात मा.सौ. वैशाली कदम जि.प. सदस्य सांगली (मा. विद्यार्थीनी) यांचे स्वागत करताना मा. द. श्री. जाधव (आबा) जनरल बॉडी सदस्य रयत शिक्षण संस्था, सातारा व व्यासपीठावरील इतर मान्यवर



वार्षिक वितरण समारंभात मार्गदर्शन करताना मा. मिथिला गुजर (शिवछत्रपती विजेत्या) व व्यासपीठावरील इतर मान्यवर



वार्षिक वितरण समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. राजमाने साहेब, (सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड) व व्यासपीठावरील मान्यवर



वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ कार्यक्रमासाठी उपस्थित मा.प्राचार्य डॉ. मोहन राजमाने, मा. मिथिला गुजर, मा. वैशाली कदम यांच्या समवेत महाविद्यालयाचे प्राचार्य व शिक्षक स्टाफ

# कर्मवीर जयंती सोहळा २०१९-२०



१३२ वी कर्मवीर जयंती कार्यक्रम प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून मार्गदर्शन करताना प्राचार्य, डॉ. अरुण आंधळे र.शि.सं.,सातारा. व व्यासपीठावरील मान्यवर



कर्मवीर जयंती कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय कांदळे व व्यासपीठावरील उपस्थितीत मा. प्राचार्य डॉ. अरुण आंधळे, प्राचार्य अनिल पोतदार, मा. प्रकाश चव्हाण, मा. सुरेश साळुंखे, मा. अजित जाधव, मा. संजय पाटील,



कर्मवीर जयंती कार्यक्रमाचे आभार मानताना मा. प्राचार्य, अनिल पोतदार महात्मा गांधी ज्युनिअर कॉलेज उंब्रज व व्यासपीठावरील मान्यवर



पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील जयंती निमित्त प्रतिमेचे पूजन करताना महाविद्यालयाचे मा.प्राचार्य डॉ. संजय कांबळे व महाविद्यालयाचा शिक्षक व शिक्षकेत्तर स्टाफ

रयत शिक्षण संस्थेचे,

# सौ.मंगलताई रामचंद्र जगताप महिला महाविद्यालय,उंब्रज

ता. कराड जि. सातारा - ४१५१०९

Reaccredited at 'B' + 'grade (CGPA 2.66) by NAAC



# त्रिवेणी

सन-२०१९-२०